१०४ शतकोत्तर वाटचाल

# नवाकाळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

• मुंबई, गुरुवार १८ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१०५, पाने-८, किंमत: ₹ ७ NAVAKAL

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 105 Marathi - Daily - Mumbai, 18 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

२०२२ नंतर आता २०२६... ठाकरे गटात मोठी फूट?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# ‘ऑपरेशन टायगर’ यशस्वी! ठाकरेंचे सहा खासदार फुटले

## फुटीर गटाला मान्यता आता २० आमदारांवर नजर



**महाराष्ट्र राज्याच्या आणि देशाच्याही राजकारणात गेले काही महिने सुरू असलेली ऑपरेशन टायगरची चर्चा अखेर आज खरी ठरली. भाजपाने पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांचा तृणमूल पक्ष पूर्ण नष्टच केल्यावर महाराष्ट्रात भाजपाच्या मदतीने एकनाथ शिंदे यांनी पुन्हा उबाठाचे तुकडे केले. उबाठाच्या १० पैकी सहा खासदार फोडून लगेच लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची या फुटीर गटाला मान्यताही घेतली. यानंतर उबाठा काहीच करू शकत नाही. उबाठाने घाईने व्हीप जारी करीत उद्या बैठक बोलावली, पण व्हिप काढण्यापूर्वीच स्वतंत्र गटाला मान्यता दिल्याने कारवाई होऊ शकत नाही. १९ जूनला मुंबईत शिवसेना वर्धापन दिनी हे ६ खासदार समारंभपूर्वक शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. यानंतर एकनाथ शिंदे यांनी उबाठाच्या २० आमदारांवर लक्ष केंद्रित केल्याची चर्चा आहे.**

■ नवी दिल्ली

**ऑपरेशन** टायगर अशा तयारीनिशी राबवण्यात आले की शिवसेना उबाठाने आज व्हीप बजावण्याआधीच लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी फुटीरांच्या गटाला मान्यता देऊनही टाकली होती. खासदार फुटणार याबद्दल उबाठाच्या नेत्यांना काल जवळपास खात्रीच झाली होती. त्यामुळे शेवटचे हत्यार म्हणून उबाठाने उद्या संसदीय पक्षाची तातडीची बैठक बोलावली आणि बैठकीला हजर राहण्यासाठी व्हीप जारी केला. उद्या बैठकीला जे खासदार उपस्थित राहणार नाहीत त्यांनी उबाठाची साथ सोडली यावर शिक्कामोर्तब होईल. पण त्यांनी स्वतंत्र गट आधीच स्थापन केल्याने त्यांच्यावर कारवाई होणार नाही. या खासदारांना ॲडव्हान्स म्हणून १५ कोटी रुपये दिले. प्रत्यक्ष त्यांना ५० कोटी रुपये दिले जाणार आहेत, असा आरोप करीत त्यांच्याबद्दल पत्रकार परिषदेत बोलताना संजय राऊत यांनी शिवीच हासडली. यावरून संजय राऊत ट्रोल झाले.

आज दिल्लीत झालेल्या घडामोडींबद्दल एकाही फुटीर खासदाराने माध्यमांसमोर येऊन भूमिका स्पष्ट केली नाही. संजय जाधव, संजय देशमुख, संजय दिना पाटील, भाऊसाहेब वाकचौरे, नागेश पाटील आष्टिकर आणि ओमराजे निंबाळकर हे उबाठाचे सहा खासदार पक्षातून बाहेर पडल्याचे स्पष्ट झाले आहे. हे सर्व खासदार आज नॉट रिचेबल होते. १० जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या एनडीएच्या बैठकीत ऑपरेशन टायगरची रुपरेषा ठरली होती. त्याच रात्री ११ वाजता दिल्लीतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये खासदार श्रीकांत शिंदे यांनी बंडखोर खासदारांना बोलावले होते. या बैठकीला एकनाथ शिंदेदेखील उपस्थित होते. याच ठिकाणी अंतिम निर्णय झाला होता.

तत्पूर्वी काल मंगळवारी फुटीरांच्या हालचालींना वेग येताच उबाठाचे नेते खडबडून जागे झाले. पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी दिल्लीत शिवसेना संसदीय पक्षाची तातडीची बैठक बोलावली. बैठकीला उपस्थित राहण्यासाठी पक्षाचे मुख्य प्रतोद अनिल देसाई यांनी आज व्हीप जारी केला. तोपर्यंत बंडखोर खासदार दिल्लीकडे रवाना झाल्याच्या बातम्या येऊ लागल्या होत्या. त्यामुळे पक्ष फुटणार यांची जवळपास खात्री झाल्याने उबाठाने आज दिल्लीत पत्रकार परिषद घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आज दिल्लीत संजय राऊत यांच्या निवासस्थानी पत्रकार परिषद झाली. या पत्रकार परिषदेला संजय राऊत, अनिल देसाई, अरविंद सावंत आणि राजाभाऊ वाजे उपस्थित होते. या पत्रकार परिषदेत राऊत यांच्या बोलण्यातून पक्ष फुटणार याचे पुन्हा एकदा संकेत मिळाले. याप्रसंगी संजय राऊत म्हणाले की, आमचे खासदार फुटणार याबद्दल माझ्याकडे अधिकृत माहिती नाही. केवळ तुमच्या माध्यमातून माझ्या कानावर या गोष्टी आल्या आहेत. खासदार फुटण्याबद्दल विचाराल तर काल रात्री साडेदहा वाजता मला एका महत्त्वाच्या व्यक्तिने सांगितले की महाराष्ट्रातील खासदारांना विकत घेतले जात आहे. भाव तोच आहे ५० कोटी रुपये. त्यापैकी १५ कोटी रात्री प्रत्येकाकडे पोहोचवले जाणार आहेत. त्याशिवाय हे खासदार विमानात बसणार

पान ८ वर

## अख्खा समाजवादी पक्ष फुटणार उत्तर प्रदेशच्या मंत्र्याचा दावा

पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस आणि महाराष्ट्रातील उद्धव ठाकरे यांच्या उबाठातील खासदारांच्या फुटीनंतर आता उत्तर प्रदेशातील अखिलेश यादव यांच्या समाजवादी पार्टीतही फुटीचे वारे वाहत असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. योगी आदित्यनाथ सरकारमधील कॅबिनेट मंत्री आणि सुहेलदेव भारतीय समाज पक्षाचे अध्यक्ष ओमप्रकाश राजभर यांनी समाजवादी पार्टीला लवकरच मोठा धक्का बसणार असून, संपूर्ण समाजवादी पक्ष फुटून भाजपामध्ये येण्यास तयार असल्याचा दावा केल्याने खळबळ माजली आहे.



ओमप्रकाश राजभर म्हणाले की, समाजवादी पक्षात मोठी फूट पडणार आहे. रामगोपाल यादव यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे एक पत्र सादर केले आहे. खाण घोटाळा आणि

पान ८ वर

## सर्वोच्च न्यायालयही जबाबदार उबाठा फुटीवर कायदेतज्ज्ञांचे मत

उबाठाच्या खासदारांच्या फुटीला कायदेशीर आव्हान मिळू शकते का, याबाबत बोलताना विधिमंडळाचे माजी सचिव अनंत कळसे म्हणाले की, या प्रकरणात मूळ पक्षात उभी फूट आहे, फुटीला दोन तृतियांश सदस्यांची मान्यता आहे का, त्याचा पक्षावर काय परिणाम होतो या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. हे प्रकरण न्यायालयात गेले तर या सगळ्या गोष्टी एकत्र करून न्यायालयाला निकाल द्यावा लागेल. घटनेचा अर्थ सर्वोच्च न्यायालयाने लावायला हवा. तो त्यांनी नाही लावायचा तर कोणी? परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे, वर्षानुवर्षे शिवसेना फुटीचा खटला प्रलंबित आहे. सर्वोच्च न्यायालयाचा पूर्ण आदर ठेवून म्हणावेसे वाटते की, त्यांनी लवकरात लवकर या खटल्याचा निकाल द्यायला हवा. त्यांना ज्युडिशियल रिव्ह्यूचा अधिकार संविधानाने दिला आहे. शिवसेना फुटीच्या बाबतीत हा निकाल का दिला जात नाही, हा प्रश्नच आहे. कायदेतज्ज्ञ उल्हास बापट यांनीही याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाला जबाबदार धरले आहे. बापट म्हणाले की, भारताच्या लोकशाहीचे जे पतन चालू आहे याला राजकारणी लोक जेवढे जबाबदार आहेत, तेवढेच सर्वोच्च न्यायालयही आहे. सर्वोच्च न्यायालयाने यावर स्वच्छ शब्दात निर्णय द्यायला पाहिजे. तो कोर्टाने अजून दिलेला नाही. सर्वोच्च न्यायालयाने पक्षांतर बंदी कायद्याचा शेवटचा अर्थ लावणे आवश्यक आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही या राजकीय घडामोडींवर संताप व्यक्त केला. त्यांनी म्हटले की, ही मोठी शोकांतिका आहे आणि मला दु:ख वाटते आहे की आपल्या देशाच्या सुप्रीम कोर्टाला इतर सगळ्या केसेस जास्त महत्त्वाच्या वाटतात. पण भाजपा एकानंतर एक फोडताना दिसतो आहे, असे उघड्या डोळ्याने होत असतानासुद्धा सुप्रीम कोर्ट विलंब करत आहे. न्यायाला विलंब म्हणजेच न्याय नष्ट करणे, असेच म्हणावेसे वाटते.

# गिरण्यांच्या कायदेशीर जमिनी ताब्यात घेण्याचे सरकारचे आदेश

■ मुंबई

**नगरविकास** विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली गिरणी कामगारांच्या विविध प्रश्नांबाबत महत्त्वाची बैठक निर्मल भवन येथे सिडको सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी म्हाडा, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ तसेच विविध गिरणी कामगार संघटनांच्या प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले होते.

सुरुवातीला वांगणी, सेलू येथील घरांना वर्क ऑर्डर दिली आहे असे सांगून जशी कामगारांची संख्या वाढेल त्याप्रमाणे वर्क ऑर्डर दिली जाईल. गिरणी कामगार कृती संघटनेने विचारल्याप्रमाणे मुंबईतील डीसीआर प्रमाणे ज्या गिरण्यांच्या कायदेशीर जमिनी मिळणार आहेत त्या जमिनी तातडीने ताब्यात घेऊन पुढील कारवाईला सुरुवात करावी, असे सक्त आदेश गुप्ता यांनी म्हाडाला दिले. एनटीसी गिरण्यांच्या जमिनीसंबंधी त्या अधिकाऱ्यांशी बोलणी सुरू आहेत. परंतु अंतिम निर्णय केंद्र सरकारकडे बोलूनच होईल असे ते म्हणाले.

कोन पनवेल येथील घरांच्या दुरुस्तीचा प्रश्न उपस्थित करून त्या घरांची दुरुस्ती सहा महिन्यांत करून प्रतीक्षा यादीतील कामगारांना घरांचे वाटप करा आणि जर सोडतीत लागलेली घरे कोणी घेत नसतील तर कोल्हापूरमधील गिरणी कामगारांना त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांना त्या घरांचे वाटप करा, असे म्हाडा अधिकाऱ्यांना सांगितले.

पात्र गिरणी कामगारांना सरकार जरी मुंबईत वेगवेगळ्या योजनेतून घरे देण्यास सकारात्मक असले तरी किती घरे देणार आणि कधी घरे देणार याची

पान ७ वर

# भारतावर हल्ला झाला तर आम्ही मदत करू

**ट्रम्प यांचे मोदींना आश्वासन**

■ पॅरिस

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत फ्रान्समध्ये पार पडलेल्या जी-७ परिषदेच्या वेळी



द्विपक्षीय चर्चा केली. या चर्चेत अलीकडेच होर्मुजमध्ये झालेल्या हल्ल्यांमध्ये ३ भारतीय खलाशांचा मृत्यू झाल्याबद्दल मोदींनी तीव्र चिंता व्यक्त केली. त्यावर डोनाल्ड ट्रम्प यांनी मोदींना आश्वासन दिले की, पंतप्रधान मोदी नेते असतील आणि भारतावर हल्ला झाला तर आम्ही मदत करणार आहे.

भारतासाठी लाखो भारतीय खलाशांचे रक्षण आणि समुद्रातील मुक्त संचार सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी या चर्चेत स्पष्ट केले. जागतिक सागरी व्यापारात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित केली पाहिजे, यावर त्यांनी भर दिला. यावर प्रतिक्रिया देताना ट्रम्प यांनी भारतीय खलाशांच्या मृत्यूबाबत शोक व्यक्त केला. जोपर्यंत मी राष्ट्राध्यक्ष आहे, तोपर्यंत भारताला व्हाईट हाऊसमध्ये एक चांगला आणि खंदा मित्र

पान ७ वर

# बंदीविरोधात ‘टेलिग्राम’ची हायकोर्टात धाव आमच्याकडे भक्कम पुरावे! सरकारचा दावा

■ नवी दिल्ली

**नीट-यूजी** फेरपरीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने लागू केलेल्या तात्पुरत्या बंदीविरोधात टेलिग्रामने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने या याचिकेवर आज तातडीची सुनावणी घेतली. या सुनावणीत सरकारच्या वतीने बाजू मांडताना महाअभिन्यायकर्ता तुषार मेहता यांनी टेलिग्रामवरील घडामोडी धक्कादायक असल्याचा दावा करत सरकारकडे भक्कम पुरावे असल्याचे सांगितले. या प्रकरणाची सुनावणी उद्या दुपारी २.३० वाजता होणार आहे.

केंद्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल (एसजी) तुषार मेहता यांनी सुरुवातीला न्यायालयाला सांगितले की, हा आदेश आयकर कायद्याच्या कलम ६९अ अंतर्गत आहे. आजच आदेश पारित होण्याची शक्यता आहे. मला माझे उत्तर दाखल करायचे असून, मी ते उद्या सकाळी ८ वाजता दाखल करेन. आम्ही टेलिग्रामवाल्यांना सांगितले की, तुमची सिस्टीम दुरुस्त करा. पण ते तसे करण्यात अयशस्वी ठरले. मी त्यांना उदाहरणे दिली आहेत आणि त्यांच्यासोबत शेअर केली आहेत. आम्ही उद्या एक धक्कादायक गोष्ट दाखवू. टेलिग्रामतर्फे हजर असलेले ज्येष्ठ वकील ध्रुव मेहता यांनी असा युक्तिवाद केला की, टेलिग्रामवरील बंदीला कोणताही तार्किक अधिकार नाही. ९ जून रोजी अधिकाऱ्यांकडून विशिष्ट यूआरएल मिळाल्यानंतर, आम्ही एका तासाच्या आत आक्षेपार्ह मजकूर काढून टाकला. आम्ही बेकायदेशीर नीट मजकुराशी संबंधित ९०० हून अधिक लिंक्स काढून टाकल्या. सरकारने केवळ आम्हालाच लक्ष्य केले आहे. इतर सोशल मीडिया कोणत्याही निर्बंधांशिवाय कार्यरत आहेत. कायदा संपूर्ण प्लॅटफॉर्म नव्हे, तर विशिष्ट माहिती ब्लॉक करण्याची परवानगी देतो.

# नसरापूर प्रकरणाची सुनावणी अंतिम टप्प्यात! शवविच्छेदन अहवाल सादर

■ पुणे

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**नसरापूर** लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या सुनावणीने अंतिम टप्प्यात प्रवेश केला असून, या प्रकरणात विशेष न्यायालयात सायबर तज्ज्ञांची साक्ष नोंदविण्यात आली. विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी सायबर तज्ज्ञांची साक्ष नोंदवून घेतली. या प्रक्रियेत ॲड. प्रथमेश शिंगणे यांनी सहाय्य केले.

सायबर तज्ज्ञांनी न्यायालयासमोर सीसीटीव्ही चित्रीकरणासह विविध तांत्रिक बाबींविषयी माहिती सादर केली. विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी ससून रुग्णालयाने दिलेला वैद्यकीय व शवविच्छेदन अहवाल न्यायालयात सादर करून त्याचे वाचन केले. सरकार पक्षाकडून साक्षी व पुरावे नोंदविण्याची प्रक्रिया आणखी एक दिवस सुरू राहण्याची शक्यता आहे. त्यानंतर आरोपीचा जबाब नोंदविण्याची प्रक्रिया सुरू होईल. आरोपीचा जबाब पूर्ण झाल्यानंतर अंतिम युक्तिवादाला सुरुवात होणार असल्याची माहिती विशेष सरकारी वकील मिसर यांनी दिली. साक्षी नोंदविताना पीडित बालिकेच्या कुटुंबियांच्या वतीने ॲड. राधिका नावंदर-जोशी आणि ॲड. मनीष पाडेकर उपस्थित होते.

मिसर यांनी ससून रुग्णालयाचा शवविच्छेदन अहवाल न्यायालयासमोर सादर करून वैद्यकीय पुरावा सिद्ध केला. न्यायालयाने या पुराव्याची गंभीर दखल घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

# आर्थिक अडचणींमुळे पिझ्झा हटची २.७ अब्ज डॉलर्सला विक्री होणार

**जगभर प्रसिद्ध असलेली पिझ्झा हटची रेस्टॉरंट साखळी आर्थिक अडचणींमुळे विक्री होणार आहे. पिझ्झा हटची मूळ कंपनी यम ब्रँड्स ही साखळी सुमारे २.७ अब्ज डॉलर्समध्ये विकण्याची तयारी करत आहे. त्यांनी यापूर्वीच पिझ्झा हटच्या विक्रीचा विचार सुरू असल्याचे सांगितले होते. अमेरिकेतील अनेक रेस्टॉरंट्स बंद करण्याचा निर्णयही कंपनीने घेतला होता. जुन्या पद्धतीची दुकाने, ग्राहकांच्या बदलत्या आवडी आणि वाढती स्पर्धा यामुळे पिझ्झा हटच्या व्यवसायावर परिणाम झाल्याचे त्यांचे म्हणणे होते.**

■ कॅन्सस

**पिझ्झा** हटची स्थापना १९५८ मध्ये अमेरिकेतील कॅन्सस राज्यातील विचिटा शहरात झाली होती. सुरुवातीला छोट्या रेस्टॉरंटपासून सुरू झालेली ही साखळी पुढे जगभर प्रसिद्ध झाली. १९७७ मध्ये पेप्सिकोने पिझ्झा हट विकत घेतले होते. त्यानंतर १९९७ मध्ये पेप्सिकोच्या रेस्टॉरंट व्यवसायाचे विभाजन होऊन यम ब्रँड्स ही स्वतंत्र कंपनी तयार झाली.

आता खासगी इक्विटी कंपनी एल कॅटरटन म्हणून अमेरिकेबाहेरील मुख्य पिझ्झा हट व्यवसाय सुमारे १.५ अब्ज डॉलर्समध्ये घेणार आहे. तर चीनमधील पिझ्झा हट व्यवसाय यम चायना होल्डिंग्ज सुमारे १.२ अब्ज डॉलर्समध्ये खरेदी करणार आहे. यम ब्रँड्सचे




म्हणणे आहे की, नव्या मालकांकडे रेस्टॉरंट क्षेत्रातील अनुभव असल्याने पिझ्झा हटला पुन्हा वाढीसाठी संधी मिळू शकते. दरम्यान, पिझ्झा हटसोबतच यम ब्रँड्सकडे केएफसी आणि टाको बेल सारखे मोठे ब्रँड्स आहेत. मात्र, पिझ्झा हटच्या विक्रीत घट झाल्यानंतर कंपनीने त्याच्या भविष्यासाठी पर्याय शोधण्यास सुरुवात केली होती.

# विधान परिषद निवडणुकीच्या ११ जागांसाठी आज मतदान

■ मुंबई

**राज्यातील** स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील विधान परिषदेच्या ११ जागांसाठी उद्या सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान पार पडणार आहे. एकूण १७ जागांपैकी सहा जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. या निवडणुकीची मतमोजणी २२ जून रोजी होणार आहे.

या निवडणुकीत ठाणे मतदारसंघातून शिंदे गटाचे रवींद्र फाटक, यवतमाळमधून दुष्यंत चतुर्वेदी, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे अनिकेत तटकरे, पुणे मतदारसंघातून विक्रम काकडे, अहिल्यानगर मतदारसंघातून भाजपाचे प्राजक्त तनपुरे तर वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली मतदारसंघातून भाजपाचे अरुण लखाणी हे बिनविरोध निवडून आले आहेत. लाखाणी खासदार सुप्रिया सुळे यांचे व्याही आहेत. या बिनविरोध निवडणुकीवरून विरोधकांनी सत्ताधार्यांवर गंभूर आरोप केले आहेत. दरम्यान, नाशिक मतदारसंघातील निवडणूक विशेष चर्चेत राहिली आहे. ही शिंदे गटाला मिळाल्यानंतर भाजपाचे गणेश गिते आणि प्रसाद हिरे यांनी बंडखोरी करत उमेदवारी अर्ज दाखल केला होता.



नवाकाळ

Email- contact@navakal.in  www.navakal.in  /navakalofficial


# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

**पाहिजेत**

डॉक्टर्स पेस्ट कंट्रोल ठाणेकरीता अनुभवी टेक्निशिअन पाहिजेत. चांगला पगार + आकर्षक सुविधा. संपर्क : **9820683431** {NC260932}

निराधार महिला आणि पुरुषांसाठी केअर टेकर नोकरी (पगार + जेवण + निवास मोफत) घरकुल केअर सेंटर: **9819426634/ 9969529162** {NC260938}

पुरुष/महिला बाऊंसर अंधेरी-वेस्ट करिता. संपर्क- CISB PVT. LTD., B-46, नथानी हाईट्स, मुंबईसेंट्रल ब्रीज, मुंबई किंवा 301, कुशवाहा चेंबर्स, मकवाना रोड, अंधेरी-ईस्ट, मुंबई- **9869343565.** {NC260939}

मालाड वेस्ट येथे इमिटेशन ज्वेलरी कामासाठी मुली/महिला पाहिजेत. **9987577655** {NC260871}

दादर (पश्चिम) येथे गाडीसाठी अनुभवी, वक्तशीर, निर्व्यसनी ड्रायव्हर्स पाहिजेत. जवळपास राहणाऱ्यांना प्राधान्य. **9987712677.** {NC260940}

गोरेगांवमध्ये इमिटेशन कामासाठी मुली पाहिजेत आकर्षक पगार संपर्क: **9769737444/ 8169195899** {NC260873}

माहीम पश्चिम येथे ऑफिसच्या कामासाठी महिला व पुरुष पाहिजेत. आपला बायोडाटा (Resume) व्हॉट्सअॅप करा. **8879625446** {NC260904}

प्रिंटींग प्रेसमध्ये कोमोरी मशीन LS 429 with UV कोटरसाठी प्रिंटर, फिडरमन आणि बॉयलर पाहिजेत. महापे, नवीमुंबई. **9820614018** {NC260949}

सिक्युरिटी हाऊसकीपिंग कंपनीला- सेल्स/ मार्केटिंग मॅनेजर, अकाऊंटंट, बाऊन्सर, टेलिकॉलर, एरिया मॅनेजर, फील्ड ऑफीसर, सिक्युरिटीगार्ड/ सुपरवायजर हाऊसकीपिंग मुले/मुली पाहिजेत- **9223380568/69** {NC260798}

**पाहिजेत**

सुरक्षारक्षक, हाऊसकीपिंग, सुपरवायझर, पँट्रीबॉय- दादर, वरळी, मुंबई सेंट्रल, ठाणे, **8291056761/ 8422880511/ 8422880515 / 9326200875** {NC260942}

फेलिसिटा चॉकलेट्स मुलुंड, हेल्पर/पॅकींग/ ऑफीस स्टाफ महिला पाहिजे **8080998658** {NC260859}

प्युनच्या जागेसाठी मुले पाहिजेत. शिक्षण 10वी ते 12वी. वयोमर्यादा 20-30. Accotax Consultancy Services 7, हालिमा बिल्डींग, तिसरा मजला, नानाभाई लेन, फोर्ट, मुंबई-400001. फोन नं.:- **9819830286** {NC260981}

पाण्याच्या टाक्या साफ करण्यासाठी हेल्पर पाहिजेत. ठाणे संपर्क- **9323357155/ 8369602176** {NC260977}

फॅक्टरीमध्ये प्रेस कंपोनेंट आयटमची तपासणी करिता माणूस पाहिजेत. दीपक हार्डवेअर मार्ट लोअर परेल 9 ते 6 संपर्क- **7021428720.** {NC260982}

**पाहिजेत**

मुलुंडयेथे बँकसाठी फील्ड स्टाफ हवा आहे, पगार 15,000/- ते 20,000/- वयोमर्यादा 18 ते 35 (शिक्षण-१०वी, Pass) संपर्क:- **7021506468** {NC260980}

बँक जॉबसाठी मुला, मुलींची भरती. पगार 18800/- ते 35000/- **8788968016** {NC260978}

ईको कार्गोसाठी ड्रायव्हर पाहिजेत. आकर्षक वेतन. त्वरित संपर्क (फोर्ट): **9326729909** {NC260979}

**व्यवसायविषयक**

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा अनिरुद्धा दादर- **9076403434/ 8652643434** {NC260937}

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

**- मॅनेजर, 'नवाकाळ'**


# महावितरणसंबंधी तक्रार नोंदणी नियंत्रण कक्षाशी संपर्क साधा

■ मुंबई

**वीजपुरवठ्याशी** संबंधित कोणतीही तक्रार, बिघाड अथवा आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास ग्राहकांनी क्षेत्रीय अभियंते किंवा कर्मचाऱ्यांना थेट संपर्क करण्याऐवजी महावितरणच्या २४७ नियंत्रण कक्ष, टोल-फ्री क्रमांक अथवा डिजिटल सुविधांचा वापर करून तक्रार नोंदवावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

नियंत्रण कक्षामार्फत नोंदविलेल्या तक्रारींची अधिकृत नोंद होऊन त्यावर तत्काळ कार्यवाही केली जाते. तसेच तक्रारींचा संगणकीय पद्धतीने पाठपुरावा केला जात असल्याने त्यांच्या निराकरणावर प्रभावी देखरेख ठेवणे शक्य होते.

वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर अथवा तांत्रिक बिघाडाच्या वेळी क्षेत्रीय अभियंते आणि कर्मचारी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे काम करत असतात. अशा परिस्थितीत त्यांना मोठ्या प्रमाणात येणारे दूरध्वनी स्वीकारणे शक्य होत नाही. तसेच दुरुस्तीची कामे सुरू असताना वारंवार फोन कॉलमुळे कामात व्यत्यय येऊन वीजपुरवठा सुरळीत करण्यास विलंब होण्याची तसेच सुरक्षेच्या दृष्टीने धोका निर्माण होण्याची शक्यता असते.

# विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीला भाविकांच्या सोयीसाठी ३ हेक्टर जमीन!

■ मुंबई



**पंढरपूर** येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांसाठी सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मंदिर समितीला यमाई तलावालगतची ३ हेक्टर १२ गुंठे (सुमारे ७.७५ एकर) शासकीय जमीन देण्यास मंजुरी दिली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत माहिती दिली.

ही जमीन गट क्रमांक १६१ मधील असून ती श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीला देण्यात आली आहे. मंदिर समितीच्या कार्यकारी अधिकाऱ्यांनी भाविकांच्या सोयी-सुविधांसाठी या जागेची मागणी केली होती.या जागेवर भाविकांसाठी आवश्यक सुविधा उभारण्यात येणार आहेत. तसेच 'गोमाता पालन-संवर्धन केंद्र' सुरू करण्याचाही प्रस्ताव आहे. पंढरपूरमध्ये वर्षभर मोठ्या संख्येने भाविक येतात. यात्राकाळात होणारी गर्दी लक्षात घेता या निर्णयामुळे भाविकांना अधिक चांगल्या सुविधा मिळण्याची अपेक्षा आहे. सरकारने जमीन देताना काही अटी घातल्या आहेत. मंजूर केलेल्या उद्देशासाठी म्हणजेच भाविकांच्या सुविधा आणि गोमाता संवर्धनासाठी तीन वर्षांच्या आत या जागेचा वापर सुरू करणे बंधनकारक राहणार आहे.तसेच ही जमीन केवळ मंजूर कामांसाठीच वापरता येणार आहे. इतर कोणत्याही तात्पुरत्या किंवा कायमस्वरूपी वापरासाठी राज्य सरकारची पूर्वपरवानगी घ्यावी लागणार आहे.

# सायबर गुन्हेगार म्हणजे 'परजीवी'
## सरन्यायाधीश सूर्य कांत यांची टिप्पणी



■ नवी दिल्ली

**बेरोजगार** तरुणांची तुलना 'कॉकरोच'शी केल्यामुळे निर्माण झालेला वाद ताजा असतानाच आज सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांवर नाराजी व्यक्त करताना सर्वोच्च न्यायालयाने सायबर गुन्हेगारांना 'परजीवी' अशी उपमा दिली. विविध राज्यांमध्ये दाखल असलेले गुन्हे एकत्र करण्याची मागणी करणाऱ्या एका आरोपीची याचिका फेटाळताना सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने हे निरीक्षण नोंदवले.

निष्पाप गुंतवणूकदारांची फसवणूक करून त्यांचे लाखो-कोट्यवधी रुपये लुबाडणाऱ्या सायबर गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. या प्रकरणात आरोपीने देशातील विविध राज्यांमध्ये स्वतःविरोधात दाखल असलेले एफआयआर एकत्र करण्याची मागणी केली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने ही मागणी मान्य करण्यास नकार दिला. संबंधित दिलासा मिळवण्यासाठी आरोपीने संबंधित उच्च न्यायालयात जाण्याचा सल्लाही खंडपीठाने दिला. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी निरीक्षण नोंदवताना म्हटले की, तुम्ही लोक परजीवी आहात. निष्पाप लोकांकडून पैसे उकळून त्यांची फसवणूक करता. सायबर गुन्हेगारांविरोधात अत्यंत कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. सायबर गुन्हेगार एका राज्यापुरते मर्यादित राहत नाहीत. ते एका राज्यात फसवणूक करून दुसऱ्या राज्यात जाऊन पुन्हा गुन्हे करतात. त्यामुळे अशा आरोपींना तुरुंगात ठेवणे हेच समाजाच्या हिताचे आहे.

# म्हाडाला असहकार्य करणाऱ्या पीएमजीपी वसाहतीतील रहिवाशांचे वीज-पाणी कापणार

■ मुंबई

**जोगेश्वरी** (पूर्व) पीएमजीपी वसाहतीतील १७ इमारती अतिधोकादायक आहेत. यामध्ये राहणाऱ्या रहिवाशांना चांदिवली येथे म्हाडाकडून पर्यायी घरे देण्यात येत आहेत किंवा दरमहा २० हजार रुपये घरभाडे देण्यात येणार आहेत. जे कुणी याला प्रतिसाद देणार नाहीत, अशा रहिवाशांच्या घरातील वीज व पाणीपुरवठा खंडीत केला जाईल. किंबहुना वेळप्रसंगी पोलीस बंदोबस्तात सक्तीने इमारती रिकाम्या केल्या जातील, अशी माहिती म्हाडाचे उपमुख्य अभियंता राहुल व्हटकर यांनी दिली.

या वसाहतीत १७ इमारती अत्यंत जीर्ण अवस्थेत आहेत. यामध्ये ९४२ निवासी व ४२ अनिवासी असे एकूण ९८४ गाळे आहेत. म्हाडाकडून या वसाहतीचा पुनर्विकास करण्यात येणार आहे. याबाबत इमारतीतील खोल्या रिकामी करण्यासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून रहिवाशांची म्हाडाकडून मनःधरणी करण्यात येत आहे, असे सांगून उपमुख्य अभियंता व्हटकर म्हणाले, ९८४ रहिवासी आहेत. आतापर्यंत ९१ जणांनी खोल्या रिकामी केल्या आहेत. उर्वरित जणांकडून प्रतिसाद दिला जात नाही. अशांच्या खोल्या पुढील आठवड्यात सक्तीने रिकामी करण्याचा निर्णय म्हाडाकडून घेतला जाणार आहे.

# उत्तराखंडमध्ये संशयित दहशतवाद्याला अटक

■ डेहराडून

**उत्तराखंडमधील** उधमसिंह नगर येथे सुरक्षा यंत्रणांनी संयुक्त कारवाई करत एका संशयित दहशतवाद्याला अटक केली आहे. त्याच्याकडून चीनमध्ये बनवलेली पिस्तुले, मोठ्या प्रमाणात दारुगोळा आणि हेरॉईन जप्त करण्यात आले आहे. लष्कर, सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) आणि पंजाब पोलिसांकडून मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे उत्तराखंड स्पेशल टास्क फोर्सने (एसटीएफ) ही कारवाई केली. अटक करण्यात आलेल्या संशयिताची ओळख ईशानप्रीत सिंग अशी असून, तो पंजाबमधील अमृतसरचा रहिवासी आहे. त्याच्याकडून तीन जिगाना पिस्तुले, तीन बरेटा पिस्तुले, चीनमध्ये बनवलेली सहा पिस्तुले, २० मॅगझिन तसेच सुमारे ९०० ग्रॅम हेरॉईन जप्त करण्यात आले.

प्राथमिक तपासात ही शस्त्रे पाकिस्तानमधून ड्रोनच्या माध्यमातून पंजाब सीमेवर पोहोचवण्यात आल्याची माहिती आहे. तसेच १५ ऑगस्टपूर्वी एखादी मोठी घातपाती कारवाई करण्याच्या तयारीत असल्याचा संशय सुरक्षा यंत्रणांनी व्यक्त केला आहे.

# दहिसर-भाईंदर मार्गासाठी ५२ कोटींचा सल्लागार

■ मुंबई

**दहिसर-भाईंदर** उन्नत मार्ग प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यात येणार आहे. यासाठी मुंबई महापालिका ५२ कोटी ५० लाख रुपये खर्च करणार असून, यासंदर्भातील प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर केला आहे. दहिसर पश्चिम ते भाईंदर पश्चिम दरम्यान होणाऱ्या या उन्नत मार्गामुळे पश्चिम उपनगरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.

या प्रकल्पासाठी मेसर्स निप्पोन कोई इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि मेसर्स काईट अलाईड सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांची संयुक्त भागीदार म्हणून नियुक्ती प्रस्तावित आहे. सल्लागाराकडून प्रकल्पाचे आराखडे, संकल्पचित्रे तपासणे, कामांच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवणे आणि दैनंदिन कामांचे पर्यवेक्षण करणे अशी जबाबदारी पार पाडली जाणार आहे. या प्रकल्पांतर्गत ४.५८ किमी लांबीचा चार मार्गिकांचा उन्नत रस्ता बांधण्यात येणार असून त्यासाठी सुमारे ३ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. हा मार्ग पूर्ण झाल्यानंतर दहिसर पश्चिम ते भाईंदर पश्चिम प्रवास सुमारे १० मिनिटांत करता येणार आहे. हा मार्ग वर्सोवा-दहिसर कोस्टल रोडला जोडला जाणार आहे.

# संजय देशमुखांना गाडीसह पेटवून देण्याची धमकी

■ वाशिम

**संजय** देशमुख यांचे नाव फुटीर खासदारांमध्ये आल्याचे कळताच वाशिम जिल्ह्यातील उबाठाचे पदाधिकारी आणि शिवसैनिक कमालीचे संतप्त झाले. देशमुख यांनी जर उबाठाशी गद्दारी केली तर त्यांनी वाशिम जिल्ह्यात पुन्हा येण्याचे धाडस करू नये. शिंदेसेनेत सामिल होऊन ते जर वाशिममध्ये आले तर त्यांच्या गाडीसह त्यांना पेटवून देऊ, अशी थेट धमकी उबाठाचे पदाधिकारी विजय शेंडगे यांनी दिली.

# सामाजिक-राजकीय आंदोलनांतील ४४ खटले सरकार मागे घेणार

■ मुंबई

**राज्यातील** धार्मिक, सामाजिक आणि राजकीय आंदोलनांदरम्यान दाखल करण्यात आलेले ४४ खटले मागे घेण्याची शिफारस मंत्रिमंडळ उपसमितीने राज्य सरकारकडे केली आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री तथा समितीचे अध्यक्ष अॅड. आशिष शेलार यांनी याबाबत माहिती दिली. राज्यातील विविध राजकीय आणि सामाजिक आंदोलनांमुळे दाखल झालेल्या खटल्यांचा आढावा घेण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली आहे. या समितीची बैठक आज सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडली. यापूर्वी झालेल्या बैठकीत ७७ खटले मागे घेण्याची शिफारस करण्यात आली होती. तर आजच्या बैठकीत पोलिसांकडे प्राप्त झालेल्या १३३ अर्जांपैकी ४४ अर्जदारांविरोधातील खटले मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. स्त्रीविषयक गुन्हे, गंभीर स्वरूपाचे फौजदारी गुन्हे तसेच वैयक्तिक आणि दिवाणी स्वरूपाची प्रकरणे शासनाच्या धोरणानुसार माफ करता येत नसल्याने अशा प्रकारच्या खटल्यांना समितीने स्पष्टपणे नकार दिला आहे.

# आजचे राशी भविष्य



गुरुवार ता. १८ जून २०२६

ज्योतिष पंडीत अर्चना तारु

| | |
|---|---|
| **मेष** | नवीन कामात व्यस्त राहाल. कामाचा ताण जाणवेल. नोकरीत लाभ मिळतील. |
| **वृषभ** | आर्थिक व्यवहार जपून करावेत. कुटुंबियांबरोबर छोट्या सहलीचे आयोजन कराल. मित्रमंडळी भेटतील. |
| **मिथुन** | नवीन ओळखीचा फायदा होईल. खर्चाचे नियोजन करावे लागेल. आवडीचे भोजन मिळेल. |
| **कर्क** | कार्यक्षेत्रात अथक परिश्रम घ्यावे लागतील. अपेक्षित धनलाभ होईल. नोकरीत मान वाढेल. |
| **सिंह** | वडिलधाऱ्यांचे मन सांभाळावे लागेल. वाहने जपून चालवा. कामानिमित्त प्रवास घडू शकतो. |
| **कन्या** | कामे वेळेत पूर्ण होतील. मित्रांची भेट होईल. छोट्या सहलीचा आनंद लुटाल. |
| **तूळ** | नोकरीमध्ये तुमची जबाबदारी पूर्ण कराल. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल. व्यावसायिक प्रवास करावे लागतील. |
| **वृश्चिक** | भाग्याची साथ लाभेल. अडचणी दूर होऊ लागतील. धार्मिक स्थळांना भेट देण्याचा योग. |
| **धनु** | व्यवसायात भागीदार सहकार्य करेल. अचानक धनलाभाचे योग. आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. |
| **मकर** | वडिलोपार्जित व्यवसाय फायदेशीर ठरतील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखण्यात यश मिळेल. |
| **कुंभ** | नोकरीमध्ये अधिकारप्राप्तीचे योग येतील. संततीस नवीन संधी उपलब्ध होतील. व्यवसयात नवीन गुंतवणूक करण्यासाठी प्रयत्नशील राहाल. |
| **मीन** | उत्साहाने कार्यरत राहाल. आनंदी वातावरण राहील. मालमत्तेसंबंधी कामे मार्गी लागतील. विवाहाचे प्रस्ताव येतील. |

# लॉटरी

## महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी

निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 24 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 17/06/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-03 : 2655** — प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0670 | 1032 | 2770 (डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली) | 7178 | 7505 | 8552 | 8770 | 8896 | 9020 | 9672 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0807 | 1075 | 2179 | 5613 | 6210 | 6252 | 7277 | 7484 | 9227 | 9371 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0343 | 1816 | 3672 | 4111 | 6372 | 7207 | 7217 | 8836 | 8902 | 9201 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 3219 | 3404 | 3578 | 4026 | 4059 | 6196 | 6728 | 8044 | 8922 | 9021 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सहावे बक्षिस रु.100/- | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1169 | 2123 | 3036 | 3831 | 4644 | 5640 | 6674 | 7546 | 8214 | 9179 |
| | | 1198 | 2129 | 3068 | 3863 | 4679 | 5642 | 6686 | 7570 | 8218 | 9210 |
| 0003 | 0682 | 1247 | 2204 | 3103 | 3883 | 4728 | 5672 | 6712 | 7573 | 8222 | 9211 |
| 0013 | 0683 | 1252 | 2220 | 3105 | 4035 | 4743 | 5750 | 6756 | 7579 | 8226 | 9357 |
| 0080 | 0685 | 1395 | 2251 | 3143 | 4042 | 4771 | 5785 | 6764 | 7581 | 8276 | 9499 |
| 0106 | 0695 | 1430 | 2262 | 3162 | 4045 | 4805 | 5814 | 6790 | 7654 | 8378 | 9510 |
| 0146 | 0755 | 1436 | 2263 | 3183 | 4047 | 4817 | 5931 | 6834 | 7677 | 8384 | 9568 |
| 0160 | 0779 | 1501 | 2269 | 3218 | 4106 | 4912 | 5951 | 6944 | 7707 | 8463 | 9620 |
| 0162 | 0785 | 1511 | 2275 | 3276 | 4204 | 4914 | 5968 | 6958 | 7747 | 8480 | 9684 |
| 0190 | 0804 | 1523 | 2311 | 3289 | 4274 | 4930 | 6062 | 6999 | 7759 | 8652 | 9689 |
| 0222 | 0893 | 1541 | 2456 | 3310 | 4299 | 5035 | 6065 | 7024 | 7763 | 8681 | 9699 |
| 0261 | 0896 | 1546 | 2533 | 3328 | 4345 | 5081 | 6136 | 7092 | 7921 | 8685 | 9715 |
| 0308 | 0901 | 1612 | 2572 | 3332 | 4364 | 5115 | 6163 | 7135 | 7951 | 8760 | 9749 |
| 0322 | 0920 | 1777 | 2612 | 3354 | 4427 | 5125 | 6222 | 7150 | 7959 | 8787 | 9782 |
| 0451 | 0963 | 1831 | 2687 | 3371 | 4432 | 5154 | 6269 | 7196 | 7964 | 8837 | 9833 |
| 0468 | 1009 | 1843 | 2750 | 3374 | 4437 | 5155 | 6351 | 7237 | 7970 | 8869 | 9889 |
| 0551 | 1014 | 1917 | 2777 | 3398 | 4451 | 5258 | 6428 | 7277 | 7978 | 8926 | 9936 |
| 0552 | 1020 | 1924 | 2857 | 3527 | 4461 | 5437 | 6526 | 7327 | 8010 | 8998 | 9937 |
| 0588 | 1035 | 1944 | 2860 | 3571 | 4486 | 5556 | 6624 | 7376 | 8067 | 9056 | 9967 |
| 0614 | 1098 | 2026 | 2922 | 3657 | 4499 | 5573 | 6637 | 7392 | 8076 | 9092 | 9972 |
| 0647 | 1115 | 2039 | 2980 | 3683 | 4509 | 5577 | 6657 | 7416 | 8185 | 9159 | 9973 |
| 0660 | 1141 | 2115 | 3035 | 3729 | 4547 | 5586 | 6662 | 7449 | 8187 | 9162 | 9974 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी

निकाल — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 24 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 17/06/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-06 : 5692** — किशोर लॉटरी सेंटर, सांगली

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2785 | | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 9707 | | | | | | | | | |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0620 | 1088 | 2620 | 3049 | 3185 | 3508 | 4030 | 6277 | 8666 | 9592 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1291 | 1317 | 2961 | 3258 | 4101 | 4311 | 4884 | 6430 | 7274 | 9289 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0343 | 1905 | 2592 | 2854 | 4176 | 4499 | 4913 | 6255 | 7150 | 8298 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1351 | 2420 | 3374 | 4363 | 5224 | 6063 | 7075 | 7881 | 8989 |
| | | 1376 | 2525 | 3380 | 4427 | 5366 | 6164 | 7186 | 7994 | 8994 |
| | | 1429 | 2538 | 3382 | 4453 | 5398 | 6202 | 7219 | 8001 | 9023 |
| 0000 | 0600 | 1524 | 2549 | 3505 | 4467 | 5440 | 6205 | 7226 | 8166 | 9142 |
| 0006 | 0610 | 1550 | 2599 | 3563 | 4512 | 5455 | 6213 | 7308 | 8311 | 9149 |
| 0024 | 0660 | 1557 | 2637 | 3589 | 4517 | 5459 | 6216 | 7347 | 8334 | 9191 |
| 0094 | 0717 | 1614 | 2682 | 3603 | 4534 | 5507 | 6228 | 7433 | 8354 | 9192 |
| 0110 | 0722 | 1615 | 2799 | 3691 | 4674 | 5515 | 6268 | 7470 | 8378 | 9196 |
| 0127 | 0750 | 1617 | 2814 | 3748 | 4678 | 5516 | 6275 | 7483 | 8469 | 9319 |
| 0210 | 0797 | 1661 | 2927 | 3768 | 4745 | 5583 | 6319 | 7503 | 8518 | 9437 |
| 0292 | 0824 | 1712 | 2973 | 3796 | 4814 | 5623 | 6512 | 7575 | 8543 | 9459 |
| 0325 | 0903 | 1959 | 2989 | 3821 | 4853 | 5685 | 6564 | 7605 | 8548 | 9499 |
| 0359 | 1089 | 1977 | 3063 | 3862 | 4884 | 5733 | 6566 | 7624 | 8556 | 9625 |
| 0407 | 1114 | 2007 | 3234 | 3883 | 4941 | 5793 | 6589 | 7636 | 8563 | 9629 |
| 0412 | 1139 | 2057 | 3243 | 3885 | 4967 | 5834 | 6607 | 7667 | 8683 | 9639 |
| 0420 | 1158 | 2187 | 3303 | 3893 | 4993 | 5850 | 6719 | 7705 | 8684 | 9692 |
| 0426 | 1199 | 2238 | 3306 | 3914 | 5056 | 5945 | 6809 | 7707 | 8686 | 9740 |
| 0470 | 1265 | 2242 | 3307 | 3933 | 5075 | 5950 | 6971 | 7724 | 8789 | 9838 |
| 0514 | 1269 | 2272 | 3312 | 3938 | 5115 | 5958 | 6985 | 7744 | 8800 | 9919 |
| 0556 | 1271 | 2322 | 3347 | 4122 | 5153 | 5993 | 7000 | 7759 | 8822 | 9950 |
| 0560 | 1336 | 2413 | 3358 | 4336 | 5160 | 6020 | 7055 | 7792 | 8976 | 9953 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र सह्याद्री — विजयालक्ष्मी विकली लॉटरी

निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 24 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 17/06/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SV-07 : 3333**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 2087 | 2277 | 2449 | 2591 | 3628 | 3688 | 3769 | 8021 | 8742 | 9106 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 2502 | 3148 | 3402 | 3835 | 3960 | 6056 | 7418 | 7514 | 8954 | 9677 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0084 | 1748 | 2257 | 2441 | 3331 | 6196 | 7269 | 7495 | 8379 | 9731 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. 300/- | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1064 | 2109 | 2972 | 3983 | 5449 | 6767 | 7676 | 8803 |
| | 1104 | 2152 | 3089 | 4099 | 5461 | 6781 | 7711 | 8820 |
| 0020 | 1119 | 2206 | 3135 | 4175 | 5735 | 6816 | 7757 | 8877 |
| 0093 | 1233 | 2218 | 3137 | 4267 | 5759 | 6963 | 7845 | 8925 |
| 0161 | 1283 | 2265 | 3187 | 4410 | 5852 | 6990 | 8071 | 8981 |
| 0183 | 1351 | 2268 | 3194 | 4434 | 5863 | 7071 | 8143 | 9069 |
| 0189 | 1386 | 2300 | 3303 | 4447 | 5889 | 7170 | 8182 | 9599 |
| 0490 | 1417 | 2340 | 3324 | 4454 | 5995 | 7317 | 8245 | 9622 |
| 0563 | 1700 | 2491 | 3373 | 4684 | 6028 | 7402 | 8442 | 9869 |
| 0753 | 1701 | 2598 | 3741 | 4740 | 6116 | 7486 | 8488 | 9918 |
| 1012 | 1977 | 2752 | 3933 | 5150 | 6156 | 7487 | 8529 | 9924 |
| 1046 | 2024 | 2854 | 3938 | 5305 | 6387 | 7545 | 8648 | 9953 |
| 1059 | 2077 | 2902 | 3964 | 5350 | 6756 | 7663 | 8668 | 9955 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत दर बुधवारी — तिकीट किंमत रु. 50/- — सोडत क्र. 24 — सोडत दिनांक 17/06/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **AK-01 : 7248**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी — **7248** — श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **9555** — श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई; श्री गुरुदेव दत्त लॉटरी एजन्सी - पुणे

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1056 | 1482 | 1886 | 2542 | 4441 | 4582 | 4996 | 6781 | 8147 | 9494 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0041 | 3412 | 5509 | 6753 | 7196 | 7500 | 7605 | 8203 | 8864 | 9804 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0180 | 1084 | 2738 | 5327 | 5466 | 6309 | 7294 | 8207 | 8373 | 9028 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0159 | 1440 | 1803 | 2792 | 3714 | 5697 | 6648 | 7127 | 7164 | 8915 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1253 | 2217 | 3001 | 3586 | 4404 | 5178 | 5825 | 6550 | 7101 | 7881 | 8606 | 9205 |
| | | 1291 | 2225 | 3007 | 3602 | 4405 | 5190 | 5832 | 6561 | 7155 | 7883 | 8618 | 9229 |
| | | 1292 | 2229 | 3020 | 3616 | 4413 | 5253 | 5839 | 6562 | 7167 | 7907 | 8624 | 9232 |
| | | 1307 | 2232 | 3043 | 3647 | 4424 | 5256 | 5853 | 6587 | 7177 | 7908 | 8648 | 9239 |
| | | 1314 | 2269 | 3050 | 3708 | 4428 | 5285 | 5855 | 6606 | 7206 | 7979 | 8672 | 9256 |
| 0000 | 0883 | 1316 | 2275 | 3060 | 3714 | 4446 | 5322 | 5881 | 6609 | 7231 | 7991 | 8689 | 9329 |
| 0010 | 0901 | 1334 | 2289 | 3074 | 3755 | 4454 | 5335 | 5913 | 6622 | 7250 | 8008 | 8690 | 9347 |
| 0019 | 0902 | 1358 | 2291 | 3106 | 3780 | 4493 | 5340 | 5922 | 6636 | 7254 | 8018 | 8696 | 9366 |
| 0022 | 0903 | 1361 | 2292 | 3114 | 3789 | 4504 | 5347 | 5956 | 6639 | 7388 | 8041 | 8752 | 9380 |
| 0045 | 0920 | 1378 | 2320 | 3117 | 3811 | 4534 | 5353 | 5958 | 6641 | 7397 | 8051 | 8764 | 9398 |
| 0048 | 0930 | 1387 | 2328 | 3125 | 3838 | 4574 | 5354 | 5960 | 6646 | 7436 | 8086 | 8778 | 9409 |
| 0049 | 0950 | 1388 | 2332 | 3131 | 3839 | 4628 | 5358 | 5961 | 6654 | 7472 | 8138 | 8787 | 9417 |
| 0065 | 0982 | 1403 | 2354 | 3134 | 3863 | 4630 | 5416 | 5995 | 6661 | 7473 | 8186 | 8806 | 9440 |
| 0071 | 1006 | 1413 | 2361 | 3153 | 3933 | 4631 | 5429 | 6002 | 6663 | 7475 | 8200 | 8808 | 9461 |
| 0091 | 1011 | 1447 | 2378 | 3160 | 3950 | 4649 | 5434 | 6039 | 6683 | 7490 | 8207 | 8824 | 9495 |
| 0095 | 1024 | 1448 | 2425 | 3203 | 3979 | 4660 | 5465 | 6056 | 6695 | 7509 | 8211 | 8852 | 9499 |
| 0147 | 1031 | 1474 | 2426 | 3253 | 3983 | 4685 | 5474 | 6061 | 6711 | 7524 | 8234 | 8860 | 9524 |
| 0172 | 1067 | 1481 | 2436 | 3308 | 4042 | 4694 | 5478 | 6065 | 6716 | 7548 | 8238 | 8862 | 9539 |
| 0205 | 1083 | 1515 | 2472 | 3334 | 4052 | 4710 | 5500 | 6066 | 6732 | 7559 | 8240 | 8864 | 9591 |
| 0215 | 1093 | 1525 | 2492 | 3336 | 4054 | 4723 | 5506 | 6067 | 6745 | 7572 | 8282 | 8866 | 9597 |
| 0227 | 1103 | 1559 | 2582 | 3337 | 4079 | 4725 | 5515 | 6123 | 6746 | 7582 | 8312 | 8869 | 9659 |
| 0238 | 1104 | 1561 | 2622 | 3348 | 4081 | 4788 | 5534 | 6132 | 6750 | 7647 | 8313 | 8873 | 9679 |
| 0254 | 1111 | 1562 | 2624 | 3350 | 4085 | 4807 | 5535 | 6153 | 6767 | 7656 | 8332 | 8884 | 9740 |
| 0315 | 1113 | 1590 | 2628 | 3354 | 4086 | 4818 | 5542 | 6168 | 6779 | 7657 | 8372 | 8887 | 9752 |
| 0350 | 1116 | 1664 | 2660 | 3360 | 4087 | 4837 | 5544 | 6169 | 6780 | 7682 | 8377 | 8934 | 9759 |
| 0390 | 1118 | 1725 | 2662 | 3367 | 4156 | 4842 | 5548 | 6269 | 6787 | 7698 | 8383 | 8948 | 9774 |
| 0407 | 1143 | 1748 | 2701 | 3370 | 4158 | 4869 | 5554 | 6277 | 6795 | 7729 | 8396 | 8958 | 9775 |
| 0409 | 1144 | 1856 | 2720 | 3374 | 4184 | 4878 | 5566 | 6306 | 6803 | 7745 | 8412 | 8961 | 9779 |
| 0439 | 1151 | 1929 | 2722 | 3376 | 4204 | 4888 | 5567 | 6308 | 6809 | 7751 | 8487 | 8962 | 9784 |
| 0556 | 1153 | 1945 | 2724 | 3382 | 4225 | 4934 | 5568 | 6326 | 6864 | 7765 | 8489 | 8999 | 9789 |
| 0561 | 1156 | 1951 | 2725 | 3397 | 4251 | 5025 | 5570 | 6330 | 6883 | 7766 | 8494 | 9039 | 9796 |
| 0606 | 1170 | 2009 | 2780 | 3417 | 4282 | 5029 | 5575 | 6336 | 6906 | 7783 | 8499 | 9045 | 9840 |
| 0672 | 1178 | 2028 | 2793 | 3433 | 4304 | 5052 | 5579 | 6362 | 6917 | 7807 | 8509 | 9049 | 9879 |
| 0700 | 1187 | 2034 | 2822 | 3434 | 4307 | 5067 | 5595 | 6406 | 6925 | 7819 | 8516 | 9126 | 9896 |
| 0706 | 1189 | 2059 | 2889 | 3479 | 4322 | 5076 | 5597 | 6426 | 6949 | 7820 | 8518 | 9146 | 9922 |
| 0768 | 1201 | 2102 | 2904 | 3489 | 4323 | 5085 | 5670 | 6430 | 6957 | 7827 | 8564 | 9159 | 9935 |
| 0778 | 1218 | 2146 | 2935 | 3512 | 4344 | 5107 | 5675 | 6450 | 6987 | 7842 | 8579 | 9193 | 9943 |
| 0808 | 1222 | 2203 | 2944 | 3527 | 4394 | 5108 | 5752 | 6484 | 6996 | 7857 | 8582 | 9194 | 9946 |
| 0830 | 1231 | 2212 | 2946 | 3567 | 4396 | 5128 | 5755 | 6505 | 7010 | 7862 | 8588 | 9196 | 9972 |
| 0876 | 1237 | 2214 | 2972 | 3585 | 4402 | 5170 | 5795 | 6536 | 7084 | 7880 | 8589 | 9198 | 9996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गौरव मंथली लॉटरी

Draw No.100th • Dt: 17-06-2026 — 4.00 pm • Ticket Rs.50/-

1st Prize Rs. 27 लाख — **G01-0226**

(COMMON TO ALL SERIES)

| | |
|---|---|
| 2nd Prize Rs.5,000/- 1004 3901 | 3rd Prize Rs.3,000/- 2826 3281 |
| 4th Prize Rs.2,000/- 0329 1968 | 5th Prize Rs.1,000/- 2061 5687 |

6th Prize Rs.100/- (COMMON TO ALL SERIES)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0010 | 1110 | 2193 | 3231 | 4042 | 4970 | 5925 | 6896 | 7808 | 8937 |
| 0011 | 1112 | 2196 | 3238 | 4045 | 5016 | 5941 | 6915 | 7826 | 8999 |
| 0014 | 1114 | 2200 | 3243 | 4055 | 5031 | 5948 | 6936 | 7875 | 9029 |
| 0026 | 1153 | 2204 | 3269 | 4094 | 5053 | 5958 | 6960 | 7891 | 9088 |
| 0031 | 1165 | 2220 | 3297 | 4124 | 5056 | 5968 | 6962 | 7937 | 9091 |
| 0032 | 1181 | 2222 | 3324 | 4158 | 5057 | 5972 | 7026 | 7962 | 9092 |
| 0036 | 1194 | 2224 | 3326 | 4161 | 5081 | 6010 | 7049 | 8003 | 9093 |
| 0048 | 1216 | 2238 | 3329 | 4163 | 5085 | 6017 | 7059 | 8081 | 9109 |
| 0053 | 1218 | 2290 | 3331 | 4241 | 5095 | 6018 | 7065 | 8098 | 9126 |
| 0061 | 1236 | 2323 | 3353 | 4244 | 5115 | 6021 | 7070 | 8100 | 9134 |
| 0068 | 1278 | 2349 | 3359 | 4257 | 5151 | 6046 | 7071 | 8106 | 9160 |
| 0070 | 1298 | 2368 | 3364 | 4318 | 5203 | 6048 | 7086 | 8121 | 9181 |
| 0096 | 1349 | 2380 | 3366 | 4329 | 5225 | 6078 | 7090 | 8147 | 9191 |
| 0102 | 1357 | 2386 | 3380 | 4330 | 5251 | 6138 | 7109 | 8198 | 9228 |
| 0103 | 1364 | 2389 | 3385 | 4348 | 5277 | 6146 | 7124 | 8202 | 9263 |
| 0105 | 1395 | 2404 | 3438 | 4397 | 5290 | 6161 | 7127 | 8212 | 9332 |
| 0180 | 1409 | 2432 | 3439 | 4398 | 5306 | 6182 | 7157 | 8238 | 9396 |
| 0205 | 1415 | 2451 | 3448 | 4414 | 5310 | 6188 | 7162 | 8247 | 9411 |
| 0212 | 1456 | 2452 | 3458 | 4421 | 5388 | 6221 | 7172 | 8248 | 9448 |
| 0260 | 1471 | 2477 | 3463 | 4422 | 5411 | 6254 | 7173 | 8322 | 9472 |
| 0276 | 1525 | 2479 | 3470 | 4424 | 5438 | 6260 | 7179 | 8357 | 9490 |
| 0306 | 1557 | 2483 | 3511 | 4429 | 5505 | 6303 | 7197 | 8375 | 9497 |
| 0323 | 1597 | 2520 | 3513 | 4440 | 5514 | 6363 | 7207 | 8391 | 9526 |
| 0325 | 1637 | 2530 | 3523 | 4443 | 5524 | 6366 | 7208 | 8398 | 9529 |
| 0330 | 1675 | 2536 | 3530 | 4465 | 5532 | 6380 | 7280 | 8418 | 9553 |
| 0387 | 1710 | 2537 | 3535 | 4471 | 5536 | 6402 | 7357 | 8448 | 9554 |
| 0400 | 1711 | 2562 | 3573 | 4476 | 5551 | 6423 | 7386 | 8453 | 9584 |
| 0456 | 1716 | 2590 | 3595 | 4477 | 5557 | 6431 | 7392 | 8454 | 9596 |
| 0483 | 1742 | 2609 | 3596 | 4495 | 5563 | 6495 | 7393 | 8516 | 9597 |
| 0504 | 1748 | 2629 | 3603 | 4498 | 5576 | 6499 | 7432 | 8541 | 9609 |
| 0506 | 1789 | 2660 | 3613 | 4501 | 5593 | 6516 | 7437 | 8552 | 9623 |
| 0520 | 1791 | 2712 | 3623 | 4504 | 5594 | 6548 | 7491 | 8575 | 9692 |
| 0534 | 1811 | 2720 | 3638 | 4537 | 5596 | 6624 | 7526 | 8586 | 9696 |
| 0548 | 1812 | 2727 | 3641 | 4539 | 5605 | 6625 | 7527 | 8588 | 9728 |
| 0608 | 1819 | 2729 | 3669 | 4546 | 5635 | 6635 | 7542 | 8602 | 9739 |
| 0659 | 1828 | 2754 | 3693 | 4580 | 5639 | 6639 | 7562 | 8603 | 9744 |
| 0670 | 1831 | 2792 | 3698 | 4604 | 5675 | 6641 | 7567 | 8618 | 9786 |
| 0672 | 1859 | 2827 | 3711 | 4611 | 5721 | 6660 | 7575 | 8667 | 9826 |
| 0682 | 1872 | 2850 | 3773 | 4620 | 5730 | 6666 | 7598 | 8722 | 9834 |
| 0745 | 1879 | 2927 | 3781 | 4630 | 5749 | 6673 | 7671 | 8733 | 9873 |
| 0781 | 1906 | 2933 | 3794 | 4646 | 5778 | 6686 | 7672 | 8751 | 9874 |
| 0785 | 1913 | 2936 | 3884 | 4668 | 5779 | 6696 | 7716 | 8758 | 9890 |
| 0806 | 1923 | 2946 | 3907 | 4672 | 5785 | 6775 | 7717 | 8781 | 9892 |
| 0850 | 1941 | 2999 | 3917 | 4745 | 5807 | 6785 | 7728 | 8788 | 9908 |
| 0903 | 1955 | 3005 | 3920 | 4801 | 5825 | 6787 | 7743 | 8800 | 9921 |
| 0904 | 2027 | 3101 | 3949 | 4821 | 5828 | 6826 | 7749 | 8838 | 9949 |
| 1044 | 2112 | 3127 | 3971 | 4844 | 5835 | 6839 | 7780 | 8845 | 9950 |
| 1074 | 2120 | 3137 | 3982 | 4854 | 5869 | 6854 | 7781 | 8882 | 9955 |
| 1086 | 2131 | 3140 | 3985 | 4860 | 5891 | 6861 | 7787 | 8915 | 9964 |
| 1097 | 2185 | 3193 | 4035 | 4882 | 5898 | 6864 | 7790 | 8927 | 9999 |

Check result with Official Gazette. Issued by : Director, Maharashtra State Lottery

## शुभ राशी ता. १८/६/२०२६

| | | |
|---|---|---|
| १ | ६ | ८ |
| १४ | ६४ | ८४ |
| १९ | ६९ | ८९ |
| १२८ | १६८ | १२५ |
| ५६० | २४० | ४६८ |

# ऑस्ट्रेलियाचा स्टार अष्टपैलू खेळाडू

ऑस्ट्रेलियाचा स्टार अष्टपैलू खेळाडू मिशेल मार्शचा जन्म २० ऑक्टोबर १९९१. मिशेल मार्श हा ऑस्ट्रेलियन आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू आणि ऑस्ट्रेलिया राष्ट्रीय क्रिकेट संघाचा टी-२० मध्ये सध्याचा कर्णधार. मिशेल मार्श हा ज्योफ मार्श यांचा मुलगा आहे.

## मिशेल मार्श



मिशेल मार्शची फलंदाजी त्याचे वडील ज्योफ मार्श यांच्या विरुद्ध आहे, ज्योफ मार्श यांचा स्ट्राईक रेट ११७ वन डे सामन्यांत ५५. इतका होता, तर मिचेलचा स्ट्राईक रेट ९३.८५ इतका आहे. मार्शने २०११-१२ हंगामात पदार्पण करून क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांमध्ये ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व केले. मार्श २०१५ क्रिकेट विश्वचषक आणि २०२१ टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघाचा एक भाग होता. मार्श हा अष्टपैलू खेळाडू आहे. फलंदाजीसोबतच तो मध्यमगती गोलंदाजही आहे. पण या विश्वचषकात तो कदाचित सलामीवीर म्हणून खेळत आहे. पण कर्णधार पॅट कमिन्सने त्याला पाकिस्तानविरुद्ध एकही षटक टाकले नाही. तर आतापर्यंत झालेल्या ४ विश्वचषक सामन्यांमध्ये फक्त मार्शने एक षटक टाकले आहे.

मिशेल मार्शने काल पाकिस्तान विरुद्धच्या सामन्यात स्पोटक फलंदाजी करत शतक झळकावले. विश्वचषकाच्या इतिहासात वाढदिवसाच्या शुभमुहूर्तावर शतक झळकावणारा तो जगातील दुसरा फलंदाज ठरला आहे. याआधी या विशेष कामगिरीची नोंद फक्त न्यूझीलंड क्रिकेट संघाचा माजी फलंदाज रॉस टेलरच्या नावावर होती. टेलरने२०११ मध्ये त्याच्या वाढदिवसाच्या शुभ मुहूर्तावर पल्लेकेले येथे पाकिस्तानविरुद्ध शतक झळकावले होते.२०२३ मध्ये मिचेल मार्शने सोमवारी ग्रेटा मॅकशी लग्न केले.

# अपूर्ण लेआऊट विकासाचे कारण सांगून डीम्ड कन्व्हेअन्स नाकारता येणार नाही

**उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय**

■ मुंबई

**संपूर्ण** लेआऊटचा विकास अद्याप पूर्ण झालेला नाही, असे कारण देत सक्षम प्राधिकरण गृहनिर्माण संस्थेचा डीम्ड कन्व्हेअन्सचा (अभिहस्तांतरण) अर्ज फेटाळू शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय उच्च न्यायालयाने दिला. न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या एकलपीठाने दिलेल्या या निर्णयामुळे गृहनिर्माण संस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.

दिंडोशीतील उपवन वुडलँड्स को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीच्या याचिकेवर न्यायमूर्ती संदीप मारणे यांनी हा निर्णय दिला. न्यायालयाने जिल्हा उपनिबंधक आणि सक्षम प्राधिकरणाचा २० मे २०२५ रोजीचा आदेश रद्द केला. दिंडोशी आणि चिंचवली येथील पाच भूखंडांच्या एका मोठ्या लेआउटवर 'एम/एस उपवन डेव्हलपर्स' यांनी 'उपवन वुडलँड्स' ही इमारत बांधली. २०१७ मध्ये इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र मिळाले आणि २०१८ मध्ये फ्लॅट खरेदीदारांनी सोसायटी नोंदणीकृत केली. सोसायटीने मोफा कायद्यानुसार २,७९९.९० चौरस मीटर जमिनीच्या डीम्ड कन्व्हेअन्ससाठी विकासकाकडे मागणी केली. विकासकाने मसुदा तयार केला, परंतु संपूर्ण मोठ्या लेआउटचा विकास पूर्ण झाल्यानंतरच कन्व्हेअन्स दिला जाईल, अशी अट घातली. या विलंबाविरोधात सोसायटीने सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागितली. मात्र प्राधिकरणाने विकासकाच्या बाजूने भूमिका घेत सोसायटीचा अर्ज फेटाळला होता. त्या निर्णयाला सोसायटीने उच्च न्यायालयात रिट याचिकेद्वारे आव्हान दिले होते. त्यावर सविस्तर सुनावणी घेत न्यायमूर्ती मारणे यांनी सक्षम प्राधिकरणाचा निर्णय चुकीचा ठरवला. संपूर्ण लेआउटचा विकास पूर्ण झालेला नसला, तरीही गृहनिर्माण संस्था ज्या भूखंडावर उभी आहे, त्या विशिष्ट भागाचे कन्व्हेअन्स मिळण्याचा हक्क सोसायटीला नाकारता येणार नाही, असे निरिक्षण न्यायालयाने नोंदवले.

# मोहोळ मार्गावर दुचाकीचा अपघात! एकाचा जागीच मृत्यू

■ मोहोळ

**पंढरपूरहून** मोहोळकडे येणाऱ्या दुचाकीस्वाराला चारचाकी वाहनाची धडक बसल्याने झालेल्या अपघातात इरफान सलीम कांबळे (४०) यांचा जागीच मृत्यू झाला, तर अलीम जाकीर शेख (वय ३०) हे गंभीर जखमी झाले. हा अपघात आज सकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास पाटकूल पाटीजवळ घडला.


इरफान कांबळे आणि अलीम शेख हे दुचाकीवरून बकरी घेऊन पंढरपूरहून मोहोळच्या दिशेने जात होते. पाटकूल पाटीजवळ आल्यानंतर त्यांच्या दुचाकीला चारचाकी वाहनाची धडक बसली. धडकेची तीव्रता इतकी होती की इरफान कांबळे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर अलीम शेख गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमीला मोहोळ ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

# मीरा-भाईंदरमध्ये एल निनोच्या प्रभावामुळे आज पाणीकपात

■ भाईंदर

**एल** निनो आणि इंडियन ओशन डायपोल (आयओडी) यांच्या प्रभावामुळे यंदा पावसाळा लांबण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. भविष्यात गंभीर पाणीटंचाई निर्माण होऊ नये, यासाठी मीरा-भाईंदर शहरात पाणीकपात लागू करण्यात आली असून गुरुवार १८ जून रोजी दुपारी १२ वाजेपासून ते शुक्रवार १९ जून रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) माध्यमातून होणारा पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार असल्याची माहिती मीरा-भाईंदर महापालिकेच्या पाणीपुरवठा व मलनिसारण विभागाने दिली आहे.

# डोकारे कारखाना सुरू न झाल्यास २६ जूनला सुरत-धुळे मार्ग आंदोलन



■ नवापूर

**नवापूर** तालुक्यातील डोकारे येथील आदिवासी सहकारी साखर कारखाना तात्काळ सुरू करण्यात यावा, या मागणीसाठी आदिवासी टायगर सेना, कारखान्याचे कर्मचारी, शेतकरी आणि सभासद यांनी आक्रमक भूमिका घेत तहसीलदारांना निवेदन सादर केले.डोकारे कारखाना सुरू न झाल्यास २६ जूनला सुरत-धुळे महामार्ग आंदोलन करणार असा इशारा देण्यात आला.

नवापूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. यावेळी पदाधिकारी, कारखाना कर्मचारी, शेतकरी व सभासद यांनी निवेदनावर स्वाक्षऱ्या करत घोषणाबाजी केली. त्यानंतर मोर्चाच्या स्वरूपात तहसील कार्यालयावर जात तहसीलदार दत्तात्रय जाधव आणि पोलीस निरीक्षक अभिषेक पाटील यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आदिवासी सहकारी साखर कारखाना गेल्या दोन वर्षांपासून बंद असल्याने शेकडो ऊस उत्पादक शेतकरी, कर्मचारी आणि मजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे. कारखाना भाडेतत्त्वावर दिल्यानंतरही संबंधित व्यवस्थापनाने शेतकरी व कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. कारखाना तातडीने सुरू करण्यासाठी पुढील आठ दिवसांत सर्व संबंधितांची बैठक बोलावून ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी आदिवासी टायगर सेनेने केली आहे. तसेच भाडेतत्त्वावरील व्यवस्थापनाला बैठकीस पाचारण करून त्यांची भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश द्यावेत, अशीही मागणी करण्यात आली.

# मकोकातील फरार अजय निकाळजे ४ महिन्यांनी जेरबंद

■ संभाजीनगर

**गंभीर स्वरूपाचे १२ गुन्हे दाखल**

**पुणे** गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत 'मकोका' अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यानंतर गेल्या ४ महिन्यांपासून फरार असलेल्या सराईत गुन्हेगाराला अटक केली. अजय उर्फ भज्या प्रकाश निकाळजे (३२) याला पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर येथून ताब्यात घेतले.

अजय निकाळजेवर खुनाचा प्रयत्न, दहशत निर्माण करणे, लूटमार, वाहन चोरी यांसारख्या गंभीर स्वरूपाचे तब्बल १२ गुन्हे दाखल आहेत. यापूर्वीही त्याच्यावर कारवाई झाली होती. महाराष्ट्र झोपडपट्टी दादा प्रतिबंधक कायद्यानुसार (एमपीडीए) त्याला एक वर्षासाठी कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले होते. कोंढवा परिसरात एका व्यक्तीवर पिस्तुलातून गोळीबार केल्याच्या प्रकरणात निकाळजे आणि त्याच्या साथीदारांविरोधात मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. मात्र कारवाईनंतर तो पोलिसांच्या चकवा देत फरार झाला होता. गेल्या चार महिन्यांपासून तो वेगवेगळ्या ठिकाणी लपून राहत होता.

# शेतकरी प्रश्नांवरून मेहकरात आज उबाठाचा आक्रोश मोर्चा

■ मेहकर

**शेतकऱ्यांच्या** विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप उबाठा आमदार सिद्धार्थ खरात यांनी केला. या विरोधात उबाठाच्या वतीने उद्या १८ जून रोजी मेहकर येथे आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. मेहकर आणि लोणार येथे आयोजित बैठकीत बोलताना आ. खरात म्हणाले की, सत्तेत येण्यापूर्वी शेतकऱ्यांना मोठमोठी आश्वासने देणाऱ्या सरकारने आता त्यांच्या प्रश्नांकडे पूर्णपणे पाठ फिरवली आहे. अतिवृष्टीची मदत, पीकविमा तसेच शेतमालाला हमीभाव यांसारख्या महत्त्वाच्या प्रश्नांवर अद्याप ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यातच कर्जमुक्तीच्या नावाखाली नव्या अटी-शर्ती लादून शेतकऱ्यांवरील आर्थिक भार वाढविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. महाविकास आघाडी सरकारच्या काळात 'महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना' अंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी सरसकट देण्यात आली होती.

# अवैध वाळू उपशाची तक्रार शिंदे गटाच्या नेत्यावर हल्ला

**संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद**

■ बीड

**बीडच्या** गेवराई तालुक्यातील नागझरी परिसरात सुरू असलेल्या कथित अवैध वाळू उपशाबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केल्याचा राग मनात धरून शिंदे गटाचे उपजिल्हाप्रमुख नारायण शिंदे यांच्यावर घरात घुसून हल्ला करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, मारहाणीची संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

नारायण शिंदे यांनी नागझरी परिसरातील कथित अवैध वाळू उपशाविरोधात जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली होती. त्यानंतर प्रवीण उर्फ लल्ल्या शिंदे, विकास आव्हाड आणि माऊली भवर यांनी शिंदे यांच्या घरी घुसून लोखंडी रॉड आणि लाकडी दांडक्यांनी मारहाण केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणी नारायण शिंदे यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली असून, संबंधित तिघांविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तक्रार दाखल केल्यानंतर शिंदे कुटुंबावर दबाव आणण्याचा प्रयत्न झाल्याचाही आरोप करण्यात आला आहे. शिंदे यांच्या म्हणण्यानुसार, काही महिलांनी त्यांच्या घरी घुसून त्यांच्यासह कुटुंबियांना मारहाण केली. तसेच तक्रार मागे न घेतल्यास खोटे गुन्हे दाखल करणे, घर व वाहन जाळून टाकणे आणि कुटुंबियांना गंभीर इजा पोहोचविण्याच्या धमक्या दिल्या.

# पुण्यात वृक्ष प्राधिकरणावरून वाद पालिका निर्णयांना कोर्टात आव्हान

■ पुणे

**पुणे** महापालिकेतील वृक्ष प्राधिकरण समितीची स्थापना न झाल्याच्या मुद्द्यावरून वाद निर्माण झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक दत्ता बहिरट आणि सामाजिक कार्यकर्ते पुष्कर कुलकर्णी यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करत, वृक्ष प्राधिकरणाचे अधिकार वापरून महापालिका आयुक्तांनी घेतलेल्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित केला आहे.

याचिकाकर्त्यांनी अशी मागणी केली की, महाराष्ट्र वृक्ष संरक्षण व जतन अधिनियमानुसार वृक्ष प्राधिकरण समिती स्थापन करणे बंधनकारक असताना, नवीन लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतरही समिती स्थापन झालेली नाही. समिती अस्तित्वात येईपर्यंत वृक्षतोड परवानग्या आणि संबंधित निर्णयांना स्थगिती द्यावी. दरम्यान, विकासकामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर झाडांची तोड होत आहे. याचिकेत नमूद केले की, वृक्ष प्राधिकरण नसल्याने वृक्षतोड परवानग्या दिल्या जात आहेत. वृक्षलागवडीकडे दुर्लक्ष होत आहे. वृक्षतोड आणि वृक्षलागवडीच्या आकडेवारीत विसंगती, माहिती अधिकारातील माहिती आणि महापालिकेच्या उत्तरांमध्ये तफावत यासह २०१६ ते २०२४ दरम्यान वृक्षगणनेसाठी खर्च झालेल्या १३.२२ कोटी रुपयांवरही प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

# सांबरकुंड प्रकल्पाचा मोबदला रखडला बाधित शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

■ रायगड

**अलिबाग** तालुक्यातील बहुप्रतीक्षित सांबरकुंड मध्यम प्रकल्पाचे काम भूसंपादनाचा योग्य मोबदला मिळण्यापूर्वीच सुरू झाल्याने प्रकल्पबाधित शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

धरणाचे काम वेगाने पूर्ण करण्यासाठी शासनाने नियुक्त केलेली महालक्ष्मी इन्फ्रा प्रोजेक्ट ही कंत्राटदार कंपनी अवजड यंत्रणेसह प्रकल्पस्थळी दाखल झाली आहे. मात्र, प्रकल्पबाधितांच्या जमिनींच्या मोबदल्याचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांनी कामाला विरोध दर्शवला आहे.

प्रथम आमच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा करून न्याय द्यावा, अन्यथा धरणाचे काम बंद पाडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिला आहे.संतप्त प्रकल्पबाधित शेतकऱ्यांची तातडीची बैठक महानवाडी येथील श्री राधाकृष्ण गणपती मंदिरात पार पडली. बैठकीत भूसंपादन, पुनर्वसन आणि मोबदल्याच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच प्रशासनाशी पत्रव्यवहार करून पुढील आंदोलनाची रणनीती निश्चित करण्यात आली.

भूसंपादन प्रक्रिया शासकीय अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे लांबणीवर पडल्याचा आरोप करत नवीन भूसंपादन कायद्यानुसार चालू बाजारभावाच्या चौपट मोबदला देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# धोकादायक इमारतीतील घरे रिक्त न करणाऱ्यांचे वीज-पाणी कापणार

■ मुंबई

**म्हाडाचा निर्णय**

**दक्षिण** मुंबईतील उपकरप्राप्त असलेल्या ८२ अतिधोकादायक इमारतीची म्हाडाच्या मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर यादी जाहीर केली आहे. या इमारतीतील रहिवाशांनी घरे रिकामी न केल्यास त्यांच्या घराचा वीज व पिण्याचा पाणीपुरवठा खंडीत करण्याचा निर्णय म्हाडाने घेतला आहे. अधिक माहिती देताना एका अधिकाऱ्याने असे सांगितले की, अतिधोकादायक इमारतीत राहाणाऱ्या रहिवाशांसमोर म्हाडाने दोन पर्याय ठेवले आहेत. एकतर संक्रमण शिबिरात राहावयास जा किंवा दरमहा वीस हजार रुपये घर भाडे घ्या.

या अनुषंगाने रहिवाशांवर घरे रिकामी करण्यासाठी कलम ७७ बी नुसार नोटीसा बजावण्यात आलेल्या ओत. त्यांना १५ दिवसांची मुदत देण्यात आलेली आहे. जे रहिवाशी असहकाय करतील त्यांच्या घरातील वीज आणि पाणीपुरवठा पालिका व बेस्ट प्रशासनाला कळवून कापला जाईल, असे आरआर मंडळाचे म्हणणे आहे.

# ठाण्यात आज २४ तास पाणीपुरवठा बंद राहणार




■ ठाणे

**महाराष्ट्र** औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) २० टक्के पाणीकपातीच्या निर्णयाचा परिणाम ठाणे शहरातील काही भागांवर होणार असून, मुंब्रा, दिवा, कळवा, माजिवडा-मानपाडा आणि वागळे इस्टेट परिसरातील नागरिकांना गुरुवारी पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे.

या निर्णयानुसार जांभूळ जलशुद्धीकरण केंद्रातून होणारा पाणीपुरवठा उद्या १८ जून रोजी दुपारी १२ वाजल्यापासून ते शुक्रवार, दि. १९ जून रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत पूर्णपणे बंद राहणार आहे. त्यामुळे संबंधित भागांतील नागरिकांनी आवश्यकतेनुसार पाण्याचा साठा करून ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रशासनाच्या माहितीनुसार, २४ तासांचा बंद कालावधी संपल्यानंतर पाणीपुरवठा पूर्ववत सुरू होईल. मात्र, वितरण व्यवस्था सुरळीत होण्यासाठी काही कालावधी लागणार असल्याने पुढील एक ते दोन दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा तसेच अनावश्यक पाणी वाया जाऊ देऊ नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# पालिका व वीज कंपनीच्या वादात वाकोल्याचा रस्ता अंधारात

**वीज पुरवठ्याच्या कामाला उशीर**

■ मुंबई

**महापालिका** व वीज कंपनी यांच्या तांत्रिक वादात वाकोल्यातील अशोक नगर ते राम नगर पर्यंतचा रस्ता गेल्या चार महिन्यांपासून अंधारात चाचपडत आहे. यामुळे वाहन चालक व पादचाऱ्यांना दृष्टीभ्रमाच्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याने अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे.

येथील डांबरी रस्त्याचे पालिकेने सिमेंट काँक्रिट रस्त्यात रुपांतर केले आहे. या रस्त्याचे काम करताना पदपथालगतचे विजेच्या दिव्यांचे खांब काढून टाकण्यात आले होते. रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत संपूर्ण रस्ता काळोखात बुडाला होता. गेल्या महिन्यात रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम पालिकेने पूर्ण केले आहे. तरीही रस्ता अंधारात आहे. पदपथालगत वीज कंपनी ने विजेचे खांब रांगेत उभे करून ठेवले आहेत. विद्युत तारांच्या भूमीगत जोडण्या केलेल्या आहेत. मात्र खांबावर दिवेच नाहीत. इतके महिने झाले वीज कंपनीच्या दिव्याखाली अद्याप अंधार का? असा सवाल स्थानिकांनी केला. या प्रकरणी वीज कंपनीकडे विचारणा केली असता एका अधिकाऱ्यांने सांगितले की, महापालिकेने रस्ता आमच्या ताब्यात उशीरा दिल्यामुळे वीज पुरवठ्याच्या कामाला उशीर झाला आहे.

# बडोद्यात बस-ट्रकच्या धडकेत ६ जणांचा मृत्यू! ३१ प्रवासी जखमी

**बसच्या पुढील भागाचा चक्काचूर**

■ बडोदा

**गुजरातमधील** बडोदा येथे आज पहाटे भीषण अपघात झाला. बडोदा-हलोल महामार्गावरील कोटंबी परिसरात स्लीपर बसने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला जोरदार धडक दिल्याने ६ जणांचा मृत्यू झाला असून ३१ प्रवासी जखमी झाले आहेत. मृतांमध्ये एका ९ वर्षांच्या मुलाचाही समावेश आहे. घटनेनंतर एसडीआरएफ, एनडीआरएफ आणि अग्निशमन दलाच्या पथकांनी घटनास्थळी दाखल होऊन बचावकार्य केले.

बालाजी ट्रॅव्हल्सची लक्झरी स्लीपर बस राजस्थानमधील बांसवाडा येथून सुरतकडे जात होती. पहाटे सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास ही बस कोटंबी स्टेडियमजवळ पोहोचली असताना हा अपघात झाला. ट्रक चालक टायरमधील हवेचा दाब तपासण्यासाठी ट्रक रस्त्याच्या कडेला उभा करून होता. याचवेळी आलेल्या बसने ट्रकच्या मागील बाजूस धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की बसच्या पुढील भागाचा पूर्णपणे चक्काचूर झाला. अनेक प्रवासी बसमध्ये अडकले होते. अपघाताची माहिती मिळताच जारोड पोलीस ठाण्याचे पथक, वडोदरा अग्निशमन दल, एसडीआरएफ आणि एनडीआरएफच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. बचाव पथकांनी बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. जखमी प्रवाशांना एसएसजी रुग्णालयात उपचारासाठी नेले. अपघातातील बहुतांश प्रवासी राजस्थानमधील असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# कोकणात दुबार पेरणीचे संकट पावसाअभावी शेतकरी हवालदिल

■ दापोली

**पाऊस** लांबल्याने कोकणातील शेतकऱ्यांवर यंदा दुबार पेरणीचे संकट ओढवण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. जून महिना अर्धा संपत आला असतानाही समाधानकारक पाऊस न झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी शेतात पेरलेले धान्य अद्याप उगवलेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असून आर्थिक नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

जूनच्या पहिल्या आठवड्यात मान्सूनच्या आगमनानंतर शेतकरी भात पेरणीच्या कामाला वेग देतात. यंदाही अनेक शेतकऱ्यांनी पावसाच्या आशेवर भाताची पेरणी केली. मात्र, सुरुवातीला झालेल्या तुरळक पावसानंतर पावसाने अचानक दडी मारल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. परिणामी पेरलेले बियाणे उगवले नसून काही ठिकाणी ते जमिनीतच सडण्याची शक्यता आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
संपादकीय
नवाकाळ
|| न मे भक्त प्रणश्यति ||

# पाणीसंकट... सुस्त कारभाराचा मस्त नमुना

*काले वर्षतु पर्जन्यः पृथ्वी सश्यशालिनी,*
*देशोयं क्षोभरहितः, जनः सन्तु निर्भया।*

अशा प्रकारची प्राचीन काळापासून व्यक्त केली गेलेली सनातन प्रार्थना आहे. याचा अर्थ वेळेवर पाऊस व्हावा. पृथ्वी ही विपुल अन्नधान्याने परिपूर्ण व्हावी. आपला देश अशांतीमुक्त व्हावा आणि सर्वांना निर्भयपणे जगता यावे ही केवळ मनोकामना नसून एकूणच मानवाच्या कल्याणाचा तो संकल्प ठरतो. काळाप्रमाणे पुरेसा पाऊस झाला. तरच या पुढच्या गोष्टी शक्य होतात. हा त्यातला मतितार्थ आहे. दरवर्षी भारतासारख्या कृषीप्रधान देशात ज्येष्ठ महिन्यापासून पावसाची अक्षरशः चातकाप्रमाणे प्रत्येकजण वाट पाहात असतात. पाऊस येणार याची बळीराजाला खात्री असते. कारण त्याच्या वर्षभराच्या जीवनचक्राचा आधार पाऊस असतो. खरे तर भारताचे अर्थचक्र या पावसावर अवलंबून असते. पाऊस पुरेसा होणे ही तर अत्यंत महत्त्वपूर्ण अपेक्षा असते. परंतु पाऊस थोडा जरी उशिरा आला तरी त्याचे अनेक प्रकारचे विपरित परिणाम तातडीने पाहायला मिळतात. गेल्या पाच-सहा वर्षांपासून भारतात सर्वदूर पावसाने चांगली कृपा केली होती. अन्नधान्याच्या उत्पादनातही चांगली वाढ झाली. धरणे आणि जलसाठे ओसंडून वाहात होते आणि पावसाची अशीच कृपा यावर्षीही राहील. अशी जनसामान्यांची अपेक्षा होती. परंतु यंदा मात्र एकूणच हवामानातल्या वाढत्या तापमानाने पाऊसमानावर अतिशय गंभीर परिणाम झालेला आहे. जून महिन्याचे तीन आठवडे उलटूनही पावसाने कुठेही अपेक्षेप्रमाणे हजेरी लावलेली नाही. अलनिनोसारखा हवामान बदलातील परिणाम पावसावर इतका मोठा प्रभाव टाकेल, अशी शक्यता वाटत नव्हती. परंतु यंदा ही सगळी लक्षणे दिसू लागली आहेत. देशपातळीवर त्याचे वेगवेगळ्या क्षेत्रावरचे प्रभाव दिसू लागले आहेत. महाराष्ट्रातले सगळ्या प्रमुख जलसाठ्यांमधले पाणी संपण्याच्या मार्गावर आहेत. सगळ्या मोठ्या महानगरांमध्ये दहा ते पंधरा टक्के पाणीकपातीला सुरूवात झालेली आहे. प्रत्यक्षात ही कपात जास्त असल्याचेही म्हटले जाते. पुण्यात यंदा प्रथमच एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची वेळ आलेली आहे.

**वाढते पाणीसंकट**

राज्य सरकारकडून या पाणीसंकटाची गांभीर्याने दखल घेतली गेली असली तरी ती उशिरा जाग आलेल्या सुस्त कारभाराचा नमुना ठरतो. आता थेट मुख्यमंत्र्यांनी सर्वसामान्य जनतेला पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले आहे. जपून वापरा, याचा अर्थ आणि पाणी वाया घालवू नका, इथपर्यंतच त्याचा अर्थ घेता येऊ शकतो. सामान्य माणूस पुरेसे पाणीच उपलब्ध होत नसल्याने त्याला पाणी जपून वापरल्याशिवाय पर्याय उरलेला नाही. पाणी संकट गंभीर झाल्यानंतर हेच पाणी जपून वापरण्याची सूचना करणे हा निव्वळ नियोजनशून्यपणा ठरतो. मुबलक पाणी असले तरीसुद्धा ते सांभाळून किंवा सतर्कतेनेच वापरले पाहिजे आणि हीच पाणी वापरण्याची सतर्कता कोणकोणत्या स्वरूपात असू शकते. याबद्दलची जनजागृती वर्षभर करण्याची आवश्यकता आहे आणि शासकीय कार्यालये अगदी मंत्र्यासंत्र्यांचे बंगले या सगळ्या ठिकाणी पाणी कसे वाचवले जाते आहे हेदेखील लोकांपर्यंत पोहचवण्याची आवश्यकता आहे. याचे कारण असे की, सामान्य जनतेला पाणी वाचवण्याचे आवाहन करणे म्हणजे राजकीय उपदेश करून फार मोठी जबाबदारी पार पाडल्याचा अविर्भाव केला जातो. प्रत्यक्षात शासकीय कार्यालये आणि अनेक प्रकारच्या सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये पाण्याचा वाटेल तसा अपव्यय होत असतो. आज बाटलीबंद पाणी मिळण्याची सोय झालेली आहे. अनेक सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये शेकडो लीटर पाण्याच्या बाटल्या आणल्या जातात आणि अर्धे पाणी असलेल्या बाटल्या अक्षरशः फेकून दिल्या जात असतात. आज या पुणे महापालिकेने एक दिवसाआड पाणी द्यायची घोषणा केलेली आहे. त्या पुणे महापालिकेतसुद्धा पाण्याच्या काटकसरीची कोणतीही जाणीवपूर्वक उपाययोजना केली गेलेली नाही. तीच परिस्थिती मुंबई, नाशिक, नागपूर, संभाजीनगर यासारख्या महानगरांची आहे. सरकार पुरेसे पाणी पुरवू शकणार नाही याची पूर्ण कल्पना लोकांना असते. म्हणूनच ते आपापल्या क्षमतेप्रमाणे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करतात. अगदी ज्यादा पैसे मोजून टँकरने पाणी भरण्यापासून ते विकत मिळणाऱ्या कॅन्सच्या माध्यमातून ते आपली पाण्याची गरज भागवतात.

**जलपुनर्भरणाचे काय झाले ?**


आज राज्यातील परिस्थिती अधिक गंभीर झालेली आहे. अगदी विविध बांधकामांवर पाणी वापराची मर्यादा घातली गेलेली आहे. हीच परिस्थिती या महिनाअखेरपर्यंत राहिली तर पाण्याचे रेशनिंग करण्याची वेळ येऊ शकते. मुंबईसारख्या महानगराची तर मोठीच दैना होऊ शकेल. तीन महिन्यांपूर्वी वेधशाळांनी पाऊस कमी पडण्याचे अंदाज दिले होते. तेव्हापासूनच पाणी वापराच्यासंदर्भात काही प्राथमिक उपाययोजना आवश्यक होत्या परंतु संकट जेव्हा अंगावर येते त्याचवेळेला उपाययोजना करण्याचा हा प्रकार अत्यंत संतापजनक ठरतो. भारतच नव्हे तर जगभर पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होते आहे. यासाठी पावसामार्फत उपलब्ध होणाऱ्या पाण्याची अधिकाधिक साठवणूक करणे, पावसाचा थेंब न थेंब कसा वाचेल किंवा पावसाचे पाणी वाया जाणार नाही. याबाबतच्या ठोस आणि आधुनिक पद्धतीच्या उपाययोजना अत्यंत गरजेच्या ठरतात. गेल्या वीस-पंचवीस वर्षांपासून जलपुनर्भरण योजनेचा नुसता ढोल बडवला जातो आहे. पण जलपुनर्भरण योजनेचे एकही उत्कृष्ट किंवा आदर्श उदाहरण समोर आलेले नाही. धुळे जिल्ह्यातल्या शिरपूर येथे विहिरींमध्ये या जलपुनर्भरणाचे यशस्वी प्रयोग झाले. त्याला शिरपूर पॅटर्न म्हणूनही ओळखले जाते. जागतिक स्तरावर त्याची दखलही घेतली जाते आहे. परंतु असे प्रयोग राज्यात ठिकठिकाणी राबवावेत अशी सतर्कता राज्य सरकार दाखवू शकलेले नाही. जर अशा उपाययोजना केल्या असत्या तर आज काही प्रमाणात या पाणी संकटावर मात करता आली असती.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

निवडलेला रस्ताच जर इमानदारीचा व सुंदर असेल तर थकून जाण्याचा प्रश्नच उरत नाही.भले सोबत कोणी असो वा नसो.

## पंचांग



रवी उदय- ०६-०३
रवी अस्त- १९-१७

**गुरुवार, १८ जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** निज ज्येष्ठ शुक्ल चतुर्थी**
**नक्षत्र : पुष्य**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कर्क**

**विनायक चतुर्थी, गुरुपुष्यामृत सूर्वोदयापासून सकाळी ९.२५ पर्यंत, गुरु अर्जुनदेव शहीद दिन, झाशीची राणी लक्ष्मीबाई स्मृतिदिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### बटाटा पॅनकेक



★ **साहित्य :-** बटाटेः २ मोठे (कच्चे, सोललेले आणि किसलेले), कांदाः १/४ कप (बारीक चिरलेला किंवा किसलेला), २ चमचे कॉर्नफ्लोर, मैदा किंवा गव्हाचे पीठः १ ते २ चमचे, मीठ आणि काळी मिरी चवीनुसार, तेलः पॅनकेक तळण्यासाठी.

★ **कृती :-** किसलेले बटाटे आणि कांदा एका स्वच्छ सुती कपड्यात किंवा गाळणीत घेऊन त्यांचे जास्तीचे पाणी पूर्णपणे पिळून काढा. आता हे कोरडे बटाटे आणि कांदा एका भांड्यात घ्या. व्यवस्थित सुटे करून घ्या. त्यात कॉर्नफ्लोर, पीठ, मीठ आणि काळी मिरी घालून सर्व मिश्रण चांगले एकजीव करा.
एका पॅनमध्ये थोडे तेल गरम करा. तयार मिश्रणातून थोडे मिश्रण घेऊन हातावर चपटे (पॅनकेकच्या आकारात) करा आणि गरम तेलात टाका.
मध्यम आचेवर दोन्ही बाजूंनी सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत (३-४ मिनिटे प्रत्येक बाजूने) तळून घ्या. करपवू नका. गरमागरम बटाटा पॅनकेक्स टोमॅटो केचप, चिंचेची चटणी सर्व्ह करा!

## क्रीडा



# विश्वचषकात लिओनेल मेस्सीची पहिली हॅटट्रिक
## अर्जेंटिनाने अल्जेरियाला ३-० ने सहज नमवले



**गतविजेत्या अर्जेंटिनाने आपल्या फिफा विश्वचषकातील विजयी मोहिमेची शानदार सुरुवात केली आणि आपल्या पहिल्याच सामन्यात अर्जेंटिनाने अल्जेरियाचा ३-० ने सहज पराभव केला. या विजयाचा सर्वात मोठा नायक संघाचा स्टार फुटबॉलपटू आणि कर्णधार लिओनेल मेस्सी होता. मेस्सीने मैदानावर आपले कौशल्य दाखवत विश्वचषकातील पहिली हॅटट्रिक केली आणि प्रतिस्पर्धी संघाच्या बचावाला पूर्णपणे उद्ध्वस्त केले. मेस्सीच्या कामगिरीमुळे अर्जेंटिनाने या स्पर्धेत आपला इरादा स्पष्ट केला. त्याने १६ गोल करणाऱ्या जर्मन दिग्गज मिरोस्लाव क्लोझेच्या विक्रमाची बरोबरी केली.**

■ वेलिंग्टन

**अर्जेंटिनाने** सामन्याच्या सुरुवातीपासूनच अल्जेरियावर दबाव टाकला होता. १७ व्या मिनिटाला मेस्सीची जादू दिसून आली, जेव्हा त्याने रॉड्रिगो डी पॉलच्या एका अप्रतिम पासवर नियंत्रण मिळवून अल्जेरियन गोलरक्षकाला चकवले आणि गोल करुन खाते उघडले. मग ६० व्या मिनिटाला निको गोन्झालेझच्या क्रॉसवर मॅक ॲलिस्टरने मारलेला शॉट गोलकिपरने अडवल्यानंतर मिळालेल्या रिबाउंडवर मेस्सीने सहजपणे गोल करून सामन्यातील आपला दुसरा गोल नोंदवला आणि आघाडी मिळवून दिली. मेस्सी इथेच थांबला नाही. ७६ व्या मिनिटाला त्याने मैदानाच्या मध्यातून बॉल ड्रिबल करत गोन्झालेझकडे पास दिला. गोन्झालेझने बॉक्सच्या काठावर उभ्या असलेल्या मेस्सीकडे बॉल परत पास केला आणि मेस्सीने कोणतीही चूक न करता एका अप्रतिम शॉटने बॉल नेटच्या खालच्या कोपऱ्यात टाकला. मेस्सीने आपली हॅटट्रिक पूर्ण केली आणि अर्जेंटिनाच्या प्रभावी ३-० विजयावर शिक्कामोर्तब केले.

लिओनेल मेस्सीच्या कारकिर्दीसाठी हा सामना खूप खास आणि ऐतिहासिक होता. अर्जेंटिनासाठी हा त्याचा २०० वा आंतरराष्ट्रीय सामना होता, जो त्याने आपल्या पहिल्या विश्वचषक हॅटट्रिकने अविस्मरणीय बनवला. यासह मेस्सी जगातील त्या निवडक खेळाडूंच्या गटात सामील झाला आहे. त्याने सहा वेगवेगळ्या फिफा विश्वचषक स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे. ३८ वर्षांहून अधिक वय असूनही, त्याचे ड्रिब्लिंग आणि अचूकता मैदानावर स्पष्टपणे दिसून आली, ज्यामुळे चाहते थक्क झाले.

**१९ जूनला विश्वचषकाचे सामने**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| रात्री १२.३० | स्वित्झर्लंडविरुद्ध बोस्निया व हर्झेगोविना |
| पहाटे ३.३० | कॅनडा विरुद्ध कतार |
| पहाटे ६.३० | मेक्सिकोविरुद्ध दक्षिण कोरिया |

## नेदरलँडवर ९५ धावांनी मात
## भारताने अव्वल स्थान गाठले

■ हेडिंग्ले

**आयसीसी** महिला टी-२० विश्वचषकाच्या १०व्या सामन्यात भारतीय महिला संघाने नेदरलँडवर ९५ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय सलामीवीर स्मृती मंधाना (७४) आणि शफाली वर्मा (५५) यांनी वेगवान सुरुवात केली. या दोघींच्या खेळीमुळे भारताने ५ बाद २०९ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना नेदरलँडने १७.३ षटकांत सर्वबाद ११४ धावा केल्या. या विजयासह भारताने या स्पर्धेच्या गट १ च्या गुणतालिकेत ४ गुणांसह अव्वल स्थान गाठले. स्मृती मंधाना सामनावीर ठरली. रिचा घोषने ८ चेंडूत २० धावा केल्या. भारतीय गोलंदाज श्री चरणीने ४ गडी आणि शफाली वर्माने ३ गडी बाद केले. नेदरलँडकडून कर्णधार बॅबेट डी लीडने सर्वाधिक २८ धावा आणि हेदर सीगर्सने २१ धावा केल्या.

## नॉर्वेचा इराकवर ४-१ने विजय
## अर्लिंग हालंडचे दोन गोल

■ बोस्टन



**फिफा** विश्वचषकाच्या गट 'आय' गटातील सामन्यात नॉर्वेने इराकला ४-१ ने पराभूत करुन विजयी सुरुवात केली. अर्लिंग हालंडने आपल्या पहिल्याच विश्वचषक सामन्यात दोन गोल केले.

हालंडने २९ व्या मिनिटाला डेव्हिड मोलर वुल्फच्या क्रॉसवर शानदार हेडर मारुन आपला पहिला विश्वचषक गोल केला. मात्र, ३८ व्या मिनिटाला आयमान हुसेनच्या हेडरने इराकने बरोबरी साधली. पहिल्या हाफच्या अगदी शेवटी इराकी बचावफळीच्या चुकीचा फायदा घेत हालंडने दुसरा गोल करुन नॉर्वेला आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या हाफमध्ये लिओ ओस्टिगार्ड आणि क्रिस्टियन थॉर्स्टवेट यांनीही गोल केले. हालंडने अंतिम गोलसाठी असिस्ट केले आणि १९९८ नंतर नॉर्वेचा पहिला विश्वचषकात सहभाग होता आणि संघाने विजयासह आपले पुनरागमन साजरे केले.

# एम्बाप्पेच्या आक्रमक खेळापुढे सेनेगलचे लोटांगण
## फ्रान्स संघाची ३-१ अशा विजयाने दमदार सुरुवात

■ न्यू जर्सी

**फिफा** विश्वचषकाच्या 'आय' गटाच्या सामन्यात कर्णधार किलियन एम्बाप्पेच्या २ गोलच्या बळावर फ्रान्सने सेनेगलला ३-१ ने पराभूत करून शानदार विजयी सुरुवात केली. एम्बाप्पे विश्वचषकातील फ्रान्सचा सर्वाधिक गोल करणारा खेळाडू ठरला. निर्धारित ९० मिनिटांनंतर फ्रान्स २-० ने आघाडीवर होता. मात्र अतिरिक्त वेळेच्या ८ मिनिटांत इब्राहिम म्बायेने सेनेगलसाठी गोल केला. ९ सेकंदांनंतरच एम्बाप्पेने आणखी एक गोल करून फ्रान्सला ३-१ अशी आघाडी मिळवून दिली. फ्रान्सने अंतिम शिट्टी वाजेपर्यंत ही आघाडी कायम ठेवली.



दुसऱ्या हाफमध्ये फ्रान्स अधिक आक्रमक दिसत होता. ४७ व्या मिनिटाला डेझायर डोएने फ्रान्ससाठी गोल करण्याचा प्रयत्न केला, पण तो अयशस्वी ठरला. यानंतर ५३ व्या मिनिटाला फ्रान्सच्या मायकल ओलिसेने एक सुवर्णसंधी निर्माण केली, पण ६६ व्या मिनिटाला मायकल ओलिसेहकडून पास घेत एम्बाप्पेने एक शानदार गोल करून आपल्या संघाला आघाडी मिळवून दिली. फ्रान्स तिथेच थांबला नाही आणि ८२ व्या मिनिटाला ब्रॅडली बारकोलाने त्यांची आघाडी दुप्पट केली. सामन्याच्या अतिरिक्त वेळेतील आठ मिनिटांत इब्राहिम म्बायेने सेनेगलसाठी गोल केला. पण काही सेकंदांनंतरच, एम्बाप्पेने आणखी एक गोल करून फ्रान्सला ३-१ अशी आघाडी मिळवून दिली.

## मल्लखांब कार्यशाळेचे बोरीवली येथे आयोजन

■ मुंबई

**आंतरराष्ट्रीय** मल्लखांब दिनाचे औचित्य साधून बोरीवली पश्चिम येथे आशिष देवल व संचिता देवल यांच्या संकल्पनेतून मल्लखांब लव संघ व बीमानगर एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आणि संजय दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली काहीशा आगळ्या वेगळ्या मराठी कलावंत मल्लखांब कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये प्रथमेश परब, ओंकार भोजने, भाग्यश्री मिलिंद, वैष्णवी घोडके, मानसी घाटे, भक्ती देसाई, सानिका काशीकर, भाग्यश्री दळवी, सुमित भोकसे या मराठी कलावंतांनी मल्लखांब करण्याचा आनंद लुटला. या कार्यशाळेला केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

## भारताने अफगाणला १७० धावांनी नमवले
## गिल आणि ईशानची अफलातून खेळी

■ लखनौ

**कर्णधार** शुभमन गिल (१५४) आणि ईशान किशनच्या (१२५) अफलातून खेळीच्या जोरावर भारतीय संघाने अफगाणिस्तानला १७० धावांनी नमवले. लखनौमध्ये झालेल्या तीन वनडे मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारताने ४९.५ षटकांत ४०२ धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात अफगाणिस्तानला सर्वबाद २३२ धावा करता आल्या. या विजयासह भारताने मालिकेत २-०ने विजयी आघाडी घेतली.

यशस्वी जयस्वाल ४ धावा आणि रोहित शर्मा ४८ धावा करून बाद झाल्यानंतर गिल आणि इशान यांच्यातील वेगाने धावा करणाऱ्या भागीदारीदरम्यान अफगाणिस्तानच्या एकाही गोलंदाजाला त्यांना अडचणीत आणता आले नाही. शुभमनने ७७ चेंडूत आपले शतक पूर्ण केले, तर इशान किशनने आपल्या कारकिर्दीतील तिसरे एकदिवसीय शतक गाठण्यासाठी केवळ ७१ चेंडू घेतले. त्यांच्या खेळीमुळे भारताने सर्वबाद ४०२ धावांपर्यंत मजल मारली. या धावसंख्येचा पाठलाग करताना अफगाणिस्तानकडून रहमत शाहने सर्वाधिक ७९ धावा केल्या. रहमानुल्लाह गुरबाज ४१ आणि सेदिकुल्लाह अटल ४२ धावा ठोकल्या. मात्र इतर फलंदाजांना मोठी खेळी करता आली नाही. परिणामी अफगाणिस्तानला २३२ धावांपर्यंत पोहोचता आले.

# ऑस्ट्रियाने विश्वचषकातील ३६ वर्षांचा विजयाचा दुष्काळ संपवला

■ सॅन फ्रान्सिस्को

**फिफा** विश्वचषकाच्या 'जे' गटामधील रोमांचक सामन्यात ऑस्ट्रियाने जॉर्डनचा ३-१ असा पराभव करुन धडाकेबाज सुरुवात केली. सॅन फ्रान्सिस्कोमधील लेवी स्टेडियमवर झालेल्या या सामन्यातील विजयासह ऑस्ट्रियाने विश्वचषकातील आपला ३६ वर्षांचा विजयाचा दुष्काळ संपवला असून १९९० नंतरचा हा त्यांचा विश्वचषकातील पहिलाच विजय ठरला.

सामन्याच्या २० व्या मिनिटाला ऑस्ट्रियाच्या रोमानो श्मिडने पेन्ल्टी बॉक्सच्या बाहेरून एक उत्कृष्ट आणि वेगवान शॉट मारत गोल केला आणि ऑस्ट्रियाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. ५० व्या मिनिटाला विश्वचषकात पदार्पण करणाऱ्या जॉर्डनच्या संघाने दुसऱ्या हाफमध्ये जोरदार पुनरागमन केले. अली ओलवानने एक अप्रतिम गोल करून स्कोअर १-१ ने बरोबरीत आणला. जॉर्डनचा विश्वचषक इतिहासातील हा पहिलाच गोल ठरला. ६७ व्या मिनिटाला ऑस्ट्रियाच्या मार्को अर्नाउटोविचने गोल केला होता, परंतु व्हीएआर पुनरावलोकनात स्टीफन पॉशचा हँडबॉल झाल्याचे स्पष्ट झाल्याने पंचांनी तो गोल नाकारला. ७६ व्या मिनिटाला ऑस्ट्रियाच्या कॉर्नर किकचा बचाव करताना जॉर्डनचा डिफेंडर याझान



अल-अरबकडून आत्मघाती गोल झाला, ज्यामुळे ऑस्ट्रियाला २-१ अशी महत्त्वपूर्ण आघाडी मिळाली. सामन्याच्या अतिरिक्त वेळेत जॉर्डनच्या खेळाडूने हँडबॉल केल्यामुळे ऑस्ट्रियाला पेनल्टी मिळाली. अनुभवी स्ट्रायकर मार्को अर्नाउटोविचने कोणतीही चूक न करता गोल करून ऑस्ट्रियाचा ३-१ असा विजय निश्चित केला.

## मणिपूरच्या ३० विद्यार्थ्यांची डेहराडूनमध्ये स्वच्छता मोहीम

■ डेहराडून

**डेहराडूनमध्ये** मणिपूरच्या विद्यार्थ्यांनी राबवलेल्या स्वच्छता मोहिमेचे सर्वत्र कौतुक होत आहे. डेहराडूनमध्ये शिकणाऱ्या मणिपूरच्या ३० विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाच्या आवारातून ही स्वच्छता मोहीम सुरू केली. या मोहिमेला डेहराडूनच्या तरुणाईचा एवढा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला की दोन हजारहून अधिक तरुण या मोहिमेत स्वतःहून सहभागी झाले.

संपूर्ण शहरात फिरून या तरुणांनी रस्त्यात इतस्ततः फेकलेला कचरा गोळा करून स्वतः जवळच्या पिशव्यांमध्ये भरून शहरातील कचरा पेट्यांमध्ये नेऊन टाकला. सुमारे सहाशे किलो कचरा या मोहिमेद्वारे उचलण्यात आला.

## भवानीपूरच्या निकालाविरोधात ममता बॅनर्जींची हायकोर्टात याचिका

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भवानीपूर विधानसभा मतदारसंघातील पराभवाविरोधात कोलकाता उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांनी त्यांचा १५ हजार १०४ मतांनी पराभव केला होता. या निकालाला आता त्यांनी न्यायालयात आव्हान दिले आहे.

भवानीपूर विधानसभा मतदारसंघात ममता बॅनर्जी आणि शुभेंदू अधिकारी यांच्यात थेट लढत झाली होती. या निवडणुकीत पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांनी विजय मिळवला, तर ममता बॅनर्जी यांना पराभव स्वीकारावा लागला. या लढतीत शुभेंदू अधिकारी यांनी ममता बॅनर्जी यांचा १५ हजार १०४ मतांच्या फरकाने पराभव केला होता. आता या निकालाविरोधात ममता बॅनर्जी यांनी न्यायालयाचे दार ठोठावत निवडणूक निकालाला आव्हान दिले आहे. ममता बॅनर्जी उच्च न्यायालयात काल दाखल झाल्या. यावेळी त्यांच्यासोबत खासदार डेरेक ओ'ब्रायन, डोला सेन आणि कल्याण बॅनर्जी उपस्थित होते.

देश विदेश

## इम्रान खान यांना रुग्णालयात हलवल्याचा दावा! कुटुंब संतप्त

■ इस्लामाबाद



**पाकिस्तानचे** माजी पंतप्रधान आणि पाकिस्तान तेहरीक-ए-इन्साफचे प्रमुख इम्रान खान यांच्या आरोग्यावरून पुन्हा वाद निर्माण झाला आहे. इम्रान खान यांना तुरुंगातून रुग्णालयात हलवण्यात आल्याचा दावा त्यांच्या बहिणी अलीमा खानम यांनी केला. याबाबत कुटुंबाला कोणतीही अधिकृत माहिती दिली नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

अलीमा खानम यांनी पोस्ट म्हटले की, १५ जून रोजी पहाटे इम्रान खान यांना रावळपिंडीतील अडियाला तुरुंगातून इस्लामाबादमधील पाकिस्तान इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस रुग्णालयात हलवण्यात आल्याची माहिती कुटुंबाला मिळाली. मात्र, ही माहिती त्यांना अधिकृत माध्यमातून नव्हे तर पक्षाच्या नेत्याच्या सोशल मीडिया पोस्टमधून समजली. कुटुंब रुग्णालयाकडून इम्रान खान यांच्या प्रकृतीबाबत दिले जाणारे कोणतेही वैद्यकीय अहवाल स्वीकारणार नाही. पूर्वीही रुग्णालयाने इम्रान यांच्या आरोग्याबाबत केलेले काही दावे नंतर चुकीचे ठरले आहेत. काही काळापूर्वी त्यांच्या दृष्टीत मोठी सुधारणा झाल्याचा दावा केला होता. मात्र, इम्रान खान यांनी स्वतः हा दावा फेटाळला होता. सरकारने इम्रान खान यांची इस्लामाबादमधील खासगी रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांकडून स्वतंत्र तपासणी करावी आणि उपचार प्रक्रियेत पारदर्शकता ठेवावी.

दरम्यान, पाकिस्तान सरकार आणि तुरुंग प्रशासनाने इम्रान खान यांना योग्य वैद्यकीय सुविधा दिल्या जात असल्याचे सांगितले आहे.

## ओमानजवळ अमेरिकेच्या हल्ल्यानंतर २१ भारतीय खलाशी मायदेशी परतले

**दुतावासाकडून परतीची व्यवस्था**



■ नवी दिल्ली

**ओमानच्या** किनाऱ्याजवळ अमेरिकन नौदलाच्या हल्ल्यातून बचावलेले २१ भारतीय खलाशी सुखरूप मायदेशी परतले. मात्र, या घटनेत तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला.

पलाऊच्या ध्वज असलेल्या 'एमटी सेट्टेबेलो' या व्यापारी जहाजावर अमेरिकन सैन्याने हल्ला केला होता. या जहाजावर २४ भारतीय कर्मचारी होते. या हल्ल्यात तीन भारतीय खलाशी मृत्युमुखी पडले होते. तर २१ खलाशांची सुटका करण्यात आली. या घटनेनंतर ओमानमधील भारतीय दूतावासाने भारतीय खलाशांच्या सुरक्षित परतीची व्यवस्था केली. त्यांच्या प्रवासापूर्वी ओमानमधील भारतीय राजदूत प्रशांत पिसे यांनी खलाशांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला.

'सेट्टेबेलो'सह 'मारिव्हेक्स',आणि 'जलवीर' या व्यापारी जहाजांवर काही दिवसांपूर्वी हल्ला झाला. या सर्व जहाजांवर भारतीय खलाशी कार्यरत होते. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने जहाजांनी सागरी निर्बंधांचे उल्लंघन केले होते आणि इराणी तेल वाहतूक करण्याचा प्रयत्न केला होता, असा दावा केला. मात्र, 'सेट्टेबेलो' जहाजाच्या व्यवस्थापक कंपनीने हा दावा फेटाळला आहे.

## पाकिस्तानात पोलिसांच्या गोळीबारात ९ वर्षीय ऑस्ट्रेलियन मुलीचा मृत्यू

■ इस्लामाबाद

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**पाकिस्तानात** हानिया अहमद या ९ वर्षांच्या ऑस्ट्रेलियन मुलीचा पोलिसांच्या गोळीबारात मृत्यू झाला. ती कुटुंबासोबत पाकिस्तानमध्ये नातेवाईकांना भेटण्यासाठी आली होती. मात्र, चुकीच्या ओळखीमुळे पोलिसांनी त्यांच्या गाडीवर गोळीबार केल्याने ही घटना घडली.

ऑस्ट्रेलियातील पर्थ येथे राहणारे हे कुटुंब पाकिस्तानातील पंजाब प्रांतातील चकवाल येथे नातेवाईकांना भेटण्यासाठी आले होते. प्रवासादरम्यान दरोडेखोरांनी त्यांना लुटल्यानंतर पोलिसांनी चुकून त्यांच्याच गाडीला संशयितांची गाडी समजून गोळीबार केला. या गोळीबारात ९ वर्षीय हानिया अहमदचा मृत्यू झाला, तर तिचे वडील आणि मोठा भाऊ जखमी झाले. मुलीची आई सुरक्षित आहे. पंजाब पोलिसांच्या म्हणण्यानुसार, संशयित दरोडेखोरांनी प्रथम पोलिसांवर गोळीबार केला होता. त्यानंतर झालेल्या चकमकीदरम्यान ही घटना घडली. मात्र, हानियाच्या वडिलांनी हा दावा फेटाळून लावत पोलिसांनीच कोणतीही पूर्वसूचना न देता सर्वप्रथम गोळीबार केल्याचा आरोप केला.

## पाळीव कुत्र्यावर गोळीबार लॉस एंजेलिस पोलीस वादात

■ लॉस एंजेलिस

**बास्केटबॉल** संघ न्यूयॉर्क निक्सच्या एनबीए विजेतेपदाचा आनंद साजरा करताना झालेल्या गोंगाटामुळे शेजाऱ्यांनी पोलिसांना पाचारण केले. मात्र, घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी जेम्सन नावाच्या पाळीव कुत्र्याला गोळ्या घालून ठार केले. या घटनेनंतर पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून परिसरात संतापाचे वातावरण आहे. इमारतीतून महिलेच्या ओरडण्याचा आवाज येत होता. महिलेला काही धोका असल्याचा संशय आल्याने शेजाऱ्यांनी पोलिसांना कळवले. पोलीस घटनास्थळी पोहोचले तेव्हा संबंधित महिला आपल्या कुटुंबासोबत घरात होती. त्यांच्यासोबत जेम्सन नावाचा दोन वर्षांचा पाळीव कुत्राही होता. गोल्डन रिट्रीव्हर, सेंट बर्नार्ड आणि पूडल या जातींच्या मिश्रणातून जन्मलेला जेम्सन कुटुंबाचा लाडका सदस्य होता. अधिकाऱ्यांनी महिलेशी चर्चा करताना कुत्र्याला नियंत्रणात ठेवण्यास सांगितले.

## गोव्याचे ज्येष्ठ नाट्यकर्मी प्रसाद सावकारांचे निधन

■ पणजी



**गोव्यातील** ज्येष्ठ नाट्यकर्मी, प्रख्यात शास्त्रीय गायक आणि पद्मश्री पुरस्काराने सन्मानित प्रसाद सावकार (९८) यांचे आज निधन झाले. त्यांच्या निधनाने गोवा, महाराष्ट्र आणि देशातील संगीत-नाट्य क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर उद्या सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास पणजी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. प्रसाद सावकार हे संगीत नाटकांच्या क्षेत्रातील मान्यवर नाव होते. त्यांनी आपल्या दीर्घ कारकिर्दीत अनेक गाजलेल्या संगीत नाटकांमध्ये प्रमुख भूमिका साकारल्या. त्यांच्या दमदार अभिनयासह सुरेल गायकीने रसिकांची मने जिंकली. विशेषतः संगीत नाटकांमधील गायक-नट म्हणून त्यांनी महाराष्ट्र आणि गोव्यात मोठी लोकप्रियता मिळवली. शास्त्रीय संगीतावर प्रभुत्व असलेल्या सावकार यांनी अनेक मैफिलींमधून कला सादर केली. त्यांच्या गायकीत शास्त्रीय संगीताची परंपरा आणि नाट्यसंगीताचा संगम होता. त्यांनी अनेक संगीत स्पर्धांचे परीक्षक म्हणून काम केले तसेच नवोदित कलाकारांना मार्गदर्शन करून संगीत आणि नाट्य क्षेत्रात नवी पिढी घडविण्यातही योगदान दिले. नाट्य आणि संगीत क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविले होते.

## खारघरमध्ये मॅरेथॉनला स्थानिकांचा तीव्र विरोध

■ नवी मुंबई

**खारघरमध्ये** येत्या २३ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या मॅरेथॉन स्पर्धेवरून नवा वाद निर्माण झाला आहे. या स्पर्धेचा मार्ग खारघरच्या टेकडीवरून जातो. या टेकडीवर सुरक्षेचे कारण देत सिडकोने स्थानिक रहिवाशांना आणि विशेषतः नियमित मॉर्निंग वॉकला जाणाऱ्यांना मनाई केली आहे. मात्र त्याच टेकडीवर शेकडोंचा सहभाग असलेल्या मॅरेथॉन परवानगी कशाच्या आधारे दिली, असा सवाल स्थानिक विचारत आहेत. या डोंगराळ भागात भूःस्खलनाचा आणि अन्य धोके असल्याचे कारण देत सिडको प्रशासनाने स्थानिकांना या डोंगरावर ये-जा करण्यास मनाई केली आहे.

## रांचीतील संघ कार्यालयावर पेट्रोल बॉम्ब फेकण्याचा प्रयत्न

■ रांची

**झारखंडची** राजधानी रांची येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयावर पेट्रोल बॉम्ब फेकण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती आहे. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली. घटनेनंतर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून हल्लेखोरांची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या प्रकरणी अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अज्ञात व्यक्तींनी पहाटेच्या सुमारास संघ कार्यालयाच्या दिशेने पेट्रोल बॉम्ब फेकले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी कार्यालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांच्या माहितीनुसार, हल्लेखोरांनी दोन पेट्रोल बॉम्ब फेकले. त्यापैकी एकाचा स्फोट झाला, तर बॉम्ब दुसरा फुटला नाही. झारखंड विधानसभेतील विरोधी पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री बाबूलाल मरांडी यांनी या घटनेवर म्हटले की, ही केवळ साधी घटना नाही. यामागे मोठा कट होता का, याचा तपास होणे आवश्यक आहे. पोलिसांकडून सीसीटीव्ही तपासून आरोपींचा शोध घेतला जात आहे. केंद्रीय मंत्री संजय सेठ यांनीही घटनास्थळी भेट दिली.

त्यांनी दावा केला की, हल्लेखोरांनी कार्यालयात आग लावण्याच्या उद्देशाने पेट्रोल बॉम्ब फेकले असावेत. हल्लेखोर वाहनांमधून आले होते. कार्यालयाजवळ काही वेळ थांबून त्यांनी बॉम्ब फेकले. स्फोट झाला असता तर कार्यालय परिसरात मोठे नुकसान झाले असते.

## पुणे पालिका शाळा खासगी संस्थेला! भाजपाच्या बहुमताने प्रस्ताव मंजूर

■ पुणे

**पुणे** महापालिकेच्या शाळा खासगी संस्थेच्या माध्यमातून चालवण्याच्या प्रस्तावाला स्थायी समितीत मंजुरी देण्यात आली आहे. भाजपाने बहुमताच्या जोरावर महापालिकेच्या पाच शाळा पीपीपी (सार्वजनिक-खासगी भागीदारी) तत्त्वावर आकांक्षा फाऊंडेशनला चालवण्यासाठी देण्याचा प्रस्ताव मंजूर करून घेतला, असा आरोप करत विरोधकांनी या निर्णयाला तीव्र विरोध केला आहे. महापालिका शाळांचे खासगीकरण होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

आकांक्षा फाऊंडेशन गेल्या काही वर्षांपासून महापालिकेच्या पाच इंग्रजी माध्यमाच्या शाळा सीएसआरच्या माध्यमातून चालवत आहे. मात्र संस्थेचा खर्च वाढल्याने त्यांनी महापालिकेकडे आर्थिक मदतीची मागणी केली होती. त्यानंतर या संस्थेसाठी पीपीपी तत्त्वावर शाळा चालवण्याची प्रक्रिया राबवण्यात आली. संस्थेने सुरुवातीला प्रति विद्यार्थी २७ हजार रुपये दराची मागणी केली होती. चर्चेनंतर हा दर २५ हजार रुपये करण्यात आला. यानुसार सुमारे ४ हजार ५०० विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी महापालिकेकडून आर्थिक मदत दिली जाणार आहे.

या प्रस्तावावर स्थायी समितीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या नगरसेवकांनी आक्षेप घेतला. महापालिकेच्या शाळा खासगी संस्थांच्या ताब्यात देऊ नये. अशी भूमिका विरोधकांनी मांडली. मात्र मतदानावेळी भाजपाच्या बाजूने १२ तर विरोधात ४ मते पडली. त्यामुळे प्रस्ताव मंजूर झाला. हा निर्णय शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी असल्याचा दावा सत्ताधाऱ्यांकडून केला जात आहे, तर विरोधकांकडून खासगीकरणाचा आरोप करण्यात येत आहे.

## मिसिंग लिंकवर साखळी अपघात ३ कार एकमेकांवर आदळल्या

■ मुंबई

**मुंबई-पुणे** द्रुतगती मार्गावरील बोरघाट परिसरातील नव्याने सुरू झालेल्या 'मिसिंग लिंक' मार्गावर आज सकाळी १० वाजताच्या सुमारास तीन चारचाकी वाहनांचा साखळी अपघात झाला. या अपघातात कोणतीही जीवितहानी किंवा गंभीर दुखापत झाली नाही मात्र तिन्ही वाहनांचे नुकसान झाले.

पुण्याकडे जाणाऱ्या लेनवरील केबल-स्टेड पुलावर मुंबईहून पुण्याकडे जाणारी फॉर्च्युनर कार अचानक थांबल्याने मागून येणाऱ्या वाहनांना वेळीच नियंत्रण करता आले नाही. फॉर्च्युनर चालक विजय नारायण खाडेने अचानक ब्रेक मारून वाहन तिसऱ्या लेनमध्ये थांबवले. फॉर्च्युनर थांबताच तिच्या मागून येणाऱ्या वर्ना कारने जोरदार धडक दिली. त्यानंतर वर्ना कारच्या मागून येणाऱ्या आणखी एका कारने पुढील वाहनाला धडक दिली. त्यामुळे तीन वाहनांचा साखळी अपघात झाला. या धडकेत वाहनांच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले. अपघातानंतर काही काळ द्रुतगती मार्गावर वाहतुकीचा वेग मंदावला आणि वाहनांच्या रांगा लागल्या.

**मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड**

**निविदा करिता विनंती - MRVC/W/231**

**(दोन लिफाफे ई – प्रोक्योरमेंट निविदा प्रक्रिया)** मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड (MRVC), कॉर्पोरेट कार्यालय दुसऱ्या मजला, चर्चगेट स्टेशन बिल्डिंग, मुंबई – 400 020, **"मुंबई शहरी परिवहन प्रकल्प (MUTP) – टप्पा-IIIA : बोरीवली-विरार स्थानकांदरम्यान प्रस्तावित 5वी व 6वी मार्गाच्या संदर्भात वसई रोड व विरार स्थानकांवरील विविध स्थानक सुधारणा कामांची तरतूद" या कामासाठी ई-निविदा आमंत्रित करत आहे. निविदा आणि निविदा कागदपत्रांचे तपशील ई-प्रोक्युरमेंट वेबसाइट https://eprocure.gov.in/eprocure/app** वर (Tender id - 2026_MRVC_913386_1) उपलब्ध आहेत. **https://eprocure.gov.in/eprocure/app वेबसाइटवर पूर्ण ई-निविदा जमा करण्याची शेवटची तारीख 06 ऑगस्ट 2026 च्या 15:00 वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी आहे. शुद्धीपत्र, जर असेल तर, केवळ वेब साइटवर प्रसिद्ध केले जाईल.** SNP 02

## जळगाव जिल्ह्यातील २६ हजार शेतकऱ्यांना कर्जमुक्ती नाही

**जळगाव** - कर्जाच्या विळख्यात सापडलेल्या शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली खरी. परंतु राज्य शासनाने २ जून रोजी जाहीर केलेल्या नव्या निकषांचा परिणाम हा की जिल्ह्यातील २६ हजारांवर शेतकरी या कर्जमुक्तीपासून वंचित राहणार आहेत. या शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची योजना लागू व्हावी यासाठी जिल्हा बँक अध्यक्ष संजय पवार मुख्यमंत्र्यांना निवेदन देणार आहेत.

**MAHAVITARAN** Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**TENDER NOTICE**

Tenders are invited for supply of 11/0.433 kV and 22/0.433 kV 315 kVA and 630 kVA Three Phase, Copper Wound, Dry Type, Indoor Distribution Transformer through e-tendering process with Estimated Cost of Rs. 1,734 Lakhs against MSEDCL advertised Tender on website vide No. MMD/T-HTM1-08/0626 due for submission on dtd. 06.07.2026. For details please visit website: https://etender.mahadiscom.in/eatApp/

HO PR No. 145 / 26 dtd 16.06.26 Chief Engineer (MMD)

**मुख्य कार्यालय**
यशवंत नगर, विरार (प)

**दूरध्वनी :** ०२५०- २५२२५१०१/०२/०३/०४/०५/०६
**जि. पालघर** ४०१ ३०३
**फॅक्स :** ०२५०-२५२५१०७
**ई-मेल :** vasaivirarcorporation@yahoo.com
**जा.क्र.: वविशम/बांध/श.अ./८५/२०२६**
**दि. :** १७/०६/२०२६

**बांधकाम विभाग, मुख्यालय, विरार (प)**
**जाहीर फेर ई- निविदा सुचना**

वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ''ई'' नालासोपारा (प) अंतर्गत खालील उल्लेखित कामाचे कोरे निविदा फॉर्म **https://Mahatenders.gov.in** या अधिकृत संकेतस्थळावर दि. १८/०६/२०२६ पासून उपलब्ध होणार आहेत. ई- टेंडरींग बाबत अधिक माहितीसाठी ई - निविदा कक्ष, वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय येथे संपर्क साधावा.

१. **प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पु.) वॉर्ड क्र.१५मध्ये सिद्धी होम्स अपार्टमेंट ते संयुक्त नगर सर्कल पर्यंत सी.सी. गटार बांधणे व मातृ आशिष अपार्टमेंट तसेच सुदीप अपार्टमेंट जवळ आर.सी.सी. क्रॉसिंग बांधणे.**
२. **प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पु.) प्रभाग क्र.१५ मधील साईरथ अपार्टमेंट ते रामकृपा अपार्टमेंट पर्यंत रस्त्यालगत आर. सी. सी. गटार बांधणे.**

**जा.क्र.: वविशम/श.अ./बांध/८५/२०२६-२७**
**दि. :** १७/०६/२०२६
**Please Visit our official web-site (https://Mahatenders.gov.in)**

सही/-
**(प्रदीप पाचंगे)**
प्र. शहर अभियंता
वसई-विरार शहर महानगरपालिका

**जावक क्र. व.वि.श.म./मा.व.ज./३३१/२०२६**

**MAHAVITARAN** Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**TENDER NOTICE**

Tenders are invited for supply of 11/0.433 kV and 22/0.433 kV 315 kVA Three Phase, Copper Wound, Indoor Distribution Transformer through e-tendering process with Estimated Cost of Rs. 10,958 Lakhs against MSEDCL advertised Tender on website vide No. MMD/T-HTM1-07/0626 due for submission on dtd. 06.07.2026. For details please visit website: https://etender.mahadiscom.in/eatApp/

HO PR No. 146 / 26 dtd 16.06.26 Chief Engineer (MMD)

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ**
म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना क्र. ४०/२०२६-२७**

कार्यकारी अभियंता (पश्चिम) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (दूरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४३२) हे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे / सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन/सीपीडब्ल्यूडी/एमईएस/मुंबई महानगरपालिका/सिडको/ रेल्वे/बीपीटी/एमआयडीसी/एम.जे.पी. यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकूण/ २ कामांकरीता बी-१ (Percantage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर **http://mahatenders.gov.in,** उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे..

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | १८/०६/२०२६ सकाळी १०.३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | २५/०६/२०२६ दुपारी ३.०० वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | २९/०६/२०२६ दुपारी ३.०५ नंतर | ४ | आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक | ३०/०६/२०२६ सकाळी १०.३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**टीप :** १. विस्तृत ई-निविदा सूचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
**टीप :** २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (प).**
**मुं.झो. सु.मंडळ, मुंबई**

CPRO/A/469

**म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था** Follow us: @mhadaofficial

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE No. 08/2026-2027**

The Executive Engineer (Civil) EHV CCCM Division, Airoli on behalf of MSETCL (the employer) hereby invites SRM e-tender mentioned below from registered contractors of appropriate class with central or State Govt. /Semi Govt. Department and also registered under M.S.E.T.C.L.'s SRM e-tender registration system on Mahatransco SRM E-Tendering Website.

| Sr.No. | RFx No. | Name of work |
|---|---|---|
| 1 | 7000040360 | Annual Maintenance Contract for civil works for staff quarters at 220 KV Mulund, 220 KV Bhandup, 220 KV Kolshet, 220KV Colourchem, 220KV Trombay, 220KV Borivali S/stn. for the FY 2026-27. |
| 2 | 7000040293 | Providing pest control services and annual weed control services at various staff quarters buildings & premises at various locations under EHV CCCM Division, Airoli FY 2026-27 |

For further details visit our Website **https://srmetender.mahatransco.in (Guest User)**
**Contact Person:** Addl. Executive Engineer (Civil),
Tel. No. 022-27601814 (O), Mob. 7666164208

**Sd/-**
**Executive Engineer (Civil), Airoli.**

**जाहीर घोषणा**
(नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ च्या कलम १०२ अन्वये)

**श्रीमती मंजू मधुसूदन मिमानी यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**
**(मधुरम फॅब्रिक्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामिनदार)**

**संबंधित तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | वैयक्तिक जामीनदाराचे नाव | श्रीमती मंजू मधुसूदन मिमानी |
| २. | वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता | बी-२०४, शिव गौरी अपार्टमेंट्स, लिंक रोड जवळ, हॉटेल प्राईड जवळ, मालाड पश्चिम, मुंबई-४०००६४ |
| ३. | वैयक्तिक जामीनदाराच्या संदर्भात दिवाळखोरी प्रारंभ दिनांक | १२.०६.२०२६ |
| ४. | अर्जाचा स्वीकार करणाऱ्या आदेशाचा तपशील | माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठाने कलम ९४ अन्वये दाखल करून घेतलेल्या याचिका क्रमांक सी.पी (आयबी) क्र. २३८/एमबी/२०२६ मधील आयबीसी, २०१६ च्या कलम १०० अन्वये दिनांक १२.०६.२०२६ रोजीचे आदेश. |
| ५. | रिझोल्यूशन प्रोफेशनल म्हणून काम करणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | आयपी उदयकुमार भास्कर भट नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P01425/2018-2019/12234 |
| ६. | मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | **पत्ता -** फ्लॅट क्र. बी-३०४, गोल्डविले, डांगे चौक, औंध रावेत रोड, थेरगाव, पुणे-४११०३३ **ईमेल :** udaybhat2805@gmail.com |
| ७. | दिवाळखोरी व्यावसायिकाशी पत्रव्यवहारासाठी वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | **पत्ता -** फ्लॅट क्र. १९०२, विंग ६, एक्स बीकेसी, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ **ईमेल :** udaybhat.ip@gmail.com |
| ८. | दावे सादर करण्याची शेवटची तारीख | ०७.०७.२०२६ |
| ९. | संबंधित फॉर्म येथे उपलब्ध आहे | वेबलिंक: https://www.ibbi.gov.in/home/downloads |

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठाने श्रीमती मंजू मधुसूदन मिमानी (मधुरम फॅब्रिक्स प्रायव्हेट लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार) यांच्या दिवाळखोरी निवारण प्रक्रियेला दिनांक १२.०६.२०२६ पासून सुरुवात करण्याचे आदेश दिले आहेत.
डॉ. अपर्णा अंबरीश दरक यांच्या धनकोंना याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की त्यांनी त्यांचे दावे पुराव्यासह दिनांक ०७.०७.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी नोंद क्र. ७ समोर नमूद केलेल्या पत्त्यावर रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे सादर करावेत.
धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे आणि टपालाने सादर करावेत.
खोटे किंवा दिशाभूल करणारे दावे अथवा पुरावे सादर केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

सही/-
उदयकुमार भास्कर भट
रिझोल्यूशन प्रोफेशनल
सौ. मंजू मधुसूदन मीमानीकरिता
(मधुरम फॅब्रिक्स प्रायव्हेट लिमिटेडच्या वैयक्तिक जामीनदार)
IBBI/IPA-001/IP-PO1425/2018-19/12234
एएफए ची वैधता - ३१.१२.२०२६ पर्यंत
**ईमेल:** udaybhat.ip@gmail.com

दिनांक: १७.०६.२०२६
ठिकाण: पुणे

**आयबीबीआयसह नोंदणीकृत पत्ता:** - फ्लॅट क्र. बी-३०४, गोल्डव्हिले, औंध रावेत रोड, दांगे चौक, थेरगाव, पुणे-४११०३३.
**ईमेल:** udaybhat2805@gmail.com

# कुणाल खेमू बनला सूत्रसंचालक



अभिनेता कुणाल खेमू आता एका वेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीस येण्यासाठी सज्ज झाला आहे. तो 'अलायन्स' या आगामी रिअलिटी शोद्वारे सूत्रसंचालक (होस्ट) म्हणून आपले पदार्पण करत आहे. हा शो २६ जून २०२६ पासून जागतिक स्तरावर प्रदर्शित केला जाणार आहे. हा शो जगप्रसिद्ध डच फॉरमॅटचा पहिला आंतरराष्ट्रीय रिमेक असून, त्याची मूळ संकल्पना जॉन डी मोल यांनी 'टॅल्पा स्टुडिओ'च्या माध्यमातून तयार केली होती. भारतात बॅनिजय एशिया या संस्थेने या शोची निर्मिती केली असून, भारतीय प्रेक्षकांच्या आवडीनुसार यामध्ये काही बदल करण्यात आले आहेत. हा शो एकूण ६ आठवडे चालणार असून, यामध्ये ४२ एपिसोड्स पाहायला मिळतील.

या शोमध्ये एकूण १६ स्पर्धक सहभागी होणार असून, हे स्पर्धक सुरुवातीला दोन-दोनच्या जोड्यांमध्ये 'मित्र' म्हणून खेळात प्रवेश करतील. खेळ जसजसा पुढे जाईल, तसतसे स्पर्धकांना समजेल की, इथे कोणतीही मैत्री कायमस्वरूपी नाही. विश्वास, रणनीती, फसवणूक आणि बदलती समीकरणे यावर हा खेळ आधारित असेल. सर्व आव्हानांवर मात करून शेवटी केवळ एकच स्पर्धक या खेळाचा महाविजेता ठरेल.

# क्रिस्टोफर नोलन यांची मुंबईसवारी!



युनिव्हर्सल पिक्चर्स इंटरनॅशनल आणि चित्रपट निर्मात्यांनी 'द ओडिसी'च्या जागतिक प्रीमियर दौऱ्यामध्ये लंडन, पॅरिस आणि न्यूयॉर्क या जागतिक शहरांच्या पंक्तीत मुंबईचा अधिकृतपणे समावेश केला आहे. या प्रीमियरसाठी ऑस्करविजेते दिग्दर्शक क्रिस्टोफर नोलन यांच्यासोबत चित्रपटातील मुख्य कलाकार मॅट डॅमन, टॉम हॉलंड आणि ऑस्करविजेत्या निर्मात्या एम्मा थॉमस यादेखील मुंबईत उपस्थित राहणार आहेत. क्रिस्टोफर नोलन यांच्या कारकिर्दीत त्यांच्या एखाद्या चित्रपटाचा भारतात भव्य प्रीमियर होण्याची ही पहिलीच वेळ आहे. हा भव्य प्रीमियर मुंबईतील 'पीव्हीआर आयकॉन आयमॅक्स: फिनिक्स पॅलेडियम' (लोअर परळ) येथे पार पडणार आहे.

संपूर्ण जगभरात चित्रीकरण झालेला 'द ओडिसी' हा संपूर्णपणे आयमॅक्स कॅमेऱ्यांनी चित्रीत केलेला जगातील पहिला फिचर फिल्म (चित्रपट) ठरला आहे. यासाठी अगदी नवीन आयमॅक्स फिल्म टेक्नॉलॉजीचा वापर करण्यात आला आहे. या चित्रपटात मॅट डॅमन आणि टॉम हॉलंड यांच्याव्यतिरिक्त ॲन हॅथवे, रॉबर्ट पॅटिनसन, लुपिता न्योंगो, समांथा मॉर्टन, झेंडाया आणि चार्लीझ थेरॉन यांच्यासारख्या तगड्या हॉलीवूड कलाकारांची फौज पाहायला मिळणार आहे. हा चित्रपट १७ जुलै रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# कल्कीचा फायद्याचा सौदा

गेल्या काही महिन्यांत चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकारांनी केलेल्या रिअल इस्टेट व्यवहारांच्या यादीत आता बॉलिवूड अभिनेत्री कल्कीच्या कराराची भर पडली आहे. कल्की कोचलिन हिने मुंबईतील



अंधेरी वेस्ट परिसरातील आपला फ्लॅट २ कोटी ५५ लाख रुपयांना विकला आहे. 'स्क्वेअर यार्ड्स' या नामांकित प्रॉपर्टी रजिस्ट्रेशन दस्तऐवजांचा हवाला देत हे वृत्त समोर आले आहे. या घराचा कारपेट एरिया १,२३० स्क्वेअर फूट इतका आहे. तो युवराज आहुजा नामक व्यक्तीने खरेदी केला असून, या व्यवहाराची अधिकृत नोंदणी २१ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आली. या व्यवहारामुळे मुंबईतील घरांच्या किमतीत गेल्या काही वर्षांत झालेली मोठी वाढ अधोरेखित झाली आहे. कल्की कोचलिन हिने डिसेंबर २०१५ मध्ये हा फ्लॅट १ कोटी ९५ लाख रुपयांना खरेदी केला होता. आता जवळपास दशकभरानंतर (११ वर्षांनी) तिने हा फ्लॅट २ कोटी ५५ लाख रुपयांना विकल्यामुळे, तिला या गुंतवणुकीतून सुमारे ६० लाख रुपयांचा थेट नफा झाला आहे.

# प्रभासच्या 'कल्की २' मध्ये आलियाची वर्णी?

कल्की २८९८ एडी' या महाकाव्यात्मक चित्रपटाच्या दुसऱ्या भागात अभिनेत्री आलिया भट्ट महत्त्वाची भूमिका साकारणार असल्याची चर्चा सध्या चित्रपटसृष्टीत रंगली आहे. पहिल्या भागाच्या प्रचंड यशानंतर प्रेक्षकांमध्ये या सिक्वेलबद्दल मोठी उत्सुकता असून, आलियाच्या प्रवेशामुळे यात अधिक रंग भरले जाणार आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, आलियाला या चित्रपटासाठी विचारणा झाली असून, ती सध्या स्क्रिप्टच्या अंतिम टप्प्यावर चर्चा करत आहे. या चित्रपटात ती महत्त्वपूर्ण आणि शक्तिशाली पात्रात दिसू शकते. 'नाग अश्विन दिग्दर्शित या चित्रपटाच्या टीमने अद्याप अधिकृत घोषणा केलेली नाही. परंतु सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आलिया आणि निर्माते यांच्यात प्राथमिक चर्चा सकारात्मक झाली आहे.

हा करार पूर्ण झाला, तर प्रभास आणि आलिया भट्ट ही जोडी पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर एकत्र पाहणे प्रेक्षकांसाठी पर्वणीच ठरेल. पहिल्या भागात अमिताभ बच्चन, कमल हासन, दीपिका पदुकोण आणि प्रभास यांच्या अभिनयाने प्रेक्षकांना भुरळ घातली होती.

# भारतीचे 'आलिशान' पाऊल

लोकप्रिय कॉमेडियन भारती सिंह आणि तिचे पती हर्ष लिंबाचिया यांच्या यशाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या स्टार दाम्पत्याने काही कोटी रुपयांचा एक आलिशान आणि भव्य स्टुडिओ खरेदी केला असून, नुकताच त्यांनी आपल्या दोन्ही मुलांसह तिथे अत्यंत उत्साहात गृहप्रवेश केला. आपल्या नव्या ऑफिसच्या या खास क्षणी भारती कमालीची भावुक झाली होती. भारतीने तिच्या यूट्यूब ब्लॉगच्या माध्यमातून चाहत्यांना ही आनंदाची बातमी दिली असून, तिच्या नव्या स्टुडिओची झलकही दाखवली आहे. भारती आणि हर्ष यांनी अवघ्या काही वर्षांत आपल्या मेहनतीच्या जोरावर मनोरंजन विश्वात एक मोठे साम्राज्य उभे केले आहे. अलिशान घरे आणि महागड्या गाड्यांनंतर आता त्यांनी स्वतःचा स्टुडिओ सुरू केला आहे. या यशाबद्दल बोलताना भारती भावुक झाली आणि तिने प्रेक्षकांचे आभार मानले. मित्रांनो, हा नवा स्टुडिओ केवळ तुमच्या प्रेमामुळे आणि आशीर्वादामुळे शक्य झाला आहे, तुमचे हेच प्रेम पुढेही पाठीशी राहू द्या, अशा शब्दांत तिने आपल्या भावना व्यक्त केल्या.



# करणची पावले मल्याळम चित्रपटसृष्टीत

**करण जोहरची 'धर्मा प्रॉडक्शन्स' आता मल्याळम चित्रपटसृष्टीत पदार्पण करण्यास सज्ज झाली आहे. पृथ्वीराज सुकुमारन आणि मंजू वॉरियर यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'ओडियन: द एज ऑफ इल्युजन' हा चित्रपट या दोन्ही प्रॉडक्शन्सच्या सहकार्यातून साकारला जाणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन राहुल सदाशिवन करणार आहेत, जे 'भूतकालम' आणि 'ब्रमयुगम' सारख्या चित्रपटांसाठी प्रसिद्ध आहेत.**

**या चित्रपटाची निर्मिती करण जोहर, आदर पूनावाला, अपूर्व मेहता आणि सुप्रिया मेनन हे करणार आहेत. १९ व्या शतकातील केरळमधील लोककथा आणि पौराणिक कथांवर हा चित्रपट आधारित असून, त्यात एका भयावह आकृतीची कथा मांडली जाणार आहे. एका शक्तिशाली मातृसत्ताक घरावर आलेल्या संकटाची ही गोष्ट असेल.**



**करण जोहरने सांगितले की, मल्याळम सिनेमाच्या कथेची मांडणी आणि प्रेक्षकांचा चित्रपट निर्मात्यांवर असलेला विश्वास यामुळे या विश्वाचा भाग होण्यास मी उत्सुक होतो. ओडियन ही दंतकथा नसून केरळच्या अस्मितेचा एक भाग असल्याने ती जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न यानिमित्ताने केला जाणार आहे.**

# दिल्लीतून आयएसआयशी संबंधित ७ जणांना अटक

कट उधळला

■ नवी दिल्ली

**राजधानी** दिल्ली आणि आसपासच्या परिसरात मोठा हल्ला घडवून आणण्याचा कट दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने उधळला आहे. पोलिसांनी पाकिस्तानी गुप्तहेर यंत्रणा आयएसआयशी संबंधित



असलेल्या एका आंतरराष्ट्रीय दहशतवादी-गुन्हेगारी जाळ्याचा पर्दाफाश करत सात संशयितांना अटक केली. हे आरोपी दिल्ली-एनसीआरमधील संवेदनशील ठिकाणे, काही हिंदू नेते, प्रमुख व्यक्ती आणि महत्त्वाच्या आस्थापनांची रेकी करत असल्याचा तपास यंत्रणांचा दावा आहे.

या कारवाईत लोणी येथील रहिवासी अनस उर्फ अनस त्यागी (२६), मोहित उर्फ योगी (२६), साबिर (३०), आरिफ उर्फ प्रधान (३०), ट्रोनिका सिटी येथील रहिवासी दीपक उर्फ दीपक अग्रोल (३८), जतन (२९) आणि पंजाबमधील फतेहगड साहिब येथील करणवीर सिंग (२६) यांना अटक करण्यात आली आहे. या सर्वांचा मोठा गुन्हेगारी इतिहास आहे. त्यांच्यावर खून, दरोडा, खुनाचा प्रयत्न, शस्त्र कायदा आणि गुंड कायदा यासह अनेक गुन्हेगारी खटले दाखल आहेत. आरोपी पाकिस्तानस्थित सूत्रधारांच्या संपर्कात होते व त्यांनी रेकी केलेल्या ठिकाणांचे फोटो व व्हिडिओ एनक्रिप्टेड माध्यमातून पाठवल्याचा आरोप आहे. या कारवाईत आरोपींकडून अत्याधुनिक पिस्तुले, काडतुसे, मोबाईल फोन व डिजिटल पुरावे जप्त करण्यात आले आहेत.

# भीमाशंकर मंदिरात दररोज सकाळी ७ ते ११ मोफत दर्शन

**पुणे- बारा** ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरात भाविकांसाठी मोफत दर्शनाची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. ३० जून २०२६ पर्यंत दररोज सकाळी ७ ते ११ या वेळेत भाविकांना मोफत दर्शन घेता येणार आहे.

मंदिर प्रशासनाने गर्दीचे नियोजन आणि भाविकांची सुविधा लक्षात घेऊन ही व्यवस्था लागू केली आहे. दर्शनासाठी इच्छुक भाविकांनी ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक असून, नोंदणी केलेल्या भाविकांना दर्शनासाठी येताना वैध ओळखपत्र सोबत आणणे बंधनकारक राहणार आहे.

# तापमानवाढीचा विद्यार्थ्यांना त्रास
# शाळा सकाळच्या सत्रात भरवा

शिक्षक संघटनेची मागणी

■ मुंबई

**राज्यात** पावसाळा लांबल्याने अनेक भागांत उकाडा आणि पाणीटंचाईची परिस्थिती कायम आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून शाळा तात्पुरत्या स्वरूपात सकाळच्या सत्रात भरवाव्यात, अशी मागणी ॲक्टिव्ह टीचर्स फोरमने शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्याकडे केली आहे.

दुपारच्या सत्रातील वाढत्या तापमानामुळे विद्यार्थ्यांना त्रास होत असल्याचे सांगत, विदर्भ वगळता राज्यातील इतर शाळांच्या वेळेत पुढील काही दिवस बदल करावा, अशी मागणी ॲक्टिव्ह टीचर्स फोरमचे राज्य संयोजक भाऊ चासकर यांनी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना पत्र देऊन ही मागणी केली आहे. या पत्रात लिहिले आहे की, पुढील किमान १५ दिवस शाळांच्या वेळेत बदल करून सकाळचे सत्र ठेवावे. सध्या अनेक जिल्ह्यांमध्ये एप्रिल-मे महिन्यासारखा उकाडा जाणवत आहे. अशा वातावरणात दुपारी शाळा भरवल्यामुळे विद्यार्थ्यांना वर्गात बसणे कठीण होत असून, आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

अनेक सरकारी आणि अनुदानित शाळांमध्ये अजूनही पत्र्यांच्या वर्गखोल्या आहेत. उन्हामुळे या खोल्या अधिक तापतात. त्यातच काही ठिकाणी वीजपुरवठा अपुरा असल्याने पंखे बंद राहतात आणि विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागतो.

डोंगराळ भागातील आणि वाड्या-वस्त्यांवरील अनेक शाळांमध्ये पिण्याचे पाणी तसेच स्वच्छतागृहांसाठी आवश्यक पाण्याची कमतरता जाणवत आहे. यामुळे विशेषतः विद्यार्थिनींच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर आहे. दरवर्षी उन्हाळ्यात तापमान वाढल्याने मार्च-एप्रिलमध्ये शाळा सकाळच्या सत्रात घेण्यात येतात.

# वाशी रुग्णालयात नवजात बालकांच्या पूरक आहारात गोमांसाच्या उल्लेख

■ वाशी

**नवी मुंबई** महानगरपालिकेच्या वाशी येथील रुग्णालयात नवजात बालकांच्या पूरक आहारासंदर्भातील मार्गदर्शक फलकावर गोमांसाचा उल्लेख करण्यात आल्याने वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणावर आक्षेप घेत बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी रुग्णालयात जाऊन संबंधित फलक हटवला आणि जबाबदारांवर कारवाईची मागणी केली आहे.

१४ जून रोजी बजरंग दलाचे कार्यकर्ते रोहित खंडागळे हे वाशी येथील महापालिका रुग्णालयात गेले असता, रुग्णालयाच्या भिंतीवर भारतीय बालरोग अकादमी विभागच्या नावाने वय ९ ते ११ महिने पूरक आहार मार्गदर्शक या शीर्षकाखाली पत्रक लावण्यात आल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या पत्रकात पूरक आहाराच्या यादीमध्ये बारीक चिरलेले मांस (चिकन, मटण, गोमांस)'असा उल्लेख करण्यात आला होता.यावर आक्षेप घेत बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी हा उल्लेख हिंदू समाजाच्या धार्मिक भावना दुखावणारा असल्याचा आरोप केला. हिंदू धर्मात गाय पूजनीय मानली जाते. त्यामुळे सार्वजनिक रुग्णालयात अशा प्रकारचा सल्ला देणारे पत्रक लावणे अयोग्य असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या प्रकरणी संबंधित पत्रक तयार करणाऱ्या आणि प्रदर्शित करणाऱ्या जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करावी, तसेच या प्रकाराची चौकशी




करून दोषींवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात वाशी पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले आहे.

# मराठी भाषेच्या संवर्धनासाठी ब्राह्मण संघाचा विशेष उपक्रम

■ मुंबई

**मराठी** भाषा, साहित्य आणि संस्कृतीचा समृद्ध वारसा जपण्यासाठी ब्राह्मण सभा, मुंबई आणि चित्तपावन ब्राह्मण संघ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'माय मराठी' (श्वास मराठी, ध्यास मराठी) या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम शनिवार, २० जून रोजी सायंकाळी ६ ते ८ वाजता ब्राह्मण सभा येथे पार पडणार आहे.

मराठी भाषेच्या संवर्धनाचा संदेश देत या कार्यक्रमात प्रसिद्ध कवी आणि नाटककार कुसुमाग्रज यांच्या 'वीज म्हणाली धरतीला' या नाटकातील काही भागांचे अभिवाचन सादर केले जाणार आहे. राणी लक्ष्मीबाई यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित केलेल्या या कार्यक्रमातून मराठी साहित्य, इतिहास आणि संस्कृतीला अभिवादन करण्यात येणार आहे. मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून महाराष्ट्राच्या अस्मितेची, परंपरेची आणि सांस्कृतिक ओळखीची प्रतीक आहे, हा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे.

आयोजकांनी सर्व मराठीप्रेमींना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. या कार्यक्रमासाठी भूषण शिदूत (९८२११५४७९६) आणि अनघा बेडेकर (९८६९४८५६३२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भेसळखोरांना अन्न विभागाचा दणका वसई-विरारमधील १८ दुकाने सील

■ वसई

**अन्न** व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानंतर वसई-विरार शहरात भेसळयुक्त अन्नपदार्थ आणि प्रतिबंधित गुटखा विक्रेत्यांविरोधात धडक कारवाई करण्यात आली आहे. अवघ्या दोन आठवड्यात प्रशासनाने विविध ठिकाणी कारवाई करून १८ दुकाने सील केली आहे. या कारवाईत १४ लाख रुपयांहून अधिक किमतीचा संशयित भेसळयुक्त आणि प्रतिबंधित माल जप्त केला असून, १९ जणांना अटक केली आहे. कारवाईदरम्यान तीन ठिकाणांहून ४ हजार ७९८ किलो संशयित खाद्यतेल जप्त करण्यात आले. तसेच ९८६ लीटर निकृष्ट दर्जाचे आईस्क्रीम आणि प्रतिबंधित गुटखा-पानमसाला जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे भेसळ करणारे आणि गुटखा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# मुंबईत जागतिक दर्जाचे टेनिस केंद्र
## म्हाडा-महाटेनिस फाऊंडेशनचा करार

■ मुंबई

**मुंबई** शहर आणि उपनगरांमध्ये टेनिस खेळाच्या विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) आणि महाटेनिस फाऊंडेशन यांच्यात सामंजस्य करार झाला. या भागीदारीतून अंधेरी येथील मौजे कोले कल्याण परिसरातील सुमारे २ एकर भूखंडावर अत्याधुनिक टेनिस सुविधा केंद्र उभारण्यात येणार आहे.

या प्रकल्पासाठी म्हाडामार्फत महाटेनिस फाऊंडेशनला हा भूखंड ३० वर्षांच्या कालावधीसाठी संयुक्त भागीदारी तत्त्वावर उपलब्ध करून दिला जाणार आहे. या ठिकाणी जागतिक दर्जाची टेनिस कोर्ट, खेळाडूंसाठी प्रशिक्षण सुविधा, स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा तसेच इतर पूरक सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. या सामंजस्य करारावेळी म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर तसेच दोन्ही संस्थांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्य शासनाच्या मंजुरीनुसार या प्रकल्पासाठी म्हाडाकडून १० कोटी रुपये, तर महाटेनिस फाऊंडेशनकडून ५ कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. या करारानुसार अंधेरीतील भूखंडाची मालकी, हक्क आणि ताबा पूर्णपणे म्हाडाकडेच राहणार आहे.

# वडिलांच्या निधनानंतर मुलाचा आत्महत्येचा प्रयत्न

■ विरार

**वडिलांचे** निधन झाल्याने खचलेल्या मुलाने तानसा नदीत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र मांडवी पोलिसांनी प्रसंगावधान दाखवून त्याचे प्राण वाचवले.

मुंबई-बडोदा राष्ट्रीय महामार्गावरील तानसा नदीच्या नवीन बांधकाम सुरू असलेल्या पुलावर एक व्यक्ती बसली असून, नदीत उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न असल्याची माहिती मांडवी पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखत साध्या वेशात घटनास्थळी पोहोचून स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्या व्यक्तीला कोणतीही चाहूल लागू न देता हळूहळू त्याच्याजवळ पोहोचले. क्षणाचाही विलंब न करता त्याला पुलाच्या कठड्यावरून सुरक्षितपणे बाजूला नेत आणि आत्महत्येपासून परावृत्त केले. सदर व्यक्ती ४० वर्षांचा असून, मुळ भिवंडी तालुक्यातील आहे. दोन दिवसांपूर्वी वडिलांचे निधन झाल्याने तो मानसिकदृष्ट्या खचला होता.

# स्वतंत्र तोंडी पुरावा नसल्यास पोलिसांचा पुरावा कायद्याच्या चौकटीत कुचकामी


सत्र न्यायालयाचे निरीक्षण

■ मुंबई

**जोपर्यंत** प्रत्यक्षदर्शी किंवा जखमी व्यक्ती गुन्ह्याला दुजोरा देत नाहीत, तोपर्यंत केवळ हत्यारे जप्त करणे किंवा वैद्यकीय प्रमाणपत्र असणे यावरून आरोपींचा गुन्हा सिद्ध होत नाही. स्वतंत्र तोंडी पुरावा नसेल तर पोलिसांचा ढोबळ पुरावा कायद्याच्या चौकटीत कुचकामी ठरतो, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सत्र न्यायालयाने नोंदवले. चेंबूर येथील मारहाण प्रकरणातील चौघा आरोपींना निर्दोष मुक्त करताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले.

नेहरू नगर पोलिसांनी नोंदवलेल्या मारहाणीच्या गंभीर गुन्ह्यात मुख्य फिर्यादी आणि जखमी साक्षीदार न्यायालयात फितूर झाले. त्याची नोंद घेत अतिरिक्त सत्र न्यायाधीश उमेश सोटे यांनी सुरेश सुवासीया, सुप्रिया सुरेश सुवासीया, दिवाण सुवासीया आणि नवीन सुवासीया (सर्व रा. राजीव गांधी नगर, ठक्कर बाप्पा कॉलनी, चेंबूर) या एकाच कुटुंबातील चौघा आरोपींना निर्दोष मुक्त केले. नेहरू नगर पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या एफआयआरनुसार ही घटना १५ ऑगस्ट २०२४ रोजी चेंबूरच्या ठक्कर बाप्पा कॉलनीमध्ये घडली होती. फिर्यादी दिनेश बोहरा यांच्या शेजारी राहणाऱ्या मोती सुवासीया यांच्या घराच्या बांधकामावरून वाद झाला होता. त्या वादाचे पर्यावसान हाणामारीत झाले होते.

# नवाकाळ शब्दकोडे-१६४०



## आडवे शब्द –

१. एकाकी पडलेला ४. नवसाला पावणारा देव ६. आकर्षक ९. धोरणी, धूर्त १२. ऐकू येण्याजोगे १३. लाकडी जिना; मुंबईचे एक उपनगर १५. आसरा १७. तपासणी करणारा १८. जीव; गाजलेला हिंदी अभिनेता १९. पळून गेलेला २१. रहस्य २२. स्तुतिपाठक २३. वात्सल्य; माया २५. दुधाचा एक पदार्थ २६. बायको २९. आरोळी, गर्जना ३२. शांतता ३५. मिठाईवाला ३७. मूल्य, किंमत ३९. फुटाणे ४०. लोकवार्ता, अफवा ४२. व्यवस्थित ४३. चोळी ४५. स्त्री, विलासी स्त्री ४७. मौज, गंमत ४८. ध्येय ४९. अंगचोरपणा, काम मनापासून न करणे ५१. चार चाकी वाहन ५२. लिव्हरचा आजार, कावीळ ५३. मालक ५४. हाक ५५. प्रतिबंध, रोखणे ५६. पतीचे किंवा पत्नीचे वडील ५८. हल्ल्याला उत्तर, प्रतिहल्ला ६०. अगदी हळू चालणारा कीटक ६२. वाटप करणारा ६५. कबूतर ६६. इनामी उत्पन्न असलेला ६७. रुग्णाची सेवा ६८. जुने व कट्टर शत्रुत्व ७०. पदवी, किताब ७२. ठाणे ७३. सकाळ ७५. सूची, जंत्री ७७. दह्याचे पाचक पेय ७८. इतरांहून निराळे, नामी ८०. बॉडीगार्ड ८२. एक टोक किंचित तिरके असलेले जमीन उकरण्याची कांब ८४. साखरेचा रस ८५. भरतीची वेळ ८७. जन्मतः लाभलेले ८९. समान, सारखा ९०. अरिष्ट ९१. आंब्याचे बी ९२. याच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने बनते ९३. उसाचा रस काढण्याचे साधन ९५. शक्ती ९७. गुणांची चहा ९९. आस, चाकाचा कणा १००. जंगली रेडा १०१. पहारा १०३. इच्छा १०५. सामूहिक शोक १०७. अलगुज १०८. प्रवासी, पांथस्थ १०९. चिकित्सा ११०. हस्त, बाहू १११. कुंपण ११२. भाकरीचे एक धान्य ११३. शक्ती गमावलेला ११४. सलगी ११५. शेराचा सोळावा भाग

## उभे शब्द –

१. गरीब स्वभावाचा, निरुपद्रवी २. अर्जुन ३. जेव्हा ४. बरणी ५. तरीसुद्धा ७. दुर्दैवी ८. अलमारी ९. गुमास्ता, दिवाणजी १०. दुधातली बंगाली मिठाई ११. अचूक लागू पडणारे औषध १४. रागावून बोलणे १६. रात्रीचा पाऊस २०. रात्र २१. मुष्टिप्रहार २४. ठेका २७. पतंगाचा धारदार दोरा २८. नांगर ३०. काम टाळणारा ३१. व्यवसाय ३३. निर्मिती, मांडणी ३४. खाऊ, मिठाई ३५. कृश, लुकडा ३६. वाफेचा शेक ३८. कुर्ता व साडीचे उंची व मऊ कापड ४०. राजाची रयत ४१. कर्दम, चिखल ४४. पोपट ४६. कपाळ ४७. पिरॅमिडमधले शव ५०. देव ५२. वस्त्र ५३. आरूढ ५४. भक्कम लाकडाचा प्रकार, त्याचे झाड ५५. मंदिर ५७. निर्जनता ५९. व्यापाऱ्यांनी आपसात दिलेले वचन ६०. गायीचे दूध ६१. नगर ६२. फाडणारे, विदीर्ण करणारे ६३. होडी ६४. खेद ६८. सर्व आयुष्य ६९. तांदळाचा मुख्य पदार्थ ७१. करुणा ७२. अकारण ७४. डिंकाचा अधिक मजबूत पर्याय ७६. दिवा; मुलांचे एक नाव ७७. तंतू, वायर ७९. वनराज ८०. मंगलाष्टकांच्या वेळी वधूवरात असलेला पडदा ८१. कुवत ८३. सोने ८४. चरण ८६. नमुनेदार ८७. लोकसंख्येची मोजणी ८८. छळ ९०. उरूस ९१. शुष्क ९२. पंधरवडा ९४. शिखर, माथा ९६. चहाडी, चुगली ९८. प्रत्येक वर्षी ९९. दलाली १०२. झाड १०४. समाविष्ट १०६. विहिरीतून पाणी शेंदण्याचे साधन १०७. एक वातुळ कडधान्य १०८. किराणा दुकानदार •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६३९ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. कथा ४. आकडेवारी ७. व्योमकेश ९. हेका ११. प्रथमोपचार १३. सकाम १५. दलाल १६. फावडे १९. आभूषण २०. अनीन २२. सारासारविवेक २६. कलश २८. खाष्ट २९. जड ३०. सळसळ ३१. बुटका ३२. मीटर ३४. बाक ३६. मार ३७. गज ३८. कीर ४१. पाकीटमार ४३. मजबुती ४४. रिश्टर स्केल ४६. कलकल ४९. राजा ५०. नाना ५१. चवड ५४. वरकस ५५. टसर ५७. रिता ५८. बीजभाषण ६२. वदन ६४. अनवरत ६७. कलाबूत ६९. रजा ७०. नयनमनोहर ७३. श्रम ७४. मस्करी ७५. जन ७६. वही ७८. लोभस ८०. तालेवार ८१. मामा ८२. सखी ८३. तनमणी ८५. सुरा ८७. नवरा ८९. डंका ९०. ओवा ९१. मामला ९३. सालस ९५. पाईक ९७. ठीक १००. गीताई १०१. वारा १०३. तनया १०५. पारावार १०७. क्षौर १०८. लखलखीत १०९. कमजोर ११०. समान

**उभे शब्द** : १. कुप्रथा २. कमोदिनी ३. थाप ४. आरवसा ५. डेग ६. रीस ७. व्योम ८. केशभूषा ९. हेला १०. कालवश १२. चाफा १४. काळवेळ १५. दणकट १७. डेरा १८. चूर २०. अष्टमी २१. नजर २३. साध्य २४. विसर २५. कसर २७. लकाकी ३१. बुजबुजाट ३३. टक्कर ३४. बाकी ३५. कटक ३६. मारक ३७. गजरा ३९. रचना ४०. परिचारिका ४१. पालव ४२. लोकर ४५. स्केचपेन ४७. लवण ४८. लकडी ५०. नारद ५२. डबीर ५३. प्रभा ५६. सवत ५९. जतन ६०. षडानन ६१. नीला ६३. नभ ६४. अजा ६५. वयस्कर ६६. अनोळखी ६७. करवतकाठी ६८. बूड ६९. रमताराम ७१. यजमान ७२. दंभ ७४. मवाळ ७७. हीन ७८. लोणी ७९. सटवाई ८२. सराईत ८४. मत ८५. सुमारे ८६. मोल ८८. वपा ९२. लागीर ९३. साईल ९४. सवाल ९६. कनक ९८. कपार ९९. निवास १०२. राखी १०४. याम १०६. रमा

# आरोपींकडून खटला लांबवण्याचा प्रयत्न संतोष देशमुख प्रकरणात युक्तिवाद

■ बीड

**सरपंच** संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सुनावणीदरम्यान बुधवारी अतिरिक्त पुरावा म्हणून न्यायालयात सादर करण्यात आलेल्या लॅपटॉपवरून सरकारी पक्ष आणि आरोपी पक्षामध्ये युक्तिवाद झाला. आजच्या सुनावणीत आरोपींच्या वकिलांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे बाजू मांडत, आरोपपत्र दाखल झाल्यानंतर अतिरिक्त पुरावा सादर करता येत नसल्याचा आक्षेप घेतला. त्यावर सरकारी पक्षाने न्यायालयात सविस्तर भूमिका स्पष्ट केली. आरोपी पक्षाकडून वारंवार त्याच मुद्द्यांवर आक्षेप घेत खटला लांबविण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे त्यांनी न्यायालयाला सांगितले. या प्रकरणाची पुढील सुनावणी २२ जून रोजी होणार आहे.



सुनावणीनंतर सहाय्यक विशेष सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे यांनी सांगितले की, अतिरिक्त पुरावा म्हणून सादर करण्यात आलेला लॅपटॉप न्यायालयाने स्वीकारला आहे. लॅपटॉपमधील संपूर्ण माहिती पेनड्राईव्हमध्ये रूपांतरित करून आरोपी पक्षाला देण्यात आली असून, मागणीनुसार क्लोन कॉपीदेखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

याबाबतचा न्यायालयीन रोजनामाही न्यायालयासमोर सादर करण्यात आला आहे. आरोपी पक्षाकडून वारंवार त्याच मुद्द्यांवर आक्षेप घेत खटला लांबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. लॅपटॉपमधील उपलब्ध सर्व डेटा आरोपींना देण्यात आला असून, आमच्याकडे उपलब्ध नसलेली माहिती देणे शक्य नाही. सीसीटीव्ही फुटेजच्या प्रतीदेखील न्यायालयीन आदेशानुसार आरोपी पक्षाला उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.



# अयोध्येतून १,२५० सोने-चांदीच्या श्रीरामशिलाही गायब! तक्रार दाखल

■ अयोध्या

**अयोध्येतील** श्रीराम मंदिराच्या देणग्यांच्या पैशाची चोरी झाल्याच्या आरोपानंतर आणखी एक खळबळजनक दावा करण्यात आला आहे. धर्मसेनेचे संस्थापक आणि श्रीराम मंदिर आंदोलनाशी संबंधित संतोष दुबे यांनी सोने, चांदी, हिरे आणि अष्टधातूपासून तयार केलेल्या तब्बल १,२५० श्रीरामशिला गायब झाल्याचा आरोप केला. या प्रकरणी त्यांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली असून, ट्रस्टच्या व्यवस्थापनावरही प्रश्न उपस्थित केला आहे.

संतोष दुबे यांच्या आरोपानुसार, श्रीराम मंदिरासाठी देश-विदेशातून आलेल्या देणग्यांमध्ये या मौल्यवान शिलांचा समावेश होता. मंदिर आंदोलनाच्या काळात या शिला अयोध्येतील कारसेवकपूरम येथे ठेवल्या होत्या. त्यामध्ये सोने, चांदी, हिरे आणि अष्टधातूच्या शिलांसोबत साध्या दगडांचाही समावेश होता. मात्र आता मौल्यवान शिला गायब असून, केवळ साधे दगड शिल्लक आहेत. या शिलांच्या देखभालीची जबाबदारी मंदिर ट्रस्टच्या अधिकाऱ्यांवर होती. १९८९ च्या श्रीराम मंदिर आंदोलनादरम्यान घरोघरी जाऊन देणग्या गोळा करण्यात आल्या होत्या.

# गिरण्यांच्या कायदेशीर जमिनी ताब्यात घेण्याचे सरकारचे आदेश

पान १ वरून

माहिती ठामपणे सांगू शकत नाही असे ते म्हणाले. मात्र सरकारच्या १५ मार्च २०२४ च्या परिपत्रकाप्रमाणे एमएमआर झोनमधील घरे घेण्याचा पर्याय सरकारने चालू ठेवला आहे. या बैठकीला आमदार सचिन अहिर, गिरणी कामगार कृती संघटनेच्या वतीने जयश्री खाडिलकर-पांडे, प्रवीण घाग, नंदू पारकर, प्रवीण येरूणकर, विजय गणवे इतर संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. शेवटी जमिनीच्या आणि घरांच्या उपलब्धतेनुसार पुढील बैठक घेऊ असे सांगून असीम गुप्ता यांनी बैठक संपल्याचे जाहीर केले.

# अस्तनीतले निखारे असताना बाहेरच्या शत्रूंची उद्धव ठाकरेंना गरज काय?

■ मुंबई

**अस्तनीतले** निखारे असताना बाहेरच्या शत्रूंची उद्धव ठाकरेंना गरज काय? उबाठा नेते दीपक पवार यांच्या एक्स पोस्टमुळे उबाठातील अंतर्गत राजकारण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. रश्मी शुक्ला यांच्या लोकायुक्त कार्यालयातील सदस्यपदी नियुक्ती झाल्यानंतर मिलिंद नार्वेकर यांनी केलेल्या अभिनंदनावरून पवार यांनी नार्वेकर यांच्यावर टीकास्त्र डागले.

**उबाठातील अंतर्गत राजकारण पुन्हा चर्चेत**

दीपक पवार यांनी एक्सवर लिहिले की, आपला पक्ष दुसऱ्यांदा फुटीच्या उंबरठ्यावर असताना पक्ष नेतृत्वाला आधार द्यायचे सोडून मिलिंद नार्वेकर रश्मी शुक्ला यांचं लोकायुक्त कार्यालयात सदस्यपदी नेमणूक झाल्याबद्दल अभिनंदन करतात. ज्या बाईंनी महाविकास आघाडीचे सरकार खिळखिळे करण्यासाठी आपले पद वापरले. एवढेच नव्हे, तर फडणवीस आणि भाजपाच्या एजंट म्हणून मुदतवाढ मिळवून काम केले. अशा व्यक्तीला शुभेच्छा देण्यासाठी उच्च कोटीचे औदार्य किंवा कोडगेपणा असला पाहिजे. मुळात उद्धव ठाकरेंनीच रश्मी शुक्ला यांची झाडाझडती आपल्या सत्तेच्या काळात घ्यायला हवी होती. पण दिलीप वळसेंसारखा पोचट गृहमंत्री असेल तर पोलीस खात्याची मदत बंडखोरांना सुरतला मोकळेपणाने जाऊ देण्यासाठी होऊ शकते. रश्मी शुक्लांवर कारवाई होण्याची काही शक्यता असत नाही. पक्ष फुटून चार वर्षं उलटली. पक्ष दुसऱ्यांदा फुटीच्या उंबरठ्यावर आहे. अशा वेळेस उद्धव ठाकरेंचे विश्वासू वगैरे गणले जाणारे नार्वेकर रश्मी शुक्लांवर फुले वगैरे उधळत असतील तर मिलिंद नार्वेकर आणि राहुल नार्वेकर यांच्यात काहीही फरक करता येणार नाही. असे अस्तनीतले निखारे असताना उद्धव ठाकरेंना बाहेरच्या शत्रूंची काय गरज आहे?


**WIZZMONI FINANCIAL SERVICES LIMITED**
(formerly Unimoni Financial Services Limited)
RO: N.G. 12 & 13 Ground Floor, North Block, Manipal Centre, Dickenson Road, Bangalore - 560 042. CIN No. U85110KA1995PLC018175

**PUBLIC NOTICE**

याद्वारे जनतेला कविण्यात येते की, तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांच्या लिलाव **WIZZMONI FINANCIAL SERVICES LIMITED (formerly Unimoni Financial Services Limited)** द्वारे **24.06.2026** रोजी सकाळी **10.00** वाजता खाली दिलेल्या संबंधित केंद्रावर केला जाईल. लिलाव करण्यात येणारे सोन्याचे दागिने आमच्या विविध ग्राहकांच्या कर्ज खात्यातील आहेत ज्यांनी त्यांची थकबाकी भरली नाही. या कर्जदारांना आमच्या लिलावाच्या नोटिसा रीतसर बजावण्यात आल्या आहेत, लिलाव करण्यात येणारे सोन्याचे दागिने शाखेच्या नावासह खाली नमूद केलेल्या आमच्या विविध ग्राहकांच्या थकीत कर्ज खात्यांचे आहेत.

**Auction Centre Address & Loan Nos: MUMBAI - MIRA ROAD (MUI - OFFICE NO 1,2,3, FIRST FLOOR,S2 - SHOPPING CENTRE,BUILDING NO A, 63/64, SHANTHI-401107,Contact:9819142430) 2302930. MUMBAI - DOMBIVALI (MUL-SWANAND, BHADSAVALE BUNGALOWGROUND FLOOR, SHOP NO. 3, AGADOMBIVLI EAST, THANE, MUMBAI-421201;Contact no: 9833171614) 2173018. MUMBAI - BORIVALI (MBB-BUILDING NO.3, SHOP. 12, DIGONSUMER NAGAR, KORA KENDRA,OPP.FLY VERBRIDGE, BORIVALI(W)-400092;Contact no: 9323599928) 2180093. MUMBAI - ULHASNAGAR (UNR-GROUND FLOOR, JETHANAND CHSLTD, SHOP NO 6-7, NEARMUNCIPAL OFFICE, ULHAS NAGAR-421003; Contact no: 8129700271) 2348328.**

(Reserves the right to alter the number of accounts to be auctioned &/ postpone / cancel the auction without any prior notice)


# पळसदरी-खोपोली मार्गावर तीन दिवस ब्लॉक

■ मुंबई

**मध्य** रेल्वेच्या पळसदरी ते खोपोली स्थानकांदरम्यान ट्रॅक स्पीड रिस्ट्रिक्शन (टीएसआर) संदर्भातील कामांसाठी काल मध्यरात्रीपासून पुढील दोन महिन्यांसाठी विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. दर गुरुवार, शुक्रवार आणि शनिवारी मध्यरात्री १.३० ते पहाटे ४.३० या वेळेत तीन तासांचा ब्लॉक राहणार असून, या कालावधीत पळसदरी - खोपोलीदरम्यान उपनगरीय रेल्वे सेवा बंद राहणार आहे. या ब्लॉकमुळे बुधवार ते शुक्रवार दरम्यान रात्री ११.१८ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथून सुटणारी दिवसातील शेवटची खोपोली लोकल कर्जतपर्यंतच धावणार आहे. तसेच त्यानंतर खोपोलीहून रात्री १२.३० वाजता सुटणारी कर्जत लोकल पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. ब्लॉकपूर्वी सीएसएमटीहून खोपोलीसाठी शेवटची लोकल रात्री १०.२८ वाजता सुटेल, तर खोपोलीहून कर्जतसाठी शेवटची लोकल रात्री ११.२० वाजता धावेल.

# भारतावर हल्ला झाला तर आम्ही मदत करू

पान १ वरून – मिळेल, अशी ग्वाही ट्रम्प यांनी दिली. भारत आणि अमेरिकेचे संरक्षण व व्यापारी संबंध उत्कृष्ट असून, भारतावर कोणत्याही प्रकारचा हल्ला झाल्यास अमेरिका भारताच्या मदतीला धावून येईल, असा पुनरुच्चारही ट्रम्प यांनी या बैठकीत केला. दरम्यान, फ्रान्सच्या एव्हिएन शहरात सुरू असलेल्या जी-७ राष्ट्रांच्या शिखर परिषदेत सर्व राष्ट्रप्रमुखांसोबत छायाचित्रासाठी उभे राहण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प मंचावर चढत असताना पंतप्रधान मोदी यांनी त्यांना मदतीचा हात देऊ केला. ट्रम्प यांनीही सहजच मोदींचा हात पकडला आणि ते मंचावर चढले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. विशेष म्हणजे गेल्या वर्षी भारतीय लष्कराने पाकिस्तानात घुसून केलेल्या ऑपरेशन सिंदूरनंतर तब्बल १६ महिन्यांनंतर ट्रम्प आणि मोदी यांची ही पहिलीच भेट होती.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**TENDER NOTICE**

**Ref: EE/400KV/RS/O&M/DN/KLW/TECH/26-27/T-13/435** **Dt. 17.06.2026**

MSETCL invites online bids (SRM-Tender) from registered contractors / agencies on Mahatransco E-Tendering website **http://srmetender.mahatransco.in** for following works.

| Sr. No. | RFx No. | Description of Work | Due date & Time (Hrs.) for submission & Opening of Tender |
|---|---|---|---|
| 1 | 7000040070 | SRM Tender (2nd call) for AMC of overhauling, servicing and repairing of 400kV PG, center break isolator and 220kV and 100kV Isolators at 400kV RS Kalwa and 220kV RS Kalwa under 400kV RS O&M Dn Kalwa. | **Download and submission of tender Documents Date:** Dt. 18.06.2026 10:00 Hrs to Dt.29.06.2026 up to 10:00 Hrs **Techno-commercial Opening: -** Dt. 29.06.2026 at 11:00 Hrs (Onwards if possible) **Price Bid Opening:-** Dt.29.06.2026 at 12:00 Hrs (Onwards if possible) |
| | | Tender Fee | Rs. 500 + GST 5% |
| | | Estimated Cost (Including GST) | Rs. 24,48,429/- |

**Contact Person :** Executive Engineer/ Dy. Executive Engineer (O) & Mob No. 9920082425 / 7977325020.

1. Relevant portions of the Tender which the tenderers have to fill online would be available on aforesaid website.
2. Tender documents can be downloaded by online from aforesaid website.
3. Eligible contractor agencies should submit their bid well in advance instead of waiting till last date. MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.

Sd/-
EXECUTIVE ENGINEER
400KV R S O&M DN KALWA



**MAHAVITARAN** Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**TENDER NOTICE**

Tenders are invited for supply of 11 kV & 22 kV, 200 kVA Three Phase, Alu. / Copper Wound, CRGO Core, ONAN, Distribution Transformers EEL- II ( STAR-II) through e-tendering process with Estimated Cost of Rs. 13038 lakhs against MSEDCL advertised Tender on website vide No. MMD/T-HTM1-06/0626 due for submission on dtd. 06.07.2026. For details please visit website: https://etender.mahadiscom.in/eatApp/.

**HO PR No. 147 / 26** **Chief Engineer (MMD)**



**जाहीर सूचना**

याद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, खाली अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या मालमत्तेसंबंधी खालील मूळ शिर्षक कागदपत्रे तसेच त्यांच्याशी संबंधित झेरॉक्स प्रती हरविल्या/गहाळ झाल्या आहेत आणि त्यांचा कसून शोध घेतल्यानंतरही ती सापडलेली नाहीत.

खालील स्वाक्षरीकर्ता हे खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचे खरेदीदार **श्रीमती मोना संजय शाह, श्रीमती सरोज धनसुखलाल शाह आणि श्री. संजय धनसुखलाल शाह आणि** सध्याचे मालक **श्री. भारत बापालाल शाह आणि श्रीमती मीना भारत शाह** यांच्या वतीने व त्यांच्या सूचनेनुसार कार्य करीत आहे.

**मालमत्तेची अनुसूची**

**फ्लॅट क्र.बी-२, इमारत क्र.२४, १ला मजला, श्री गोविंद नगर गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित** म्हणून ज्ञात इमारतीत, **गाव एकसर येथील सी.टी.एस. क्र. २४१९, सेंट गोविंद नगर, सोडावाला लेन, बोरिवली (पश्चिम), मुंबई – ४०००९२** येथे स्थित, अंदाजे मोजमाप सुमारे **३६० चौ. फूट कार्पेट क्षेत्र**, तसेच त्यास संलग्न असलेले समभाग व त्यासंबंधित सर्व हक्कांसह येथील सर्व भाग व खंड.

**हरविलेली कागदपत्रे**

सदर मालमत्तेच्या शिर्षकासंबंधी खालील मूळ कागदपत्रे तसेच त्यांवरील मुद्रांक शुल्क/नोंदणी इत्यादींच्या पावत्या हरवल्या/गहाळ झाल्या आहेत (विक्रेत्यांनी खरेदीदारांना दिलेल्या प्रतिनिधित्वानुसार) : **श्री. उमाकांत शंकर थाळी आणि श्री.यशवंत शांताराम चित्रे** यांच्यात निष्पादित **विक्री करार**.

हे स्पष्ट करण्यात येते की, **श्री गोविंद नगर गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित यांनी जारी केलेले, विशिष्ट क्र.११४३ ते ११६० असलेले १८ शेअर्सचे मूळ भाग प्रमाणपत्र क्र.१०१**, उपलब्ध असून संबंधित मालकांच्या ताब्यात आहे.

ओळख पटवण्याच्या उद्देशाने पुढे असे नमूद करण्यात येत आहे की, सदर सोसायटीने विकासक एएमआय श्री गोविंद नगर रियल्टी एलएलपी आणि कंपनी मोडीस्पेसेस रियल इस्टेट प्रा. लि. यांच्यामार्फत पुनर्विकास हाती घेतला असून, मालमत्तेची योग्य ओळख सुलभ करण्यासाठीच हा संदर्भ देण्यात येत आहे.

वरील नमूद विकासक, कंपनी, संस्था, बँक, वित्तीय संस्था, सोसायटी, प्राधिकरण किंवा संस्थेस वरील मालमत्ता किंवा वरील हरविलेल्या कागदपत्रांबाबत विक्री, अदलाबदल, भेट, गहाण, भाडेपट्टा, वारसा, उत्तराधिकार, न्यायालयाचा आदेश किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा, हक्क, शिर्षक, हितसंबंध, शुल्क, धारणाधिकार, गहाणहक्क, वारसाहक्क, आक्षेप किंवा मागणी असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत त्यासंबंधीची लेखी माहिती व त्यास पाठिंबा देणारी कागदपत्रे खाली सही करणाऱ्यास सादर करावीत.

अशक्य झाल्यास, सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीस कोणताही दावा किंवा आक्षेप नाही असे गृहीत धरले जाईल आणि असे दावे, असल्यास, सर्व हेतू व उद्देशांसाठी त्यागलेले किंवा सोडून दिलेले मानले जातील.

ही सूचना **श्रीमती मोना संजय शाह, श्रीमती सरोज धनसुखलाल शाह आणि श्री. संजय धनसुखलाल शाह** यांच्या विनंतीवरून व त्यांच्या वतीने प्रकाशित करण्यात येत आहे.

**ठिकाण:** मुंबई
**दिनांक:** १८ जून २०२६ सही/-
**श्रीमती मोना संजय शाह,**
**श्रीमती सरोज धनसुखलाल शाह,**
**श्री.संजय धनसुखलाल शाह**
**यांच्याकरिता वकील**

**वकीलामार्फत**
**ॲड. झलक पारिख**
सूर्यकिरण बंगलो क्र.४४, आरएससी-१, सेक्टर-२, चारकोप पोलीस स्टेशन जवळ, कांदिवली (पश्चिम), मुंबई - ४०००६७. महाराष्ट्र.



**जाहीर सूचना**

याद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, खाली अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या मालमत्तेसंबंधी खालील मूळ शिर्षक कागदपत्रे तसेच त्यांच्याशी संबंधित झेरॉक्स प्रती हरविल्या/गहाळ झाल्या आहेत आणि त्यांचा कसून शोध घेतल्यानंतरही ती सापडलेली नाहीत.

खालील स्वाक्षरीकर्ता हे खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचे खरेदीदार **श्रीमती मोना संजय शाह, श्रीमती सरोज धनसुखलाल शाह आणि श्री. संजय धनसुखलाल शाह आणि** सध्याचे मालक **श्री. भारत बापालाल शाह आणि श्रीमती मीना भारत शाह** यांच्या वतीने व त्यांच्या सूचनेनुसार कार्य करीत आहे.

**मालमत्तेची अनुसूची**

**फ्लॅट क्र.बी-२, इमारत क्र.२४, १ला मजला, श्री गोविंद नगर गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित** म्हणून ज्ञात इमारतीत, **गाव एकसर येथील सी.टी.एस. क्र. २४१९, सेंट गोविंद नगर, सोडावाला लेन, बोरिवली (पश्चिम), मुंबई – ४०००९२** येथे स्थित, अंदाजे मोजमाप सुमारे **३६० चौ. फूट कार्पेट क्षेत्र**, तसेच त्यास संलग्न असलेले समभाग व त्यासंबंधित सर्व हक्कांसह येथील सर्व भाग व खंड.

**हरविलेली कागदपत्रे**

सदर मालमत्तेच्या शिर्षकासंबंधी खालील मूळ कागदपत्रे तसेच त्यांवरील मुद्रांक शुल्क/नोंदणी इत्यादींच्या पावत्या हरवल्या/गहाळ झाल्या आहेत (विक्रेत्यांनी खरेदीदारांना दिलेल्या प्रतिनिधित्वानुसार) : **श्री. शशिकांत यशवंत कामत व श्री. उमाकांत शंकर थाळी** यांच्यात निष्पादित **विक्री करार**.

हे स्पष्ट करण्यात येते की, **श्री गोविंद नगर गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित यांनी जारी केलेले, विशिष्ट क्र.११४३ ते ११६० असलेले १८ शेअर्सचे मूळ भाग प्रमाणपत्र क्र.१०१**, उपलब्ध असून संबंधित मालकांच्या ताब्यात आहे.

ओळख पटवण्याच्या उद्देशाने पुढे असे नमूद करण्यात येत आहे की, सदर सोसायटीने विकासक एएमआय श्री गोविंद नगर रियल्टी एलएलपी आणि कंपनी मोडीस्पेसेस रियल इस्टेट प्रा. लि. यांच्यामार्फत पुनर्विकास हाती घेतला असून, मालमत्तेची योग्य ओळख सुलभ करण्यासाठीच हा संदर्भ देण्यात येत आहे.

वरील नमूद विकासक, कंपनी, संस्था, बँक, वित्तीय संस्था, सोसायटी, प्राधिकरण किंवा संस्थेस वरील मालमत्ता किंवा वरील हरविलेल्या कागदपत्रांबाबत विक्री, अदलाबदल, भेट, गहाण, भाडेपट्टा, वारसा, उत्तराधिकार, न्यायालयाचा आदेश किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा, हक्क, शिर्षक, हितसंबंध, शुल्क, धारणाधिकार, गहाणहक्क, वारसाहक्क, आक्षेप किंवा मागणी असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत त्यासंबंधीची लेखी माहिती व त्यास पाठिंबा देणारी कागदपत्रे खाली सही करणाऱ्यास सादर करावीत.

अशक्य झाल्यास, सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीस कोणताही दावा किंवा आक्षेप नाही असे गृहीत धरले जाईल आणि असे दावे, असल्यास, सर्व हेतू व उद्देशांसाठी त्यागलेले किंवा सोडून दिलेले मानले जातील.

ही सूचना **श्रीमती मोना संजय शाह, श्रीमती सरोज धनसुखलाल शाह आणि श्री. संजय धनसुखलाल शाह** यांच्या विनंतीवरून व त्यांच्या वतीने प्रकाशित करण्यात येत आहे.

**ठिकाण:** मुंबई
**दिनांक:** १८ जून २०२६ सही/-
**श्रीमती मोना संजय शाह,**
**श्रीमती सरोज धनसुखलाल शाह,**
**श्री.संजय धनसुखलाल शाह**
**यांच्याकरिता वकील**

**वकीलामार्फत**
**ॲड. झलक पारिख**
सूर्यकिरण बंगलो क्र.४४, आरएससी-१, सेक्टर-२, चारकोप पोलीस स्टेशन जवळ, कांदिवली (पश्चिम), मुंबई - ४०००६७. महाराष्ट्र.

नवाकाळ



# उत्तर भारतीय कामगारांमुळे गुन्हेगारी तामिळनाडूत राज ठाकरेंसारखे बोल



**चेन्नई -** तामिळनाडू भाजपाचे प्रदेशाध्यक्ष असताना सातत्याने राज्यात कामा-धंद्यानिमित्त येणाऱ्या उत्तर भारतीयांच्या बाजूने बोलणारे के अन्नामलाई यांनी भाजपाला सोडचिठ्ठी देत स्वत:चा पक्ष स्थापन केल्यावर आपल्या या भूमिकेलाही सोडचिठ्ठी दिली. उत्तर भारतीय कामगारांमुळे राज्यात गुन्हेगारीत मोठी वाढ झाली असून, उत्तर भारतीय स्थलांतरित कामगारांची तपशिलवार माहिती असलेला डेटाबेस सरकारने तयार करावा, अशी मागणी आता अन्नामलाई यांनी केली आहे. यामुळे तामिळनाडूमध्ये आता महाराष्ट्रातील नेते राज ठाकरे यांच्यासारखी भूमिका अन्नामलाई यांनी घेतल्याने परप्रांतीय विरोधात वातावरण निर्माण होणार आहे. यापूर्वी २०२३ मध्ये तामिळनाडूत उत्तर भारतीय कामगारांवर हल्ले होत असल्याची अफवा पसरली असताना अन्नामलाई यांनी तामिळनाडू भाजपा अध्यक्ष या नात्याने उत्तर भारतीय कामगारांवरील हल्ल्यांचा निषेध केला होता. द्रमुक उत्तर भारतीयांशी द्वेषबुद्धीने वागतो, असा आरोप केला होता. उत्तर भारतीय हेदेखील भारतीय नागरिक आहेत, त्यांना भारतात कुठेही जाण्याची मुभा आहे.

# मनातल्या नग्नतेचं काय?

**तुम्ही उत्खननात सापडलेल्या या आदिम जननीला ढीग वस्त्र चढवाल हो, पण तुमच्या मनातील नग्नतेला कपडे चढवता येतील का?**

**- मुकुंद कुळे**

**काही** वर्षांपूर्वी एक आसामी नाटक पाहिलं होतं- नुपी. नुपी म्हणजे स्त्री. या नाटकात सीतेपासून आता आसामच्या चहाच्या मळ्यांत काम करणाऱ्या स्त्रीपर्यंत, साऱ्याजणी पुरुषी अत्याचाराच्या बळी महिला कशा ठरत आल्या आहेत, ते मंचित करण्यात आलं होतं. या नाटकाच्या शेवटी, या पुरुषी अत्याचाराचा निषेध एक स्त्री आपले कपडे उतरवून, नग्न होऊन करते असं दाखवण्यात आलं होतं... विद्रोहाचं ते नग्न दृश्य समोर साकार झालं आणि... समोरचे प्रेक्षक केवळ नि:शब्द झाले. काही वेळाने पडदा पडला तरी कुणाला टाळ्या वाजवायचं भान राहिलं नाही. कारण कुणाच्याच डोळ्यांसमोरून ती नग्न स्त्री हटायलाच तयार नव्हती... त्याचं कारण त्यांच्या डोळ्यांत किंवा मनांत वासना उतरलेली नव्हती, तर त्या स्त्रीच्या नग्न होण्यामागील अपरिहार्यता, प्रतीकात्मकता आणि कलात्मकताही त्यांना जाणवलेली होती! कलेतली नग्नता अशी सूचक असते. शारीरिक आकारापेक्षा त्यातला निराकारच तिथे कलावंताला दर्शवायचा असतो. हे ज्यांना कळतं ते त्या कलेचा निर्मळ आस्वाद घेतात आणि ज्यांना कळत नाही, ते त्यातली नग्नता शोधून त्या कलाकृतीची मोडतोड करतात. कलावंताला मारहाण करतात. किंवा मग नग्न देहाला आतासारखी वस्त्र चढवतात.

खरोखर भारतीय समाजाइतका दांभिक समाज जगाच्या पाठीवर दुसरा नसेल. एकीकडे यांच्या पुराणात नग्नतेसंदर्भातील सगळ्या मर्यादा मोकळेपणाने उल्लंघलेल्या दिसतात आणि त्याच वेळी त्या पुराणांचे गोडवे गाणारी मंडळी नग्नतेवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न करतात, त्यामागील कलात्मकतेचा कुठलाही संदर्भ लक्षात न घेता. एवढंच कशाला खासगीत लैंगिकतेविषयी बोलताना यांना कुठलाही विधिनिषेध नसतो, पण कुणी कलेच्या पातळीवर लैंगिकतेला दृश्य रूप दिलं की यांच्या भावना भडकतात...

खरं तर कलाकृती कुठलीही असो चित्र-शिल्प-नाट्य-सिनेमा, त्यांचा विषय नग्नता असला, की संस्कृतिरक्षकांचं पित्त अगदी खवळतं. त्यांना वाटतं की हा आपल्या संस्कृतीवर घालाच आहे आणि मग ते कोणताही अभ्यास न करता, कलाकृती नष्ट करतात, त्यांची मोडतोड करतात... पण त्यांना काय ठाऊक की केवळ नग्नता ही एकच कसोटी लावली, तर आपल्या परंपरेतलं काय काय नष्ट करावं लागेल ते! अगदी पुराणग्रंथांपासून खजुराहो-कोणार्कच्या मंदिरांपर्यंत सारं काही जमीनदोस्त करावं लागेल... आणि मग आपल्याकडे भारताची प्राचीन कला-साहित्य परंपरा दाखवण्यासारखं काहीच उरणार नाही. वास्तविक कलाकृतीतून येणारी नग्नता ही काही नाकारण्याजोगी गोष्ट नाही. नग्नता ही प्राकृतिक गोष्ट आहे आणि या प्राकृतिक गोष्टीला आपला अभ्यास-आकलन-संशोधन आणि आपल्या प्रतिभेच्या जोरावर कलावंत वेगळं काही रूप देऊ इच्छित असतो. वेगळं काही सांगू पाहत असतो. कलाकृतीतील नग्नता हे त्याचं साध्य नसतं, तर साधन असतं, वेगळं काही सांगण्याचा, वेगळं काही सुचवण्याचा. नग्नेतून कलावंत विचार मांडत असतो, काहीएक स्टेटमेंट करत असतो. नग्नतेला एक 'कला'मूल्य प्राप्त करून देण्याचा त्याचा प्रयत्न असतो. शेवटी नग्नता हा विषय असलेल्या कलाकृती म्हणजे पूर्वीसारख्या लपूनछपून पाहिल्या जाणाऱ्या ब्ल्यू फिल्म्स नव्हेत, हे या संस्कृतिरक्षकांना कुणी तरी सांगितलं पाहिजे.

अर्थात काही समजूनच घ्यायचं नाही ठरवलं की सगळेच मार्ग खुंटतात आणि मग आपल्या देवदेवतांचं खरं रूपही झाकून टाकण्यापर्यंत यांची मजल जाते. मग त्यांना मातृरूपातील आदिमायेचं सर्जनद्वार देखील लाजिरवाणं वाटू लागतं.



वास्तविक मातृरूपा देवता असल्यामुळे या शिल्पांच्या नग्नतेत कुणाला काहीही अश्लील वा नग्नता आढळण्याचं कारण नाही. मूल ज्या द्वारातून जन्माला येतं ते स्त्रीचं सर्जनाचं द्वार खरं तर कोणासाठीही आदराचं, नतमस्तक होण्याचंच ठिकाण असायला हवं. मातेच्या ज्या जननभागातून जन्म झाला त्याविषयी किळस, घृणा, लज्जा किंवा अपराधी वाटण्याचं कारणच काय? पण तथाकथित संस्कृतिरक्षकांची परंपरा फार जुनी आहे. त्यांना आपल्या मातेच्या मायांगाची कायमच शरम वाटत आलेली आहे आणि म्हणून त्यांनी आपल्या सर्जनरूपा मातृदेवतांचं थेट रूपडंच बदलून टाकलेलं आहे. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या कुलदेवता असलेल्या रेणुका काय किंवा योगेश्वरी काय, या प्रत्यक्षात मूळ सर्जनरूपातील लज्जागौरी रूपातील मातृदेवताच आहेत. आज त्या ज्या अवस्थेत किंवा रूपात पूजल्या जातात, ते त्यांचं मूळ रूप नव्हेच. त्यांचं मूळ रूप जननभाग शिल्पांकित आहे. परंतु आपल्या मातेच्या या नैसर्गिक रूपाची लाज वाटूनच बहुधा या देवीरूपांना आजचं मुखवट्याचं रूप प्रदान करण्यात आलं आहे आणि नवरात्रीसारख्या सण-उत्सवात या जननभागालाच तिचं मुख समजून विडा चारण्याची पद्धत रूढ आहे. शेंदूर थापून थापून जाड झालेल्या या मातृदेवतांच्या तांदळारूपाचा आजही कुणी बारकाईने मागोवा घेतला, तर नक्कीच तिथे 'लज्जागौरी' सापडेल. मोहेंजोदारो येथील उत्खननात सापडलेल्या नग्न मूर्तिरूपाबाबत एनसीईआरटीत बसलेल्या संस्कृतिरक्षकांनी तेच केलंय. तिच्या नग्न देहावर कपडे चढवून तिचं मूळ अस्तित्वच नाकारलंय.

पण अशाने समाजातील नग्नता संपणार आहे का? तुम्हाला नग्नता आढळणाऱ्या कलाकृतींवर तुम्ही धाकदपटशाने बंदी आणाल... पण समाजात वेगवेगळ्या पातळीवर, स्तरावर अस्तित्वात असलेल्या नग्नतेचं काय कराल? मुळात आजच्या इंटरनेटच्या युगात तर तुम्ही नग्नता-लैंगिकता-अश्लीलतेला रोखूच शकत नाही. ती जङ्व्याळ आहे. नाना मार्गांनी, नाना द्वारांनी, नाना परींनी ती तुमच्या आयुष्यात प्रवेश करते आहे. मग तिला तुम्ही कुठवर आणि कसं थोपवणार? याही पुढे जाऊन म्हणायचं, तर तुम्ही जनातली नग्नता थांबवण्याचा- संपवण्याचा प्रयत्न कराल, पण तुमच्या-आमच्या मनातल्या नग्नतेचं काय? ◆◆◆

# मेघना बोर्डीकर यांच्या संपत्तीत वाढ समीर दुधगावकर यांचा व्हिडिओत आरोप

■ मुंबई

**राज्यातील** राजकारणात पुन्हा एकदा आरोप-प्रत्यारोपांचे वादळ उठले आहे. राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या संपत्ती वाढीवरून माजी मंत्री गणेश दुधगावकर यांचे पुत्र समीर दुधगावकर यांनी व्हिडिओ जारी करत आरोप केले आहेत. २०१४ पासून बोर्डीकर यांच्या संपत्तीत मोठी वाढ झाल्याचा दावा करत या वाढीमागे नेमके कारण काय, असा सवाल केला आहे. दुधगावकर यांनी केवळ मेघना बोर्डीकर यांच्यावरच नाही, तर त्यांचे पती आणि नवी मुंबईचे सहपोलीस अदायुक्त दीपक साकोरे यांच्याबाबतही आरोप करत चौकशीची मागणी केली. मेघना बोर्डीकर यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावत



राजकीय हेतूने आरोप केले जात असल्याचा पलटवार केला.

समीर दुधगावकर यांनी म्हटले की, जनतेच्या मनात भावना आहे की तुम्ही जनतेची सेवा करताना स्वत:चे घर भरू नये. तुम्ही फक्त एक गृहिणी होता आणि पती आयपीएस अधिकारी आहेत. २०१२ मध्ये त्यांनी जिल्हा परिषद लढवली, २०१७

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

मध्ये पळून गेल्या, २०१९ मध्ये तुम्हाला भाजपाने अचानक कसे उचलले? भारतामध्ये आपण अनेक प्रकरणे बघतो की साधा अधिकारी असतो त्याच्या घरामध्ये कोट्यवधी रुपये सापडतात.

# कर्जमुक्तीसाठी तुपकरांचे आंदोलन एसडीओ कार्यालय पेटविण्याचा प्रयत्न

■ बुलडाणा

**शेतकरी** नेते रविकांत तुपकर यांनी शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमुक्ती आणि पीकविमा मंजुरीच्या मागणीसाठी १५ जूनपासून बुलडाणा येथील निवासस्थानी बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाला राज्यभरातून पाठिंबा मिळत असून विविध ठिकाणी शेतकरी रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. खामगाव येथे काही आंदोलकांनी उपविभागीय अधिकारी (एसडीओ) कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ आंदोलन केले. तसेच चिखली-खामगाव मार्गावरील पेठ येथील पुलावर टायर जाळून निषेध व्यक्त करण्यात आला.

किनगाव जट्टू येथे एसटी बस जळाल्याची घटना घडली. पोलिसांनी ही घटना शॉर्टसर्किटमुळे झाल्याचा दावा केला असला, तरी या घटनेबाबत



विविध चर्चांना उधाण आले आहे. यावर आज रविकांत तुपकर यांनी एक्स पोस्ट करत सरकारला इशारा दिला. ते म्हणाले की, सरसकट, विनाअट कर्जमुक्ती आणि हक्काचा पीकविमा मिळावा यासाठी मी बेमुदत अन्नत्याग आंदोलन करत आहे. मात्र सरकार अद्यापही या मागण्यांची दखल घेण्यास तयार नाही.हिंसा कोणत्याही प्रश्नाचे उत्तर नाही. मात्र शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत होत चालला आहे.

# आयएएस अश्विनी जोशींच्या बदलीला २४ तासांत स्थगिती

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांच्या बदलीच्या आदेशाला अवघ्या २४ तासांत स्थगिती मिळाली आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे प्रशासकीय वर्तुळात सुरू असलेल्या



चर्चांना उधाण आले आहे. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर आपत्ती व्यवस्थापनाची महत्त्वाची जबाबदारी सांभाळणाऱ्या अधिकाऱ्याची बदली केल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले होते.

राज्य सरकारने नुकताच आदेश काढून डॉ. अश्विनी जोशी यांची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) येथे अतिरिक्त महानगर आयुक्त म्हणून नियुक्ती केली होती. त्यानंतर महापालिकेतील रिक्त झालेल्या अतिरिक्त आयुक्त पदाचा कार्यभार आयएएस अधिकारी प्राजक्ता वर्मा यांच्याकडे सोपवला होता.मात्र, या निर्णयानंतर प्रशासकीय स्तरावर चर्चा सुरू झाल्या.

# 'ऑपरेशन टायगर' यशस्वी! ठाकरेंचे सहा खासदार फुटले

» पान १ वरून

नाहीत. या खासदारांना दिल्लीला आणण्यासाठी मग नांदेड, पुणे आणि अन्य शहरांत विमाने पाठवण्यात आली.

अशा प्रकारे जर खासदार विकत घेतले जाणार असतील तर निवडणुका लढवण्यात काय अर्थ, असा सवाल राऊत यांनी उपस्थित केला.

रविवारी मातोश्रीवर झालेल्या बैठकीबद्दल बोलताना राऊत म्हणाले की, बैठकीला चार खासदार प्रत्यक्ष हजर होते. तर उर्वरित पाच खासदारांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांच्याशी संपर्क साधला. तो सर्व संवाद आम्ही ऐकला. एका खासदाराने तर ३ मिनिटांत ४ वेळा साईबाबांची शपथ घेतली. माझी बायको आजारी आहे साईबाबांची शपथ, मी तुमच्यासोबतच आहे, साईबाबांची शपथ असे तो म्हणाला. एकाने आई भवानीची शपथ घेतली. एकाने मुलाची शपथ घेतली. एकाने बाळासाहेबांची शपथ घेतली. एकाने आईची शपथ घेतली. एवढ्या शपथा घेतल्यामुळे त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवण्याशिवाय काही पर्याय उरला नाही.

याप्रसंगी राऊत यांनी काही गंभीर आरोपही केले. फुटीर खासदारांमध्ये नाव असलेले ओमराजे निंबाळकर यांना त्यांचे वडील पवनराजे निंबाळकर यांच्या हत्या प्रकरणात त्यांच्या बाजूने निर्णय लावण्याचे आमिष दाखवण्यात आले, असा आरोप राऊत यांनी केला.

पवनराजे निंबाळकर यांच्या हत्येच्या खटल्याची सुनावणी पूर्ण झाली आहे. अंतिम निकाल २० जून रोजी आहे. मात्र काल १६ जूनला सर्व आरोपी हजर असतानादेखील न्यायाधीशांनी निकाल २० जूनपर्यंत पुढे ढकलला, असे राऊत म्हणाले.

या पत्रकार परिषदेनंतर राऊत, अरविंद सावंत आणि अनिल देसाई लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेण्यासाठी संसद भवनात गेले. बिर्ला यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. आमच्या पक्षातील काही खासदार स्वतंत्र गट स्थापन करण्याची चर्चा आमच्या कानावर आली आहे. जर असा गट तुमच्याकडे आला तर घटनेमध्ये जी तरतूद आहे त्यानुसार निर्णय घ्यावा. निर्णय घेण्याआधी आमचे म्हणणे ऐकून घ्यावे, अशी विनंती निवेदनात करण्यात आली होती.

मात्र, उबाठाचे नेते हे निवेदन घेऊन बिर्ला यांच्याकडे जाण्यापूर्वी कालच बिर्ला यांनी फुटीरांच्या गटाला तत्वत: मान्यता दिली आहे. फक्त नियमानुसार अध्यक्षांसमोर प्रत्यक्ष उपस्थित रहाण्यासाठी हे खासदार बिर्ला यांची भेट घेणार आहेत, अशी चर्चा होती.

दरम्यान, उबाठातून फुटलेल्या या खासदारांना एकनाथ शिंदे यांच्याकडून मोठमोठी आश्वासने देण्यात आली आहेत. प्रत्येक खासदाराला २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत उमेदवारी, एकाला राज्यमंत्रिपद आणि मतदारसंघात विकासकामे करण्यासाठी मुबलक निधी देण्यात येईल, अशाप्रकारची आश्वासने फुटीर खासदारांना देण्यात आली आहेत, असे कळते. याशिवाय कोट्यवधी रुपये देण्यात आले.

## २०२९ ची निवडणूक शेवटची इम्तियाज जलील यांची टीका

गेल्या दहा बारा वर्षांत देशाच्या राजकारणात अशा काही गोष्टी घडत आहेत त्या लोकशाहीसाठी घातक आहेत. लोकशाही संपवण्याचे कारस्थान सुरू आहे. आम्ही याचा निषेध करतो. २०२९ ला जर भाजपा पुन्हा निवडून आली तर या देशात पुन्हा निवडणुका होणारच नाहीत. कारण भाजपा निवडणुका होऊच देणार नाही, अशा शब्दांत एमआयएमचे नेते आणि एमआयएमचे छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी ऑपरेशन टायगरवर प्रतिक्रिया दिली.

## निवडणुका कशासाठी? कपिल सिब्बल यांचा सवाल

ज्येष्ठ विधिज्ञ आणि राज्यसभा खासदार कपिल सिब्बल यांनी महाराष्ट्रातील 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर पक्षांतराच्या राजकारणावर आक्षेप घेतला. जर एखाद्या पक्षाच्या चिन्हावर निवडून येऊन संसदेत जाऊन नंतर दुसऱ्या पक्षात आणि दुसरे चिन्ह घेणार असाल तर निवडणुका कशासाठी असा सवाल त्यांनी एक्स पोस्ट करत उपस्थित केला. कपिल सिब्बल यांनी एक्सवर लिहिले की,निवडणुका कशासाठी? जर एखादा खासदार एखाद्या पक्षाच्या चिन्हावर निवडून संसदेत गेला असेल, तर तो नंतर दुसऱ्या पक्षाच्या वेगळ्या चिन्हाखाली कसा जाऊ शकतो? तो त्या नव्या चिन्हावर निवडून आलेला नसतो. घटनात्मक कायद्याचे कोणतेही तत्त्व अशा प्रकाराला परवानगी देऊ शकत नाही. अशा प्रकारचे पक्षांतर अनैतिक, बेकायदेशीर आणि घटनाबाह्य आहे.या प्रकरणाचा अंतिम निर्णय न्यायालयानेच घ्यावा. ते पुढे भाजपावर टीका करत लिहितात की, अल्पमतातील सरकारचे बहुमताच्या सरकारमध्ये रूपांतर करायचे असेल, तर ते आता अगदी सोपे झाले आहे. त्यासाठी सत्तेची पदे आणि पैशाचे आमिष दाखवले जाते. तसेच ईडी, सीबीआय आणि आयकर विभागाच्या कारवाईची धमकी दिली जाते. या माध्यमातून राजकीय पक्षांतील लोकप्रतिनिधींवर दबाव टाकून सरकारची समीकरणे बदलून बहुमतात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. भाजपा हे घडवण्याचा प्रयत्न करत आहे

## अख्खा समाजवादी पक्ष फुटणार उत्तर प्रदेशच्या मंत्र्याचा दावा


» पान १ वरून

गोमती रिव्हर फ्रंट घोटाळ्याचा सूत्रधार कोण आहे, हे उत्तर प्रदेशातील प्रत्येकाला माहीत आहे. जसा फास आवळला जात आहे, तशी समाजवादी पक्षाची अस्वस्थता वाढत आहे. संपूर्ण समाजवादी पक्षच भाजपामध्ये सामील होण्यासाठी सज्ज आहे. समाजवादी पक्षाचे प्रवक्ते सुनील साजन यांनी राजभर यांच्या दाव्याचा समाचार घेत भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचा आरोप केला. साजन म्हणाले की, समाजवादी पक्षाने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाची ताकद कमी केली असून, २०२७ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला उत्तर प्रदेशातून सत्तेबाहेर करण्यासाठी जनता सज्ञ आहे. तसेच आगामी निवडणुकीत राजभर यांच्या पक्षाचा एकही आमदार निवडून येणार नाही.


## शिवसेनेतील बंड



१९९८ साली गणेश नाईक यांनी शिवसेना सोडली. मात्र त्यांच्या सोबत कुणीही गेले नाही.



२००५ साली नारायण राणेंनी शिवसेना सोडली. त्यांच्या बरोबर ११ आमदारांनी पक्ष सोडला. मात्र पुढे या आमदारांनी काँग्रेस, पुन्हा शिवसेना अशा उड्या मारल्या. नारायण राणे काँग्रेसमध्ये गेले. नंतर काँग्रेस सोडून २०१७ साली त्यांनी स्वाभिमान पक्ष काढला. पुढे एका वर्षातच त्यांनी भाजपात प्रवेश करीत स्वाभिमान पक्ष विलीन केला. नारायण राणे शिवसेनेतून बाहेर पडले तेव्हा त्यांच्या सोबत वडाळ्याचे आमदार कालिदास कोळंबकर, गणपत कदम, शंकर कांबळी, रवींद्र माने, प्रकाश भारसाकळे, विनायक निम्हण, माणिक कोकाटे, श्याम सावंत, विजय वडेट्टीवार, सुभाष बने, सुबोध मोहिते हे आमदार शिवसेनेतून बाहेर पडले.



राज ठाकरे यांनी २००५ साली शिवसेना सोडली तेव्हा त्यांच्यासह राम कदम (घाटकोपर पश्चिम), प्रवीण दरेकर (मागाठाणे), बाळा नांदगावकर (शिवडी), नितीन सरदेसाई (माहीम), मंगेश सांगळे (भांडुप), रमेश वांजळे (खडकवासला), शिशिर शिंदे (भांडुप), प्रकाश भोईर (कल्याण पश्चिम), वसंत गिते (नाशिक मध्य), उत्तमराव ढिकले (नाशिक पूर्व), अविनाश जाधव (पालघर) - तेव्हाचे आमदार, धीरज लिंगाडे (मालेगाव बाह्य) आणि सरला पाटील (धुळे ग्रामीण) यांनी शिवसेना सोडली. यापैकी सध्या केवळ बाळा नांदगावकर अजून त्यांच्या सोबत आहेत. राज ठाकरे यांनी लगेच मनसे पक्ष स्थापन केला.

## खा. संजय राऊत यांची एक्स पोस्ट


नांदेड विमानतळावर एक चार्टड विमान उतरते
ऑपरेशन नावाखाली दोन खासदारांना उचलून निघून जाते
यांची रिक्षात फिरण्याची औकात नव्हती
खासगी विमानाने फिरण्या एवढी किंमत ठाकरे नामामुळे वाढली
प्रत्येक गोष्टीचा हिशोब केला जाईल
डरपोक कोल्ह्यांच्या पळवापळविला
का म्हणता?




# खा. वाकचौरेंची 'आजारी' पत्नी ठणठणीत! चर्चांना उधाण

■ शिर्डी

**उबाठाचे** शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्याबाबत सुरू असलेल्या राजकीय चर्चांमध्ये त्यांच्या पत्नी सरस्वती वाकचौरे यांनीही महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया दिली. यामुळे त्या पूर्णपणे ठणठणीत असल्याचे स्पष्ट होते. दरम्यान पत्नी आजारी असल्याचे कारण देत खासदार वाकचौरे यांनी १४ जून रोजी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बोलावलेल्या बैठकीला प्रत्यक्ष उपस्थिती न लावता ऑनलाईन सहभाग नोंदवला होता.



सरस्वती वाकचौरे म्हणाल्या की, भाऊसाहेब वाकचौरे काल संध्याकाळी विमानाने दिल्लीला गेले आहेत. आज हरिद्वार येथे त्यांचा एक कार्यक्रम असल्यामुळे ते एक दिवस आधीच रवाना झाले. राज्यात सुरू असलेल्या 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, या विषयावर माझी त्यांच्याशी कोणतीही चर्चा झालेली नाही. मीसुद्धा टीव्हीवरूनच बातम्या पाहते. तर, खासदार वाकचौरे यांचा मोबाईल फोन बंद असल्याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, ते झोपलेले असतील म्हणून फोन स्विच ऑफ असू शकतो. काल उशिरा प्रवास झाल्याने जागरण झाले असेल. त्यामुळे ते उशिरा उठत असतील. याबाबत मी निश्चित काही सांगू शकत नाही.